नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून महाराष्ट्र साहित्य परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१९५४-५५

संपादक – विष्णु भिकाजी कोलते

१९५४ – ५५

२८८३

वर्ष २७ , वर्ष २८

अंक १०९, ११०, १११, ११२

वर्ष २७ अंक १०९ - एप्रिल - जून १९५४
" " " ११० जुलै - सप्टेंबर - १९५४
" " " १११ ऑक्टोबर - डिसेंबर १९५४
वर्ष २८ वे अंक ११२ - जानेवारी - मार्च १९५५

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचें त्रैमासिक मुखपत्र

वर्ष २७ वें, अंक १०९] [एप्रिल-मे-जून १९५४

१०९

अनुक्रमणिका

या अंकांतील लेखक

श्री. बाबा मोहोड : माधान (जिल्हा अमरावती) स्फुट कविता लेखन.

श्री. नामदेव व्हटकर : मुंबई नभोवाणी केंद्रः कथा कादंबरी व काव्य लेखक.

श्री. गणेश पाठक : एम्. ए. नागपूर-सरकारी भाषा विभागांत भाषांतरकार. स्फुट कविता लेखन.

श्री. नाथ हरि पुरंदरे : एम्. ए. सोलापूर; संस्कृतचे प्राध्यापक. भाषाशास्त्रविषयक चिकित्सक लेखक.

सौ. कुसुमावती देशपांडे : बी. ए. (ऑनर्स) सुप्रसिद्ध लघुकथाकार व टीकाकार. ग्रंथ: दीपकळी; दीपदान; मोळी, मराठी कादंबरी: पहिले शतक.

श्री. गो. म. कुलकर्णी : एम्. ए. विजापूर. कवि व टीकाकार ग्रंथः रसग्रहण — कला व स्वरूप.

श्री. ना. ग. जोशी : एम् ए; पीएच् डी; बडोदें. कवि व छदःशास्त्रज्ञ.

श्री. ह. ना नेने : एम्. ए. बी. टी. नागपूर. प्रसिद्ध महानुभाव व ग्रंथ-संशोधक ग्रंथ-संपादन : लीळाचरित्र, सूत्रपाठ, दृष्टांतपाठ; लक्षणरत्नाकर इत्यादि.

श्री. राम शेवाळकर : बी. ए. नागपूर. स्फुट कविता लेखन.

श्री. तुळशीराम काजे : अमरावती. स्फुट कविता लेखन.

श्री. म. ना. अदवंत : एम्. ए. जळगांव (पू. खा.) मराठीचे प्राध्यापक. कथालेखक व टीकाकार. ग्रंथः मनाचे संकल्प; माणुसकीचा धर्म.

श्री. अरविंद मंगरूळकर : एम्. ए. स. प. महाविद्यालयांत संस्कृतचे प्राध्यापक. कवि व टीकाकार.

श्री. पु. ग. सहस्रबुद्धे : एम्. ए. पी एच्. डी. मराठीचे प्राध्यापक प्रसिद्ध टीकाकार. ग्रंथः स्वभाव लेखन.

श्री. श्री. रा. टिकेकर : मुंबई. पत्रपंडित व टीकाकार. ग्रंथः मुसलमान मुलखांतली मुशाफरी; वातमीदार. संपादनः लोकहितवादींची शतपत्रें; वक्तृत्व इत्यादि

श्री. मा. गो. देशमुख : एम्. ए. पी एच्.डी. नागपूर. मराठीचे प्राध्यापक साहित्यशास्त्रज्ञ व टीकाकार ग्रंथः मराठीचें साहित्यशास्त्र संपादनः सीतास्वयंवर (नागेश)

श्री. के. ना. वाटवे : एम्. ए पी एच्. डी. पुणें, मराठीचे प्राध्यापक : साहित्य शास्त्रज्ञ व टीकाकार: ग्रंथः रस विमर्श; संस्कृत महाकाव्याचे पंचप्राण इत्यादि.

वर्गणीबाबत सभासदांना विनंतीः— घ. नि. ९ (अ) प्रमाणे साधारण सभासदांनी प्रत्येक वर्षाच्या पहिल्या तिमाहींत आपली सभासदत्वाची वर्गणी भरली पाहिजे, कोणत्याहि सभेंत किंवा निवडणुकींत वर्गणी बाकी असणाऱ्या कोणाहि सभासदास मत देता येणार नाहीं.

म. म. प्रा. द. वा. पोतदार यांनी बारावें म. सा. संमेलन अहवाल, व अध्यक्षीय व इतर भाषणें, निबंध असलेलीं बरींच पुस्तकें परिषदेच्या स्वाधीन केलीं आहेत याबद्दल परिषद त्यांची ऋणी आहे. ज्या सभासदांना किंवा संस्थांना या पुस्तकाची प्रत हवी असेल त्यांनीं आठ आण्याचीं पोस्ट-तिकिटें पाठवावीं.

मुद्रकः—म. ना. चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय, १९८।१७ सदाशिव, पुणें २.
प्रकाशकः—अ. गं. मंगरूळकर, चिटणीस, महाराष्ट्र-साहित्य परिषद, टिळक-रस्ता पुणें २

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचें त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य-पत्रिका

वर्ष २७ वें, अंक १०९] [अेप्रिल-मे-जून १९५४

१०९

कौलारूच्या घरांत तुटक्या

कौलारूच्या घरांत तुटक्या
जवळ चुलीच्या धुमे पारवा
मातीच्या फुटक्या मडक्यांतच
येअि भुकेला अखेर थकवा
दर्पणांत पातळ पेजेच्या
रूप आपुलें बघते वळचण
कोपऱ्यांत अंधाऱ्या कण्हते
कणाकणाची अुदास अडचण
—कौलारूच्या घरांत तुटक्या
अवस मारते सदैव मिटक्या !

कौलारूच्या घरांत तुटक्या
दुपारच्या ठिणग्या भवताली
तरणीताठी अुघडी काया
तोंड लपविते चिंधीखाली
अन्नाविण वस्त्राविण येथे
गुदमरलेले जीव बिचारे
रोज छेडती व्यथा तयांच्या
कुडांतले भिरभिरते वारे
—कौलारूच्या घरांत तुटक्या
अवस मारते सदैव मिटक्या !

कौलारूच्या घरांत तुटक्या
नित्य व्यथेचें अिथे प्रदर्शन
भ्रमणारे जगतात स्थळीं या
दुपारच्या भ्रांतीला घेअुन
सजीव विश्वाचे पोशिंदे
अिथे परी हे केविलवाणे
वेटीला धरलेले सारे
पिचल्या हाडांचे दीवाणे !
—कौलारूच्या घरांत तुटक्या
अवस मारते सदैव मिटक्या !

कौलारूच्या घरांत तुटक्या
आकाशाची अुघडी छाया
वास भुकेचा ये मातीला
चिंधीखाली दडते काया
धरतीवर झोकून शरीरें
जीवन येथे जगवित आहे
मानवतेचे अुपेक्षिलेले
मानकरी हे ! मानकरी हे !
—कौलारूच्या घरांत तुटक्या
अवस मारते सदैव मिटक्या !

—बाबा मोहोड

अनुक्रमणिका

मीच बांधतों माझें थडगें

मीच बांधतों माझें थडगें !
मृत्यूसमयीं काय व्हायचें
किती जणांनी रडावयाचें
द्याया खांदा कोण यायचें
आताच ठरतें संख्या यावी,
—कसली तिरडी संगें—
मीच बांधतों माझें थडगें—! १
जीवनभर मी करितों जें जें
मी गेल्यावर होईल ताजें
मोल खरें मग ठरेल माझें
मृत्यूनंतर किंमत उरते,
—जिवंत होऊन मागे
मीच बांधतों माझें थडगें ! २
किती दिवस आणि किती जणांनी
काय म्हणावें मजला स्मरुनी
ठरूं लागलें आजपासुनी
कर्तृत्वाच्या दुर्बीणींतुन,
—चाहुल पुढची लागे
मीच बांधतों माझें थडगें । ३
थडग्यावरती फुलें पडावीं
किंवा गवतें वर वाढावीं
निश्चित होती प्रसंग भावी
थडग्यावरची वस्तु आंतिल,
—भूतकाळ झणि सांगे
मीच बांधतों माझें थडगें ! ४
मरणानंतर जिवंतपणची
कृति प्रीति ही जिती व्हायची
अमूर्त व्यक्ति जगावयाची
तिच्या अंगच्या कपड्यासाठी,
—आज विणावे धागे
मीच बांधतों माझें थडगें ! ५
शहाजहाँची ती मुमताज
थडग्याआंतुन करते राज
निनादला जगिं मूक आवाज
सरति शरीरें, आंतिल मानव,
—चालत जाती मार्गें
मीच बांधतों माझें थडगें ! ६

—नामदेव व्हटकर

जुनें व्हावयास सोनें

जुनें व्हावयास सोनें
आहे परिसाची वाण
ठिगळाची आस वाहे
जुनेराचें धडपण
जराजीर्ण खोडांतुनी
पालवीचें अंकूरणें
जुन्या लोखंडाच्या पोटीं
नव्या पोलादाचें जिणें
जुन्या धरतीच्या गर्भी
बीज जुनेंच पेरलें
कणसाच्या पाठींपोठीं
नवे दाणे टपोरले
सरावाच्या पायवाटीं
नव्या पावलांच्या खुणा
वड, पिंपळ पाहती
जुन्यापाठी नवेपणा
पायांतल्या पाषाणांचें
रूप ओबडधोबड
वळ अचाट—चढती
नव्या इमल्यांचे माड
जाईजुई, रातराणी
भोळ्या तगरी मोगरी
रोज फुलांची पाहती
जन्म मरणाची वारी
पंचमहाभूतें सारीं
नित्य नवीं जरी जुनीं
...लयांतून विकासाची
खुले नवीनच धाटणी
जुन्या संकेतीं दडला
नवा आशय शोधाया
शिणलेल्या शरीरांत
हवें मन जागें व्हाया
कालसागराच्या तिरीं
लाटेपाठीं येई लाट
जुनी आपसुख विरे
खुले नवीनांची वाट

— गणेश पाठक

' म्हणून 'ची व्युत्पत्ति :

नाथ हरि पुरंदरे

[ता. ९ व १० जानुआरी १९५३ रोजीं सोलापूर येथील अनुक्रमें जि. वाचन मंदिरांत व डी. ए. व्ही. कॉलेजांत "मराठी व्युत्पत्ति कोश"कार व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष प्राध्यापक श्री. कृ. पां. कुलकर्णी यांचें भाषाविषयक व्याख्यान झालें. ता. १९-१-१९५३ च्या " सोलापूर समाचारां "त सदर " भाषणा "चा विस्तृत सारांश छापला आहे. " इतिहास व भाषा यांकडे पहाण्याची दृष्टि " हा या " भाषणा "चा विषय होता. यांतील " भाषा " विषयक बहुतेक सर्वच भाग अत्यंत असमाधानकारक असल्यामुळे, त्या-विषयी थोडेसें लिहिण्याचें येथे योजिलें आहे.]

" म्हणून " " म्हणजे " " ह्यामुळे " " ह्या कारणासाठी " " Therefore " " For this reason " ची तथाकथित " ऐतिहासिक व तौलनिक " व्युत्पत्ति : वेदकालापासून तों थेट आजपर्यंतची ह्या " म्हणून " ची तथाकथित रूपांतरें व अर्थान्तरें.

" वक्त्यांनी प्रथम भाषेसंबंधाने माहिती सांगतांना भाषेचा तौलनिक व ऐतिहासिक दृष्ट्या विचार करावा असें सांगितलें. उदाहरण म्हणून त्यांनी (" म्हणून ") ह्या शब्दाची व्युत्पत्ति सांगतांना वेदकालापर्यंत या शब्दाचे कसे भेद पडत गेले हें सांगून 'त्यांना मी काय म्हणालों' या अर्थाने म्हणून हा शब्द वेदकाळीं वापरला जात होता. पण आज Theed (?) (Therefore) या अर्थाने तो वापरला जात आहे " असें ह्या " भाषणा "संबंधीच्या बातमींत प्रारंभीं म्हटलें आहे. " म्हणून " म्हणजे " ह्यामुळे " " ह्या कारणासाठी " " Therefore " " For this reason " ह्या शब्दाची " ऐतिहासिक व तौलनिक " व्युत्पत्ति श्री. कुलकर्ण्यांनी सांगितली, व ती सांगतांना वेदकालापासून तों थेट आजपर्यंतचीं सदर शब्दाचीं संबाधित रूपान्तरें व अर्थान्तरेंहि अर्थातच त्यांनी सांगितलीं; सदर " म्हणून " ह्या शब्दांत मूळ धातु " भण् (म्हण्) " म्हणजे " म्हणणें " " बोलणें " " to say " असा असून "म्हणून" हें पूर्वकालवाचक ऊर्फ "ऊन" प्रत्ययान्त धातुसाधित अव्यय आहे, व त्याचा मूळ ऊर्फ वेदकालीन अर्थ " बोलून " " Having Said " (भणित्वा) असा होता; आणि आज त्याचा अर्थ " ह्यामुळे " " ह्या कारणासाठी " " Therefore " " For this reason " असा झाला आहे " अशा आशयाची ही बातमी आहे. सदरचीं सर्व नक्की रूपान्तरें व अर्थान्तरें ह्या बातमींत सविस्तर दिलीं नसल्याने, तीं कोणतीं तें समजण्या-साठी श्री. कुलकर्ण्यांच्या " मराठी व्युत्पत्ति कोशां "त " म्हणून " हा शब्द प्रस्तुत लेखकाने पाहिला. परंतु मुख्य शब्द म्हणून सदर शब्द सदर कोशांत दिलेला नसल्याचें त्यास आढळलें. ......म्हणून "म्हण(णें)" हा शब्द ह्या संबंधांत पहातां, खालील व्युत्पत्तिविषयक माहिती

टीपः—मूळ लेख फार विस्तृत असल्याने त्यांतील बराचसा भाग येथे गाळला आहे. गाळलेला भाग '......' असा टिंबावलीनें दाखविला आहे. लेखाच्या मूळ मथळ्यांतहि फरक केला आहे. —संपादक.

ह्या कोशांत आढळली: "सं. भनति, भणति; पा. भणति; प्रा. भणइ; अ. भनिव; आ. भणिवा; हिं. भनना; गु. भणवूँ; अकामसा. म्हणून, म्हणजे, म्हणतखेंवो; मराठींतील रूपें 'म्ह' आदि व इतर भाषांतील 'भ' आदि असल्यामुळे दोन्हींत वर्णप्रक्रियेचा भेद आढळता, म्हणून भण् हा धातु मराठी म्हण चा मूळ नाही असें ब्लोक म्हणतो." "अकामसा म्हणून म्हणजे, म्हणतखेंवो" ह्या वरील उताऱ्यांतील भागांत "म्हणून" हा प्रस्तुत शब्द असा ह्या कोशांत आला आहे, इतकेंच. ह्याशिवाय "म्हणून"ची अन्य कांहीच माहिती ह्या कोशांत नमूद नाही ! प्रस्तुत लेखाचा बराच भाग लिहून झाल्यावर, "मराठी व्युत्पत्ति कोशा"ची प्रस्तावना सहज चाळीत असतां, पान २६ वर सदर "म्हणून"चें विवेचन प्रस्तुत लेखकाच्या पहाण्यांत आलें. त्याचा विचार प्रस्तुत लेखांत नंतर योग्य ठिकाणीं यापुढे केला आहे.

मग " वेदकालापर्यंत ('म्हणून') या शब्दाचे कसे भेद पडत गेले " हें ('म्हणून') या शब्दाची व्युत्पत्ति सांगतांना" "म्हणोन" "भणित्वा" एवढीं दोनच रूपें प्रा. कुलकर्ण्यांच्या तोंडून प्रस्तुत लेखकास प्रत्यक्षत: ऐकण्यास सापडलीं. "युरोपियन पंडितांनी मराठी भाषेचा अभ्यास फार केला आहे...त्या मानाने आपला अभ्यास फारच तोकडा पडतो" असें जें प्रा. कुलकर्ण्यांचें म्हणणें "समाचार"च्या सदर बातमींत प्रसिद्ध झालें आहे, व सदरसंबंधीं "युरोपियन पंडितां"ची जी अवास्तव तोंडभर स्तुति प्रस्तुत लेखकानेहि प्रा. कुलकर्ण्यांच्या तोंडून सदर व्याख्यानप्रसंगीं प्रत्यक्षच ऐकली, तीवरून पहातां प्रस्तुत रूपांतरें व अर्थांतरें प्रा. कुलकर्ण्यांनी ह्या "युरोपियन पंडितां"पासूनच घेतलीं असावींत असें वाटतें. सदर "युरोपियन पंडितां"पैकी फक्त "मोल्स्वर्थ" साहेबांचाच मराठी–इंग्रजी कोश प्रस्तुत लेखकास उपलब्ध झाल्याने, "म्हणोन" व "म्हणवून" हीं दोन रूपें "मोल्स्वर्थ" साहेबांपासून अगर अशाच दुसऱ्या कोणा साहेबापासून ह्या ठिकाणीं त्यांनी आणखी दिलीं असावींत असें वाटतें. हा "म्हणून" शब्द "मोल्स्वर्थ" साहेबांनी "म्हणणें to say" ह्या मराठी धातूपासून क्रियाविशेषण "ad" म्हणून व्युत्पादिला आहे, व "This being said, this being the fact" असा त्याचा मूलार्थ म्हणून दिला आहे. प्रा. कुलकर्णी यांनी ही व्युत्पत्ति व हा मूलार्थ अर्थात् सर्वथा प्रमाण मानून "त्यांना मी काय म्हणालों" ह्या अर्थाने " म्हणून हा शब्द वेदकाळीं वापरला जात होता " असें आपल्या व्याख्यानांत सांगितलें. पण असें सांगतांना त्यांनी असा थोडासाहि विचार केला नाही कीं, "बोलून" "Having said" ह्या "म्हणून" (भणित्वा) ह्या पूर्वकालवाचक ऊर्फ "ऊन" प्रत्ययान्त धातुसाधित क्रियाविशेषण अव्ययाच्या तथाकथित मूलार्थाचा "ह्यामुळे" "ह्या कारणासाठी" "Therefore" "For this reason" ह्या त्याच्या तथाकथित आजच्या उभयान्वयी अव्ययाच्या अर्थाशीं संबंध काय ? "म्ह न" ह्या प्रस्तुत शब्दाचा "ह्यामुळे" "ह्या कारणासाठी" "Therefore" "For this reason" असा जो "इदं कारण" मूल (फल) निदर्शक आजचा अर्थ आहे, तो "बोलून" "Having said" ह्या त्याच्या तथाकथित "पूर्वभणन" रूप मूलार्थावरून कसा सिद्ध झाला ? "ह्या कारणा (इदं कारण)"चा "पूर्वकालीन म्हणण्या" (पूर्व भणना)शीं काय संबंध ? "युरोपियन पंडित" म्हणतात म्हणून ? तसा तो संबंध बिलकूल नाही. म्हणून तर "This being said"च्या पुढे "This being the fact" असा एक मधला टप्पा ह्या असंबद्ध अर्थांना जोडण्यासाठी म्हणून "मोल्स्वर्थ" साहेबांना कल्पावा लागला आहे. पण "This being said" (म्हणजे 'हें म्हटलें गेल्यावर')" चा ह्या "This being the fact" (म्हणजे 'ही वस्तुस्थिति असल्याने')" शींहि पुनः काय संबंध ? "म्हणण्या"चा "कारणा"शीं जसा कांहीहि संबंध नाही; तसाच तो "वस्तुस्थिती"शींहि

नाही. वस्तुस्थिति अशी असतां, हे नसते संबंध बळेंच कल्पून अर्थान्तरें दर्शविणें कितपत बरोबर आहे ?

आणि " This being said " हा जो ह्या " म्हणून " चा मूलार्थ म्हणून ह्या " युरोपियन पंडिता "ने दिला आहे, तो तरी कितपत बरोबर आहे ? " म्हणणें to say " पासून " म्हणून " व्युत्पादिल्यास " Having said " एवढाच ह्या " म्हणून "चा कर्तरि अर्थ होईल; " being said " असा कर्मणि अर्थ ह्याचा होणार नाही. " म्हटलें जाऊन "चा असा कर्मणि अर्थ होईल. आणि विशेष महत्त्वाचें म्हणजे " This " (म्हणजे 'हें') ह्या मोल्स्वर्थ साहेबांच्या " म्हणून "च्या उपरिनिर्दिष्ट प्रस्तुत अर्थांशाला मुळांत कांहीच आधार नाही. " हें म्हणून " असें हें मूळ नाही. तर " म्हणून " असेंच तें फक्त आहे. मग " मोल्स्वर्थ " साहेबांनी हें " This " (म्हणजे 'हें') कोठून आणलें ? " हें " काय ? " युरोपियन पंडितांनी मराठी भाषेचा अभ्यास 'फार' केला आहे " त्याचें हें निदर्शक की काय ?

खरी गोष्ट अशी आहे की, " This " म्हणजे " हें " हा " इदं "रूप अर्थांशच "म्हणून" म्हणजे "ह्यामुळे" "ह्यासाठी" "ह्यास्तव" "ह्या कारणामुळे" " Therefore " " For this reason " ह्या प्रस्तुत शब्दाच्या एकूण अर्थांत प्राणभूत मुख्य अर्थांश आहे. " म्हणणें to say " ह्यापासून हा प्रस्तुत " म्हणून " शब्द व्युत्पादिल्यास, हा प्राणभूत मुख्य अर्थांश मुळीच प्रदर्शित होत नाही. आणि तो तर असा अवश्य प्रदर्शित व्हायला हवा. ह्याचाच अर्थ हा की, " म्हणणें to say " ह्यापासून मोल्स्वर्थ साहेबांनी दिलेली प्रस्तुत " म्हणून "ची व्युत्पत्ति सर्वथा चूक आहे. " हे (इदं) " ह्या अर्थाच्या शब्दापासून असलेली प्रस्तुत " म्हणून "ची व्युत्पत्ति वास्तविक बरोबर आहे. पण इतका विचार करतो कोण ? " म्हणणें " हा धातु व " म्हणून " हा शब्द ह्या दोहोंचें रूपसाम्य आहे ना ? झालें तर ! मग अगदी बेधडक " म्हणणें " ही " म्हणून "ची व्युत्पत्ति द्यावी ! ! अर्थ जुळत नसेल, तर बळेंच कसा तरी जुळवून वर त्यास " अर्थान्तर " असें गोंडस शास्त्रीय (!) नांव द्यावें. आणि हें सर्व करतांना " ही व्युत्पत्ति 'ऐतिहासिक व तौलनिक' आहे " असें तीविषयी म्हणावें व लिहावें; म्हणजे झालें ! ! !......

" सरस्वति-कोशां "त " म्हणणें " हीच प्रस्तुत " म्हणून "ची व्युत्पत्ति दिली आहे. " महाराष्ट्र शब्दकोशां "तहि हीच व्युत्पत्ति आहे. फक्त " भण्=म्हणणें " हा संस्कृत धातुहि त्यांत अधिक दिला आहे. " मराठी शब्द-रत्नाकरां "त ह्याची व्युत्पत्ति मुळी दिलीच नाही. ह्या व्युत्पत्तिवरून " म्हणून "चा " ह्यामुळे " " ह्या कारणासाठीं " हा अर्थ अर्थांत मुळींच प्रतीत होत नाही. तसा तो प्रतीत होण्यास त्याची यापुढील अर्थसिद्धिच पाहिली पाहिजे.

सदर अर्थसिद्धि अशी :—

"म्हणून"ची अर्थसिद्धि

अर्थदृष्ट्या " म्हणून " हा प्रस्तुत मराठी शब्द " म्ह–णून " असा सावयव आहे' म्हणजे, अर्थदृष्ट्या "म्हणून" ह्या प्रस्तुत मराठी शब्दाचे (१) " म्ह " व (२) " णून ". असे दोन अवयव आहेत. पैकी (१) " म्ह " हा पहिला अवयव " स्म " ह्या वैदिक (छांदस) संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे; व (२) " णून " हा दुसरा अवयव " नूनम् " ह्या संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे. "म्ह–णून" म्हणजेच " म्हणून " हा सबंध प्रस्तुत मराठी

शब्द "स्म–नूनम्" म्हणजेच "स्मनूनम्" ह्या सबंध संयुक्त संस्कृत शब्दाशीं असा संबद्ध आहे. (१) "स्म" ह्या वैदिक (छांदस) संस्कृत शब्दाचा अर्थ "ह्यामुळें" "ह्या कारणामुळें" असा आहे. " इन्द्रावरुणावभ्यातपन्ति माघान्यर्यो वनुषामरातयः । युवं हि वस्व उभयस्य राजथोध स्मानोऽवतं पार्ये दिवि "(—ऋग्वेद, मण्डल ७, सूक्त ८३, ऋचा ५), ह्या दाशराज्ञयुद्धविषयक ऐन्द्रावरुण सूक्तांतील ऋचेच्या ४थ्या पादांत हा "स्म" शब्द आला आहे. "स्मा" असा जरी "आ"-कारान्त हा शब्द येथे प्रत्यक्षांत असला, तरी "स्म" असा "अ" कारान्तच तो येथे विवक्षित आहे. पदपाठांतहि तो "स्म" असाच "अ" कारान्तच आढळतो. जसें "कस्मात्" म्हणजे "कशामुळे", "यस्मात्" म्हणजे "ज्यामुळे", "तस्मात्" म्हणजे "त्यामुळे", तसेंच "अस्मात्" म्हणजे "ह्यामुळे" "ह्या कारणामुळे." "अस्मात्" म्हणजे "ह्यामुळे" "ह्या कारणामुळे" ("इदं" म्हणजे "हें"चें पंचमीचें एकवचन नपुं.)च्याच आद्यन्तवर्णनाशाने व "आ"चा "अ" होऊन हा "स्म" शब्द वास्तविक बनला आहे. "अस्मात्="स्मात्"= "स्मा"="स्म" म्हणून याचा अर्थ "ह्यामुळे" "ह्या कारणामुळे" असा आहे. "अतः कारणात्" म्हणजे "ह्या कारणामुळे" असाच ह्या "स्म"चा अर्थ सायणाचार्यांनीहि येथे दिला आहे. "So" "Therefore" असे सायणाचार्यांच्यासारखेच अर्थ अनुक्रमें ग्रिफिथ् विल्सन, ह्यांनीहि ह्या "स्म"चे येथे दिले आहेत. "हि" ह्या येथील पूर्वपदाचा "because" असा हेतुरूप अर्थ असल्याने तत्संबंधीच "स्म" ह्या येथील प्रस्तुत तत्संबंधित उत्तरपदाचा अर्थ अर्थात् "So" "Therefore" असा फलरूपच असणार. " यत्त्वा तुरीय...यजामहे । अध स्मानो ददिर्भव" (ऋ. १, ४, १५, १०,) यांतहि "स्मा"चा अर्थ "म्हणून" "Therefore" असाच आहे. "अध" ह्या "स्म" च्या येथील पूर्वपदाचा अर्थ "अथ" म्हणजे "आणि" असा आहे. "Used like अथ as an inceptive particle in the sense of '.:.' 'and' '...' etc." असाच "अध" ह्या वैदिक शब्दाचा अर्थ आपट्यांच्या कोशांतहि दिलेला आहे. "...अध स्म ते व्रजनं कृष्णमस्ति " (ऋ., मं. ७, अ. १, सू. ३, ऋ. २), यांतील "अध"चा अर्थ "and" असाच आहे. परिणामतः "अध" हा येथे असा जवळजवळ निरर्थकच आहे. "आणि ह्यामुळे" " आणि ह्या कारणामुळे " म्हणजे अर्थात् जवळ जवळ नुसतें "ह्यामुळे" " ह्या कारणामुळे " असाच अर्थ होतो. तर, ह्याप्रमाणे " स्म " ह्या वैदिक (छांदस) संस्कृत शब्दाचा अर्थ " ह्यामुळे " "ह्या कारणामुळे" असा आहे; आणि (२) "नूनम्" ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ " खरोखर " असा आहे. " स्म-नूनम् " ह्या सबंध संयुक्त संस्कृत शब्दाचा अर्थ " ह्यामुळे खरोखर " " ह्या कारणामुळे खरोखर " असा ह्यामुळे होतो. " अध " हा उपरिनिर्दिष्ट "अधस्म" मध्ये जसा जवळ जवळ निरर्थच आहे, तसाच " नूनम् " हाहि " स्म-नूनम् " मध्ये जवळ जवळ निरर्थच आहे. "ह्यामुळे खरोखर" "ह्या कारणामुळे खरोखर" म्हणजे जवळ जवळ नुसतें " ह्यामुळे " " ह्या कारणामुळे " असाच वास्तविक अर्थ होतो. "कोण" ह्या मराठी शब्दाची अर्थसिद्धि येथे पहाण्यासारखी आहे. "को नु" म्हणजे " कोण बरें ? " ("कः=कोण ?"; "नु" = "बरें") ह्या संयुक्त संस्कृत शब्दापासून "को ण" म्हणजेच " कोण" (="कोण?") हा मराठी शब्द (प्रश्नार्थक सर्वनाम) आला आहे. म्हणून " कोण बरें ? " असाच याचा वास्तविक शब्दशः अर्थ आहे. पण " कोण बरें ?" आणि " कोण ? " हे जवळ जवळ एकच अर्थ होत. म्हणून, "कोण?" एवढाच फक्त ह्या "को ण"चा म्हणजेच "कोण"चा मराठींत अर्थ होतो. त्याचप्रमाणे, ह्या

"स्म-नूनम्"चाहि अर्थ "ह्यामुळे" "ह्या कारणामुळे" एवढाच फक्त होतो. आणि "म्हणून" हा प्रस्तुत मराठी शब्द "स्म-नूनम् (अस्मान्नूनम्)" ह्या प्रस्तुत संस्कृत संयुक्त शब्दयुग्माशीं अर्थदृष्टया असा संबद्ध असल्याने, त्याचाहि अर्थ " ह्यामुळे खरोखर " " ह्यामुळे " " ह्या कारणामुळे" असा—" स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " ह्या अर्थाप्रमाणेच अर्थात् होतो.

ध्वनिदृष्टयाहि " म्हणून " हा प्रस्तुत मराठी शब्द " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " ह्या प्रस्तुत संस्कृत संयुक्त शब्दयुग्माशीं संबद्ध आहे. वर्णविकृति व वर्णनाश ह्या ध्वनिशास्त्रांतील सुप्रसिद्ध नियमांनुसार " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " चेंच " म्हणून " असें रूपांतर बनतें. (१) " भ्रातृजाया " (म्हणजे " भावजय ") " एकादश " (म्हणजे " अकरा ") ह्या संस्कृत शब्दांशीं अनुक्रमें अर्थसिद्ध असलेल्या " भावजय " (म्हणजे " भावजय ") " अकरा " (म्हणजे " अकरा ") ह्या मराठी शब्दांत मूळ मध्य " आ " चा " अ " झालेला आढळतो; त्याचप्रमाणे " अस्मात् " ह्या " अस्मान्नूनम् " मधील पहिल्या अवयवांतील मध्य " आ " चा " अ " होतो, व ह्या " अस्मात् " चेंच असें " अस्मत् " बनतें; संस्कृत " अरण्य "शीं अर्थसिद्ध असलेल्या मराठी " रान " ह्या शब्दांत मूळच्या आद्य " अ " चा नाश झालेला आहे (व मग राहिलेल्या " रण्य " चेंच " रान " बनलेलें आहे); संस्कृत " अनन्तरम् " (म्हणजे " नंतर ") शीं अर्थसिद्ध असलेल्या मराठी " नंतर " ह्या शब्दांतहि मूळच्या आद्य " अ " चा नाश झालेला आहे; त्याचप्रमाणे " अस्मत् " ह्या (" अस्मात् " च्याच) वरील रूपांतीलहि आद्य " अ " चा नाश होतो, व नुसतेंच " स्मत् " रहातें; " जगत् " (म्हणजे "जग") ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या " जग " (म्हणजे " जग ") ह्या मराठी शब्दांत मूळच्या अंत्य "त्" चा नाश झालेला आहे; त्याचप्रमाणे "स्मत् " ह्या ("अस्मात्"च्या) वरील रूपांतीलहि अंत्य " त् " चा नाश होतो, व नुसताच " स्म " राहतो. " उपाध्याय " ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या " झा " (एक आडनांव, जसें ' गंगानाथ झा ') ह्या शब्दांत तर मूळच्या आद्य व अन्त्य (आणि मध्य सुद्धा) वर्णांचा (म्हणजे अनुक्रमें " उ " व " य ") (आणि " पा " चा सुद्धा) नाश झालेला आहे (व राहिलेल्या " ध्या " मधील " ध् " चा " झ् " होऊन " ध्या " चेंच मग असें " झा " बनलेलें आहे); ह्याप्रमाणे सुद्धा, " अस्मत् " ह्या (" अस्मात्"च्या) वरील रूपांतीलहि आद्य व अन्त्य अशा दोन्हीहि वर्णांचा (म्हणजे आद्य " अ " चा व अन्त्य " त् " चाहि) नाश होतो, व नुसताच " स्म " राहतो; हा " स्म " म्हणजेच अर्थात् " स्म-नूनम् " ह्या उपर्युल्लिखित संयुक्त संस्कृत शब्दांतील " स्म " हा आद्य अवयव होय; संस्कृत " द्वासप्तति " (म्हणजे " बाहत्तर ") शीं अर्थसिद्ध असलेल्या " बाहत्तर " (म्हणजे " बाहत्तर " [७२]) ह्या मराठी शब्दांत मूळच्या " स् " चा " ह् " झालेला आहे; त्याचप्रमाणे " स्म " ह्या (" अस्मात्"च्या) वरील रूपांतीलहि " स्"चा " ह् " होतो, व व " स्म " चेंच असें "ह्म" बनतें; " ब्राह्मण " (म्हणजे " ब्राह्मण जातीचा मनुष्य " " a Brahmin ", ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या "ब्राम्हण" (म्हणजे "ब्राम्हण जातीचा माणूस ", ह्या मराठी शब्दांत मूळच्या " ह्म " चा वर्णविपर्यया (metathesis) ने " म्ह " झालेला आहे; (म्हणजे " ह् " व "म" ह्या अक्षरांच्या स्थानांची ऊर्फ क्रमाची उलटापालट झालेली आहे); त्याचप्रमाणे " ह्म " ह्या (" अस्मात्"च्या) वरील रूपांतील " ह्म " चाहि " म्ह " होतो, व ह्या " ह्म " चेंच असें " म्ह " बनतें; " स्म (अस्मात्)"

ह्या मूळच्या संस्कृत शब्दा (रूपा) चेंच "म्ह" असें रूप ह्याप्रमाणे अंततः बनतें; ("अस्मात्"= "अस्मत्"="स्मत्"=) "स्म" ("अस्मत्"= "स्म") = "ह्म"= म्ह"; हें "म्ह" रूप म्हणजेच अर्थात् "म्ह" हा "म्हणून" ह्या प्रस्तुत मराठी शब्दांतील आद्य अवयव होय; तो "स्म (अस्मात्)" ह्या "स्मनूनम् (अस्मान्नूनम्)" ह्या प्रस्तुत संयुक्त संस्कृत शब्दयुग्मांतील "स्म (अस्मात्)" ह्या आद्य अवयवांशीं ध्वनिदृष्ट्या असा संबद्ध आहे. (२) "पानीय" (म्हणजे "पाणी") ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या "पाणी" (म्हणजे "पाणी") ह्या मराठी शब्दांत मूळच्या "न्" चा "ण्" झालेला आहे (व अंत्य "य" चा नाश झालेला आहे); त्याचप्रमाणे "नूनम्" ह्या "अस्मान्नूनम्" मधील अन्त्य शब्दांतील आद्य "न्" चाहि "ण्" होतो, व ह्या "नूनम्" चेंच असें "णूनम्" बनतें. "सत्वरम्" (म्हणजे "लौकर") ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या "सत्वर" (म्हणजे "लौकर") ह्या मराठी शब्दांत अंत्य "म्" चा नाश झालेला आहे; त्याच-प्रमाणे "णूनम्" ह्या ("नूनम्" च्या) वरील रूपांतीलहि अंत्य "म्" चा नाश होतो, व "णूनम्" चेंच असें "णून" बनतें. "नूनम्" ह्या "अस्मास्नूनम्" मधील अंत्य शब्दाचेंच "णून" असें रूप ह्याप्रमाणे बनतें. "नूनम्" "णूनम्" = "णून". "णून" हा "म्हणून" ह्या प्रस्तुत मराठी शब्दाचा दुसरा अवयव "नूनम्" ह्या "स्मनूनम् (अस्मान्नूनम्)" ह्या प्रस्तुत संस्कृत संयुक्त शब्दयुग्मांतील दुसऱ्या शब्दाशीं ध्वनिदृष्ट्या असा संबद्ध आहे. "म्ह—णून" म्हणजेच "म्हणून" हा सबंध प्रस्तुत मराठी शब्द "स्म--नूनम् (अस्मात् नूनम्)" म्हणजेच "स्मनूनन् (अस्मान्नू-नम्)" ह्या प्रस्तुत संस्कृत संयुक्त शब्दयुग्माशीं ध्वनिदृष्ट्याहि असा संबद्ध ठरतो. ["अस्मात् नूनम्" = "अस्मान्नूनम्" (संधि);="स्मानून" (वर्णनाश—आद्य, मध्य,अंत्य; 'अ' 'न्' 'म्' चा नाश); = "स्मनून" (वर्णविकृति; "आ" चा "अ)"; "ह्मनून" (वर्णविकृति; "स्" चा "ह्"); "म्हनून" (वर्णविपर्यय); "म्हणून" (वर्णविकृति; "न्" चा "ण्").

ध्वनिदृष्ट्या व अर्थदृष्ट्या अशा दोन्हीहि दृष्टींनी "म्हणून" हा प्रस्तुत मराठी शब्द "अस्मान्नूनम् (स्मनूनम्)" ह्या प्रस्तुत संस्कृत संयुक्त शब्दयुग्माशीं असा संबद्ध असल्याने, "अस्मान्नूनम् (स्मनूनम्)" हें प्रस्तुत संस्कृत संयुक्त शब्दयुग्म "म्हणून" ह्या प्रस्तुत मराठी शब्दाची अशी अर्थसिद्धि, म्हणजेच येथे यथावत् व्युत्पत्ति, ठरतें.

कांहीं शंका

"म्हणून" च्या "स्मनूनम् (अस्मान्नूनम्)" ह्या उपर्युक्त अर्थसिद्धीविरुद्ध कोणी कदाचित् कांहीं शंका घेतील. त्यांतील कांहीं संभवनीय शंकांचा यापुढे विचार केला आहे:—

शंका (१):—"स्मनूनम् (अस्मान्नूनम्)" अशा संयुक्त स्वरूपांत हें शब्दयुग्म मूळ संस्कृतांत नेहमी आढळतें काय? तसें तें आढळत नसेल, तर "म्हणून" ची अर्थसिद्धि (व्युत्पत्ति) तें कसें होऊं शकेल?

समाधानः— "स्मनूनम् (अस्मानन्नूम्)" ह्या संयुक्त स्वरूपांत हें शब्दयुग्म मूळ संस्कृतांत नेहमी आढळतें, असें नाही. "स्म (अस्मात्)" व "नूनम्" हे त्याचे घटक अवयव मात्र संस्कृतांत अर्थात् आढळतात. घटक अवयव आढळत असतां विवक्षित घटित संयुक्त स्वरूपांतदेखील ते आढळलेच पाहिजेत, तरच त्याचें तें विशिष्ट घटित संयुक्त स्वरूप एखाद्या शब्दाची अर्थसिद्धि (व्युत्पत्ति) होऊं शकेल, नाहीं तर नाहीं, असा दंडक मुळीच नाहीं. उदा-हरणार्थ, "कोण" ह्या मराठी प्रश्नार्थक सर्वनामाची व्युत्पत्ति (अर्थसिद्धि) "को नु" ही आहे. "को नु" हें "कः" आणि "नु" ह्या दोन घटक अवयवांनी घटित असें संस्कृत

संयुक्त शब्दयुग्म आहे. पण तें " को नु " अशा विशिष्ट संयुक्त स्वरूपांत मूळ संस्कृतांत नेहमी आढळतें, असें नाही. आणि तरीहि तें मराठी " कोण " ची अर्थसिद्धि अगर व्युत्पत्ति होऊं शकते. तद्वतच " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " हेंहि " म्हणून " ची अर्थसिद्धि ऊर्फ व्युत्पत्ति होऊं शकेल.

शंका (२):—" स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " ह्या संयुक्त संस्कृत शब्दयुग्माचें एक तरी उदाहरण संस्कृत वाङ्मयांतून देतां येईल काय ? तसें तें देतां येत नसल्यास सदर " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " हें " म्हणून " ची अर्थसिद्धि कशी होऊं शकेल ?

समाधानः—ह्या शंकेचें समाधान पहिल्या शंकेच्या समाधानांतच बरेंचसें आलेलें आहे. घटक अवयवांचीं उदाहरणें असल्यास, घटित समासांचीं उदाहरणें आवश्यकच आहेत, असें नाही. भाषा ही मुख्यतः बोलण्यासाठी असते. बोलभाषेंतील एकूण एक निरपवाद सर्वचे सर्व घटक वा घटित शब्द लिखित वाङ्मयांत नोंदलेले असतातच, असें नाही; असें असणें शक्यहि नाही. सर्वचें सर्व लिखित वाङ्मय संशोधनास उपलब्ध होतेंच असेंहि नाही; असें तें होणेंहि शक्य नाही.......ह्या व अशांसारख्याच आणखीहि इतर अनेक कारणांमुळे, अगदी प्रत्येक घटक व घटित शब्दाचें उदाहरण लिखित वाङ्मयांतून काढून देतां आलेंच पाहिजे, तरच तो शब्द दुसऱ्या शब्दाची अर्थसिद्धि अगर व्युत्पत्ति होऊं शकेल, अन्यथा नाही, हा आग्रह अशास्त्रीय आहे. बोलभाषेंत ऊर्फ बोलींत बोलणारा शब्दांचे यथेष्ट संयोग व उपयोग करतो, प्रसंगीं भाषेच्या एकंदर ठेवणीनुरूप नवीन शब्दहि तो निर्मितो; तें सर्वच लिखित वाङ्मयांत नोंदणें अनैसर्गिक, अशक्य, अनिष्ट व अनावश्यकहि आहे. " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " चें ह्याच विशिष्ट स्वरूपांतील एकहि उदाहरण प्रस्तुत लेखकास उपलब्ध असलेल्या संस्कृत वाङ्मयांतून काढून देतां येत नाही, असें जरी वादाकरिता क्षणभर मानलें, तरी त्यामुळे वर दर्शविल्या-प्रमाणे सदर " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " हें " म्हणून " ची अर्थसिद्धि अगर व्युत्पत्ति होण्यास कांहीच प्रत्यवाय नाही.

शंका (३):—" म्हणून " ची " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " ही अर्थसिद्धि देतांना वर जो उभयतांचा ध्वनिसंबंध दर्शविला आहे, तो प्रथम अवयवशः व नंतर कृत्स्नशः असा उभयविध व वेगवेगळा दर्शविला आहे. मग यांतील खरा कोणता ?

दुसऱ्या शब्दांत हेंच म्हणायचें म्हणजे " स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " चें " म्हणून " हें रूपान्तर अन्ततः कसें झालें तें दर्शवितांना जीं मधलीं रूपान्तरें दर्शविलीं आहेत, तीं प्रथम अवयवशः [" स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " चें " म्ह " ह्या अवयवांत रूपान्तर कसें झालें तें दर्शविण्यासाठी, तसेंच " नूनम् " चें " णून " ह्या अवयवांत रूपान्तर कसें झालें तें दर्शविण्यासाठी], व नंतर पुनः कृत्स्नशः [" स्मनूनम् (अस्मान्नूनम्) " ह्या सबंध शब्द-युग्माचें " म्हणून " ह्या सबंध शब्दांत रूपान्तर कसें झालें तें दर्शविण्यासाठी], अशीं दोनदा व दोन निरनिराळ्या रीतींनी दर्शविलीं आहेत. मग यांतील खरीं रूपान्तरें कोणतीं ?

समाधानः— अर्थसिद्धीसाठी जो ध्वनिशास्त्रदृष्ट्या रूपान्तरांचा संबंध दाखवावा लागतो, तो त्या विशिष्ट संबंधित रूपांतील ध्वनि कसे सुसंबद्ध आहेत, एका रूपांतील ध्वनि हे दुसऱ्या रूपांतील ध्वनींचीं कशीं सुसंबद्ध शास्त्रीय रूपांतरें ऊर्फ ध्वन्यन्तरें आहेत, एवढेंच फक्त दाखविण्यासाठी होय. मग हें अवयवशः दाखविलें काय, अगर कृत्स्नशः दाखविलें काय, अगर दोन्ही रीतींनी दाखविलें काय, सर्व सारखेंच. जेणेंकरून हा ध्वनिसंबंध उत्तम तऱ्हेने

कळेल, तसा तो दाखवायचा, एवढेंच. इतकेंच नव्हे, तर ह्यांत क्रमहि विवक्षित नसतो म्हणजे असें, की "म्हणून". व "स्मनूनम् (अस्मान्नूनम्)" ह्यांचा ध्वनिसंबंध अवयवशः दाखवितांना म्हणजेच "स्म (अस्मात्)"चें "म्ह" हें रूपान्तर अन्ततः कसें झालें तें दाखवितांना "स्म (अस्मात् = अस्मत् = स्मत् = स्म)" = "ह्म" = "म्ह" असा क्रम वर दर्शविलेला आहे; पण ह्याचा अर्थ असा नव्हे की ह्याच विशिष्ट क्रमाने व हींच सर्व रूपान्तरें अशींच होत गेलीं. "स्म (अस्मात् = स्मात् = स्मा = स्म)" = म्स = "म्ह" असाहि अगर याहूनहि वेगळा ह्या क्रम व हीं रूपान्तरें देतां येतील. पण ह्या कोठल्याहि रूपान्तराच्या वा क्रमाच्या प्रकारांत ध्वनिशास्त्रांतील नियमांनुसारच "स्म (अस्मात्)" चें "म्ह" हें रूपान्तर शेवटीं बनलें आहे, एवढेंच फक्त दाखविण्याचा ह्या सर्व प्रकारांपैकीं कोणत्याहि प्रकाराचा उद्देश असतो. ह्या अनेक प्रकारांपैकी अमुक एक विशिष्ट प्रकार मुद्दाम निवडण्याला निवडणाऱ्याच्या इच्छेशिवाय अन्य असें कांहीच कारण नसतें. निवडणाऱ्याने ही विशिष्ट निवड केवळ अशोकवनिका-न्यायानेच, म्हणजे कोठल्याहि विशिष्ट कारणाशिवायच, केलेली असते. त्यांत त्याला अमुक एक विशिष्टच रूपान्तरें अथवा त्या रूपान्तराचा अमुक एक विशिष्टच ठराविक असा कालानुक्रम मुळींच दाखवावयाचा नसतो. इतकेंच काय, पण ह्या रूपान्तरांची अमुक एक विशिष्टच संख्याहि दर्शविण्याचा त्याचा इरादा नसतो. म्हणूनच या "अस्मात्"ची "स्मत्" "स्म" अशीं पुढचीं दोन रूपान्तरें दर्शविलीं आहेत, अगर "स्म" एवढें एकच हें पुढचें रूपान्तर म्हणून दर्शविलें आहे. इतकेंच केवळ नव्हे, तर "अस्मत्" "स्मत्" "स्म" "ह्म" ह्या वर दर्शविलेल्या "अस्मात्" व "म्ह" ह्यांच्या दरम्यानच्या एकूण चार रूपान्तरांऐवजी वास्तविक प्रत्यक्षांत तीनच असतील, अगर दोन, एक किंवा प्रसंगीं कांहीहि नसेल. म्हणजे "अस्मात्" चेंच एकदम उपर्युल्लिखित आवश्यक त्या सर्व नियमांप्रमाणे "स्म" हें वरील वेदावतरणांतील रूप, अगर "म्ह" हेंच "म्हणून" मधील प्रत्यक्ष अंतिम रूपहि झालें असेल. "स्म" च्या माध्यमानेच हें "म्ह" झालें असेल, असेंहि सर्वथा नाही. क्वचित् प्रांतविशेषीं तसें तें झालें असेल, तर क्वचित् प्रांतांतरीं तें तसें झालें नसेलहि. तथापि हीं मधलीं एकूण चार रूपान्तरें अशीं निरनिराळीं दर्शविण्याचा हेतु इतकाच की सर्व वर्णविकार नीटपणें कळावेत. म्हणून एकएकच वर्णविकार एकएका स्वतंत्र रूपांतराच्या साहाय्याने निरनिराळा दाखविला आहे. "अस्मत्" हें रूपान्तर कांही काळ अस्तित्वांत राहिल्यानंतर "स्मत्" हें त्याच्या पुढील रूपान्तर झालें; तें कांही काळ अस्तित्वांत राहिल्यानंतर "स्म" हें त्याच्या पुढील रूपान्तर अस्तित्वांत आलें; अशा रीतीने हीं मधलीं सर्वचीं सर्व चारहि रूपान्तरें प्रत्येकीं कांही काळ प्रत्यक्ष अस्तित्वांत होतीं, व नंतरच "म्ह" हें शेवटचें आजचें रूपान्तर झालें, व तें असें एकूण पांचवें आता आज अस्तित्वांत आहे, असें प्रतिपादण्याचा अर्थात् येथे किंचितहि हेतु नाही. तसेंच, हीं मधलीं एक अगर आधिक रूपान्तरें कधीच अस्तित्वांत नव्हतीं, असेंहि प्रतिपादण्याचा यांत हेतु नाही. हीं मधलीं रूपें (रुपान्तरें) खरोखरींच ह्या अगर इतर स्वरूपांत अस्तित्वांत होतीं किंवा नाही, असल्यास तीं कोणत्या विशिष्ट स्वरूपांत अस्तित्वांत होतीं, कोणत्या कालानुक्रमाने अस्तित्वांत होतीं, म्हणजे कोणतें विशिष्ट रूप प्रथम अस्तित्वांत होतें व कोणतें विशिष्ट रूप नंतर अस्तित्वांत आलें, कोणत्या ठिकाणीं तें प्रथम अस्तिांत आलें व कोणत्या अन्य ठिकाणीं तेथून तें गेलें, कोणत्या भाषेंत प्रथम तें अस्तित्वांत आलें व कोणत्या अन्य भाषेंत तेथून तें (गेलें असल्यास) नंतर गेलें वगैरे रूप-स्वरूपाच्या, रूपानुक्रमाच्या, कालानुक्रमाच्या, स्थलानुक्रमाच्या, भाषानुक्रमाच्या प्रश्नांशीं अर्थ-

सिद्धीस अगदी कांहीहि कर्तव्य नाही. तसेंच, व्युत्पत्तीसहि ह्या प्रश्नांशीं कांहीहि कर्तव्य नाही. व्युत्पाद्य शब्दांच्या अर्थाशीं जर ह्या रूपान्तरांचा संबंध येत असेल, म्हणजे हीं रूपान्तरें व्युत्पाद्य शब्दांचीं जर अर्थान्तरें दर्शवीत असतील, तरच अर्थान्तरांच्या विचारासाठी म्हणून व त्या अर्थान्तरांच्या विचारांपुरताच केवळ ह्या रूपान्तरांचा विचार अर्थसिध्दीस अगर व्युत्पत्तीस करावा लागतो, एरवी नाही. ही गोष्ट दृष्टीआड केल्यामुळे उगाचच रूपान्तरांचें फाजील स्तोम तथाकथित अद्यावत् " ऐतिहासिक व तौलनिक " व्युत्पत्ति–पद्धतींत माजविलेलें आढळतें. इतकेंच केवळ नव्हे, तर व्युत्पाद्य शब्दाच्या प्रत्यक्ष अर्थाशीं अगदी कांहीहि संबंध नसलेली अशी अर्थहीन अनर्थनिष्ठ निरर्थ व्युत्पत्ति तर व्यर्थ द्यायचीच, आणि शिवाय वर व्युत्पाद्य शब्दाच्या व त्याचप्रमाणे कधी कधी त्याच्या ह्या तथाकथित मूळाच्याहि अर्थाशीं अगदी कसलाहि संबंध नसलेली विविध भाषांतील शब्दरूपें केवळ त्यांच्या ध्वनिसाम्यामुळे ऊर्फ रूपसाम्यामुळे उगीचच एकापुढे एक मांडून ठेवायचीं,व अशा ह्या शब्दरूपांचें व्यर्थ अवडम्बर माजवायचें, हा प्रकार ह्या तथाकथित " ऐतिहासिक व तौलनिक " व्युत्पत्ति–पद्धतींत प्रमाणातीत आढळतो. स्थलाभावास्तव याचें एकच यदृच्छाप्राप्त उदाहरण यापुढे दिलें आहे तें पहावें:–

प्रा. कुलकर्ण्यांच्या तथाकथित " ऐतिहासिक व तौलनिक " " मराठी व्युत्पत्ति – कोशां " त " आवळ (णें), आवाळ (णें) " ह्या शब्दापुढे पुढील माहिती दिली आहे: " अकि. हयगय होणें, दुर्लक्ष होणें (संवर्धनासंबंधीं). To be neglected [सं. आ+बाध् १ लोडने; कान. वाळ=सुख; सिं. आवालो = मित्रहीन] ". " आवळ (णें), आवाळ (णें) " ची फक्त एवढीच माहिती सदर कोशांत दिलेली आहे, आणि तीहि अशा प्रकारची ! ह्यांत चौकटी कंसांत जी माहिती दिली आहे, तीच ही सुप्रसिद्ध " ऐतिहासिक व तौलनिक" व्युत्पत्ति !! "आ+बाध् १ लोडने " ही " ऐतिहासिक " व्युत्पत्ति कशी ? हींत कोणता " इतिहास " दिला आहे ? हींतील " लोडने " म्हणजे काय ? त्याचा मराठींतील अर्थ नको काय ? " आवळ (णें), आवाळ (णें) चा अर्थ समजण्यास ह्या "ऐतिहासिक" (!) व्युत्पत्तीने काय मदत होते ? व्युत्पत्ति ही व्युत्पाद्य शब्दाच्या अर्थस्पष्टतेसाठी आहे ना ? मग व्युत्पत्तीचें हें उद्दिष्ट येथे कसें साधतें ?" " आवळ (णें), आवाळ (णें)" चा अर्थ " आ + बाध् १ " लोडने "ने स्पष्ट कसा होतो ? " आवळ (णें), आवाळ (णें) "ची ही व्युत्पत्ति अर्थोपेक्षक किंबहुना अर्थ " संबाधक " नाही काय ? " दुर्लक्ष होणें (संवर्धनासंबंधीं) " हा येथे मराठींत दिलेला अर्थ " To be neglected " ह्या येथेच ह्यापुढे दिलेल्या इंग्रजींतील अर्थाशीं सुसंगत आहे ? " To be neglected " म्हणजे " दुर्लक्ष होणें " का " दुर्लक्षित होणें " ? " दुर्लक्ष " व "दुर्लक्षित " हीं एकच काय "To be neglected" हें "अकि" आहे, का "कर्मणि" आहे ? "अकि" आणि " कर्मणि " एकच काय ? पण "आवळ(णें), आवाळ(णें)"चें हें उदाहरण केवळ दोष दाखविण्यासाठी येथे दिलेलें नाही. वर म्हटल्याप्रमाणे व्युत्पाद्य शब्दाच्या प्रत्यक्ष अर्थाशीं अगदी कांहीहि संबंध नसलेली अशी अर्थहीन अनर्थनिष्ठ निरर्थ व्युत्पत्ति तर व्यर्थ द्यायचीच, आणि शिवाय वर व्युत्पाद्य शब्दाच्या व त्याचप्रमाणे कधी कधी त्याच्या ह्या तथाकथित मूळाच्याहि अर्थाशीं अगदी कसलाहि संबंध नसलेलीं विविध भाषांतील शब्दरूपें केवळ त्यांच्या ध्वनिसाम्यामुळे ऊर्फ रूपसाम्यामुळे उगाचच एकापुढे एक मांडून ठेवायचीं, व अशा ह्या शब्दरूपांचें व्यर्थ अवडम्बर माजवायचें, हा प्रकार ह्या तथाकथित " ऐतिहासिक व तौलनिक " व्युत्पत्ति–पद्धतींत प्रमाणातीत

कसा आढळतो, तें दर्शविण्यासाटी हें उदाहरण येथे दिलेलें आहे. " कान. बाळ=सुख; सिं आबालो=मित्रहीन " हींच तीं येथील विवक्षित शब्दरूपें होत. " हयगय होणें " " दुर्लक्ष होणें " ह्या " आबळ(णें), आबाळ(णें) " ऱ्या तथाकथित अर्थाशीं अगर "आ+बाध् १ लोडने" ह्यांतील अर्थाशीं "सुख" व "मित्रहीन" ह्या अनुक्रमें कानडी "बाळ्" व सिंधी " आबालो " ह्या शब्दांच्या अर्थाचा अर्थाअर्थी संबंध काय? " बाळ " म्हणजे " सुख " व " अ – बाळ " म्हणजे " दुःख ", आणि " अ–बाळ " व " आ–बाळ " हीं एकच, असा कांहीं प्रकार कानडींत आहे काय? आणि त्यावरून " आ–बाळ (णें) " म्हणजे " दुःख देणें " (नामधातु) असा प्रथम अर्थ होऊन त्यावरून " हय-गय करणें " " दुर्लक्ष करणें " असें हें अर्थान्तर झालें आहे, अशासारखें कांहीं प्रा. कुल-कर्ण्यांस येथे म्हणावयाचें आहे काय? असें असेल, तर असें त्यांनी स्पष्ट शब्दांतच येथे कां म्हटलें नाही? का कानडी " बाळ = सुख " ह्याशीं संस्कृत " बाध् १ लोडने " हा शब्द विपरीत अर्थाने संबद्ध आहे? " मित्रहीना "चा तरी " लोडना "शीं अगर " हयगयी "शीं किंवा " दुर्लक्षा "शीं काय संबंध?...तात्पर्य असें की, कानडी बाळ=सुख ह्या शब्दाचा अगर सिंधी आबालो = मित्ररहित ह्याहि शब्दाचा "आबळ(णें) आबाळ(णें) = हयगय होणें, दुर्लक्ष होणें" ह्या तथाकथित प्रस्तुत मराठी शब्दाशीं अगर त्याच्या " आ + बाध् १ लोडनेहि ह्या तथाकथित संस्कृत मुळाशीं कोणताहि व्यौत्पत्तिक, ऐतिहासिक वा तौलनिक संबंध अर्थत: अगदी नाही. ध्वनितः ऊर्फ रूपतः मात्र यांचा संबंध अर्थातच उघड आहे. आणि ह्या ध्वनिसाम्यामुळेच केवळ हे शब्द असे येथे दिले आहेत. पण हें करणें कितपत योग्य आहे? अर्थाची अशी उपेक्षा करून चालेल काय? अर्थ हा शब्दाचा प्राण, व ध्वनि (ऊर्फ रूप) हें त्याचें शरीर होय, हाच प्रकार वास्तविक आहे ना? मग इकडे दुर्लक्ष करून अर्थनिरपेक्ष केवळ ध्वनिनिष्ठ अशीं हीं शब्दरूपें देणें बरोबर आहे काय? अर्थाला डावलून ध्वनीलाच असें प्राधान्य देणें ह्यापेक्षा ह्या प्रकरणीं अधिक अशास्त्रीय असें काय आहे?...व्युत्पत्ति ही व्युत्पत्ति होण्यासाठी प्रथम व प्रामुख्याने अर्थनिष्ठ असलीच पाहिजे. अर्थाला पहिलें प्राधान्य व ध्वनीला ऊर्फ रूपाला दुसरें दुय्यम प्राधान्य. हें सत्य व शास्त्रीय तत्त्व पाळलें तरच ती प्रथम व्युत्पत्ति होईल. आणि प्रथम ती अशी सत्य व शास्त्रीय व्युत्पत्ति झाली, म्हणजे मगच ती "ऐतिहासिक व तौलनिक"–हि करतां येईल. नाही तर मुळांत ती अर्थनिष्ठ अतएव सत्य व शास्त्रीय नसल्याने प्रथम मुळीं व्युत्पत्तिच होणार नाही; मग ती ऐतिहासिक व तौलनिक " कशी होणार? मुळांत विशेष्यच नाही, तर त्याचीं विशेषणें कशीं असणार? ...

" आ + बाध्. लोडने " ही "आबाळ (णें)" ह्या प्रस्तुत मराठी शब्दाची प्रा. कुल-कर्ण्यांनी दिलेली तथाकथित " ऐतिहासिक व तौलनिक " व्युत्पत्ति सर्वथा सदोष असल्याचें वर दर्शविलेंच आहे. निर्दोष व्युत्पत्ति आता पहाणें आहे. त्यासाठी याची अर्थसिद्धिच अर्थात् पाहिली पाहिजे. सदर अर्थसिद्धि अशी :––

अर्थदृष्ट्या " आबाळ (णें) " हा प्रस्तुत मराठी शब्द " आ–बाळ (णें) " असा सावयव आहे. म्हणजे, अर्थदृष्ट्या " आ–बाळ (णें) " ह्या प्रस्तुत मराठी शब्दाचे (१) "आ" व (२) " बाळ (णें) " असे दोन अवयव पडतात. पैकी (१) " आ " हा पहिला अवयव " अ " ह्या संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे; व (२) " बाळ (णें) " हा दुसरा अवयव " पाल (नं) " ह्या संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे. अर्थात् " आ–बाळ (णें) " हा सबंध प्रस्तुत मराठी शब्द " अ–पाल (नं) " ह्या सबंध सामासिक संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे.

" अ " हा संस्कृत शब्द " न " कारार्थी आहे. व " पाल (नं) " ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ " पाळ (णें) " " रक्षण (करणें) " " पोस (णें) " " पालन-पोषण (करणें) " "संगोपन (करणें)" "(संवर्धन करणें)" असा आहे. " न " काराचा येथील अर्थ " अपुरें " " अयोग्य " " नीट काळजीपूर्वक न केलेलें " " वाईट " (तत्सादृश्यमभावश्च तदन्यत्वं तदल्पता । अप्राशस्त्यं विरोधश्च नञर्थाः षट् प्रकीर्तिताः " यांत वर्णिलेला ४था "तदल्पता" अगर ५ वा " अप्राशस्त्यं ") असा आहे. अर्थात् " अ-पाल (नं) " ह्या सबंध सामासिक शब्दाचा अर्थ " नीट, काळजीपूर्वक संगोपन न करणें " " चांगल्या योग्य रीतीने संवर्धन न (करणें) " असा आहे. आणि " आ-वाळ (णें) " हा प्रस्तुत मराठी शब्द " अ-पाल(नं) " ह्या प्रस्तुत संस्कृत शब्दाशीं अर्थतः संबद्ध असल्याने, त्याचाहि अर्थ " नीट काळजीपूर्वक संगोपन न करणें " " चांगल्या योग्य रीतीने संवर्धन न करणें " असाच,-" अ-पाल (नं) " च्या अर्थाप्रमाणेच अर्थात्,-होतो.

ध्वनिदृष्ट्याहि " आवाळ (णें) " हा प्रस्तुत मराठी शब्द " अ-पाल (नं) " ह्या प्रस्तुत संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे. ध्वनिशास्त्रांतील वर्णविकृतीच्या नियमानुसार संस्कृत " अ-पाल (नं) "चेंच मराठी " आ-वाळ (णें) " होतें.

(१) " अ-यत्न " (म्हणजे ' ज्यासाठी प्रयत्न [करावा] लागला नाही, असा, ' आयता ' [द्रव्यलाभ वगैरे]) ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या " आ - याता " " आ - इता " (द्रव्य - लाभ वगैरे) ह्या मराठी शब्दांत मूळ संस्कृत " अ " चा " आ " झालेला आहे; त्याचप्रमाणे, " अ " ह्या " अ - पाल - (नं) " ह्या प्रस्तुत संस्कृत शब्दांतील पहिल्या अवयवाचाहि " आ " होतो. हा " आ " म्हणजेच अर्थात् "आ - वाळ (णें) " ह्या प्रस्तुत मराठी शब्दांतील "आ " हा आद्य अवयव होय. (२) (अ) " उप - विश " (म्हणजे " बैस ") ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या " ब-इस " (म्हणजे " बैस ") ह्या मराठी शब्दांत मूळ संस्कृत " प् " चा " ब् " झालेला आहे; त्याचप्रमाणे " पाल (नं) " ह्या " अ - पाल (नं) " ह्या प्रस्तुत संस्कृत शब्दांतील दुसऱ्या अवयवाच्या " प् " चाहि " व् " होतो, व " पाल (नं) " चेंच असें " वाल (नं) " होतें; (आ) " गल (नं) " (म्हणजे " गळणें ") ह्या संस्कृत शब्दाशीं अर्थसिद्ध असलेल्या " गळ (णें) " (म्हणजे " गळणें ") ह्या मराठी शब्दांत मूळ संस्कृत " ल् " चा "   " झाला आहे (व " नं " चा " णें " झाला आहे); त्याचप्रमाणे " वाल (नं) " ह्या " पाल (नं) " च्या वरील रूपांतीलहि " ल् " चा " "ळ्" होऊन (व "नं" चा "णें" होऊन) ह्या " वाल (नं) " चेंच मग " वाळ (णें) " असें रूप होतें; हें " वाळ(णें) " रूप म्हणजेच अर्थात् " आ - वाळ (णें) " ह्या प्रस्तुत मराठी शब्दांतील " वाळ (णें) " हा दुसरा अवयव होय. " पाल (नं) " ह्या " अ-पालनं " मधील दुसऱ्या अवयवाशीं " वाळ (णें) " हा " आ - वाळ - (णें) " मधील दुसरा अवयव ध्वनिदृष्ट्या असा संबद्ध ठरतो. " पाल (नं) " = " वाल (नं) " = " वाळ (णें) ". " आ - वाळ (णें) " हा प्रस्तुत सबंध मराठी शब्द " अ - पाल (नं) " ह्या प्रस्तुत सामासिक संस्कृत शब्दाशीं ध्वनिदृष्ट्याहि असा संबद्ध ठरतो. अर्थदृष्ट्या व ध्वनिदृष्ट्या अशा दोन्हीहि दृष्टींनी " आ-वाळ(णें) " हा प्रस्तुत मराठी शब्द " अ-पाल(नं) " ह्या प्रस्तुत संस्कृत शब्दाशीं असा संबद्ध असल्याने, " अ-पाल(नं)" हा प्रस्तुत संस्कृत शब्द " आ-वाळ-(णें) " ह्या

प्रस्तुत मराठी शब्दाची अशी अर्थसिद्धि ठरतो. ह्या अर्थसिद्धीवरून, सं. " अ-पाल (नं) " ही म. " आबाळ(णें) " ची यथायोग्य व्युत्पत्ति ठरते.

"नीट, काळजीपूर्वक संगोपन न करणें" " चांगल्या योग्य रीतीने संवर्धन न करणें " हा ह्या प्रस्तुत " आबाळ(णें) " चा अर्थ ह्या अर्थसिद्धीवरून असा ठरतो. म्हणजे "संगोपन" "संवर्धन" हा अर्थांश हा ह्या शब्दाच्या एकूण मुख्य अर्थाचाच एक प्रमुख भाग आहे. अर्थात्, तो असा प्रमुख म्हणूनच दर्शविला पाहिजे. "पाल(नं)" ह्या "अ-पाल (नं)" मधील दुसऱ्या अवयवाशीं अर्थसिद्ध असलेल्या " बाळ(णें) " ह्या " आ-बाळ(णें) " ह्यांतील दुसऱ्या अवयवाशीं तो अर्थसिद्ध असल्याचें वर दर्शविलेंच आहे. " बाळ(णें) " ह्या " आ--बाळ(णें) " तील उत्तरार्धाचाच मुळी " पालन (करणें) " " संगोपन (करणें) " " संवर्धन (करणें) " असा अर्थ ह्यामुळे असल्याचेंहि वर दर्शविलें आहेच. मग " संगोपन " " संवर्धन " ह्या अर्थाला गौण लेखून कसें चालेल ? पण, प्रा. कुलकर्ण्यांनी ह्या " संवर्धना"ला गौणच लेखलें आहे. " आ--बाळ(णें) " ह्या व्युत्पाद्य घटित शब्दाच्या कोणत्याहि घटक अवयवाचा " संवर्धन " हा अर्थ मुळी नाहीच; मुळांत नसलेला तो केवळ अर्थसौकर्यासाठी दिलेला आहे;— असें दर्शविण्यासाठी प्रा. कुलकर्ण्यांनी तो " हयगय होणें, दुर्लक्ष होणें (संवर्धनासंबंधीं) ". असा पुस्तीवजा कंसांत दिला आहे. मूळ मुख्य अर्थाचा कसला तरी हेंगाडा गोषवारा कसा तरी त्यांनी दिला आहे, इतकेंच !... " उपेक्ष (णें) " (म्हणजे " उपेक्षा करणें" " नीट लक्ष न देणें ") हीहि प्रस्तुत " आब (बा)ळ (णें) " ची आणखी एक अर्थसिद्धि आहे. पण स्थलाभावास्तव तिजविषयी येथे अधिक लिहितां येत नाही.

शंका ४:—"अस्मान्नूनम्" = "स्मानून" = "स्मनून" = " ह्मनून " = "म्हणून" हा जो " अस्मान्नूनम् " ह्या संस्कृत मूळाचा " म्हणून " ह्या मराठी अंतापर्यंतचा रूपानुक्रम वर दिला आहे, त्यांतील " अस्मान्नूनम् " व " म्हणून " या आद्यन्तांमधली " स्मानून " " स्मनून " " ह्मनून " हीं तीन रूपें प्रत्यक्ष प्राकृतांत आढळतात काय ? तशीं तीं प्रत्यक्ष आढळत नसलीं, तर तीं अशीं दर्शविणें कितपत बरोबर आहे ? मराठी भाषा जरी अंततः संस्कृतापासून व अत्यंततः वैदिक संस्कृतापासून आली असली, तरी ती प्राकृताच्या माध्यमानेच आली असल्याने, तींतील प्रत्येक शब्द प्राकृताच्या माध्यमानेच संस्कृताशीं शेवटीं मिळविला पाहिजे ना ?

समाधानः— ह्या शंकेचें समाधान बऱ्याच अंशाने वरील शंकेच्या समाधानांत आलेलें आहे. " स्मानून " " स्मनून " " ह्मनून " हीं " अस्मान्नूनम् "चीं " म्हणून " पर्यंतचीं मधलीं तीन रूपें प्रत्यक्ष प्राकृतांत आढळतात की नाहीत, ह्या प्रश्नाशीं अर्थसिद्धीला व व्युत्पत्तीला तादृश कर्तव्य नाही. तो ह्या रूपांच्या इतिहासाचा प्रश्न आहे. हीं रूपें प्रत्यक्ष प्राकृतांत असलीं व तीं तशीं प्रत्यक्ष असल्याचें प्राकृतांतील प्रत्यक्ष उदाहरणें देऊन दर्शविलें, तर तो त्या रूपांचा इतिहास दिला, असें होईल. असा इतिहास इष्ट आहे, हें खरें; पण अर्थसिध्दीला वा व्युत्पत्तीला तो अवश्य आहे, असें मात्र नाही. मुळांत प्रथम अर्थसिद्धि व नंतर ती " ऐतिहासिक",-हें अगदी उघड आहे. पण वर दर्शविल्याप्रमाणे तथाकथित अद्यावत् " ऐतिहासिक " पद्धतींत हें उलटें असतें. तींत रूपांनाच पहिलें महत्त्व असल्याने, व्युत्पाद्य शब्दाच्या अर्थाकडे दुर्लक्ष असतें. ध्वनीने ऊर्फ रूपाने व्युत्पाद्य शब्दासारख्या पण अर्थाने ऊर्फ वस्तुतः प्रत्यक्ष व्युत्पाद्य शब्द नसलेल्या अशा दुसऱ्याच कोणत्या तरी शब्दाची ती व्युत्पत्ति असते. "म्हणून"च्या तथाकथित " ऐतिहासिक" व्युत्पत्तीच्या बाबतींतहि नेमकें हेंच झालेलें आहे.

" म्हणून " म्हणजे " ह्यामुळे " " ह्या कारणास्तव " " Therefore " "For this reason" "Hence" "So" हा फलपर्यवसायी " इदं कारण " मूलवाचक शब्द निराळा; व " म्हणून " म्हणजे " बोलून " " Having said " हा पूर्वकालदर्शक फल-संबद्ध " पूर्वकालभणन " वाचक शब्द निराळा. हे दोन एकरूप पण भिन्नार्थ असे अगदी निरनिराळे स्वतंत्र शब्द आहेत. ह्यांच्या व्युत्पत्तीहि ह्यामुळे अगदी निरनिराळ्या स्वतंत्र आहेत. पण इकडे दुर्लक्ष करून हे दोन शब्द "ऐतिहासिक" व्युत्पत्ति-पद्धतीच्या पुरस्कर्त्यांनी एकच मानले व अशी गल्लत करून " भणित्वा " (" भण् " म्हणजे " म्हणणें " " बोलणें " "to say" पासून) म्हणजे " बोलून " " Having said " ही, – वास्तविक " म्हणून " म्हणजे " बोलून " "Having said " ह्या शब्दाची कशीबशी असलेली " वेदकाल"ची अंतिम मूळ व्युत्पत्ति – " म्हणून " म्हणजे " ह्यामुळे " " ह्या कारणास्तव " " Therefore " " For this reason" "Hence" " So " ह्या प्रस्तुत " इदं कारण मूल (फल) " वाचक व्युत्पाद्य शब्दाचीच व्युत्पत्ति म्हणून दिली ! " भणित्वा " हीं " वेदकाल"ची अंतिम मूळ व्युत्पत्ति वास्तविक " म्हणून " म्हणजे " बोलून " "Having said" ह्या " पूर्वभणन " वाचक शब्दाची आहे, हें अर्थावरून अर्थात् अगदीच उघड आहे.

आणि " (' म्हणून ') या शब्दाची व्युत्पत्ति सांगतांना वेदकालापर्यंत या (' म्हणून ') शब्दाचे कसे भेद पडत गेले हें" दर्शवितांना जें "भणित्वा" हें "वेदकाळ"चें मूळ रूप म्हणून प्रा. कुलकर्ण्यांनी सांगितलें, तें तरी कितपत बरोबर आहे ? " भणित्वा " चें " म्हणून " हें आजचें अंत्य रूप ध्वनिदृष्ट्या कसें सुसंबद्ध ठरतें ? " म्हणवून " " म्हणोन " ह्या दोन मधल्या रूपांतरांच्या साहाय्यानेसुद्धा मूळ " भणित्वा " हें रूप अंत्य " म्हणून " ह्या रूपाशीं ध्वनिदृष्ट्या कसें सुसंबद्ध आहे ? " भणित्वा "= " भणित्वा" = " म्हणवून " = " म्हणोन " = " म्हणून " ही साखळी येथे जुळते का ? कारण " भाषेचा तौलनिक व ऐतिहासिक विचार करावा " असें " वक्त्यांनी प्रथम भाषेसंबंधी माहिती सांगतांना " सांगितलें, व " उदाहरण म्हणून त्यांनी ' म्हणून ' या शब्दाची व्युत्पत्ति सांगतांना वेदकालापर्यंत या (' म्हणून ') शब्दाचे कसे भेद पडत गेले हे " सांगितलें. " ऐतिहासिक दृष्ट्या विचार " करतांना " वैदिक (Vedic) व " क्लासिकल (Classical) " असे संस्कृतचे दोन भाग वक्त्यांनी उल्लेखिले, व " म्हणून " चा मागे मागे असा " वेदकाला " पर्यंत मागोवा घेतांना " म्हणून " " म्हणोन " " म्हणवून " " भणित्वा (Classical) " " भणित्वा (Vedic) " असा " (Classical) भणित्वा" चा व " (Vedic) भणित्वा " चा निरनिराळा नामनिर्देश त्यांनी केला. अर्थात् " भणित्वा " = " भणित्वा " = " म्हणवून " = " म्हणोन " = " म्हणून " अशी " भणित्वा " द्वयघटित साखळी त्यांनी दर्शविली. पण ह्या साखळींतील दुवे ध्वनिदृष्ट्या कसे सुसंबद्ध आहेत, ह्याबाबत मात्र त्यांनी चकारशब्दसुद्धा काढला नाही. इतर ध्वनिसंबंध स्पष्ट असले, तरी " भणित्वा " व " म्हणवून " यांचा ध्वनिसंबंध स्पष्ट नाही. त्यांतहि "भण्"चा "म्हण् " शीं ध्वनिसंबंध उघड आहे; पण "इत्वा" ह्या "भणित्वा"च्या अंत्य भागाचा " वून" ह्या "म्हणवून"च्या अंत्य भागाशीं ध्वनिसंबंध मात्र तसा उघड नाही. त्याचें तरी विवरण प्रा. कुलकर्ण्यांनी व्याख्यानांत करावयास हवें होतें. पण वर म्हटल्याप्रमाणे त्यांनी त्याचा नुसता उल्लेखसुद्धा केला नाही ! " भणित्वा " हें Classical संस्कृत " मधलें म्हणून " चें

तथाकथित रूप सांगून झाल्यावर, " भाणित्वा " हेंच पुनः " Vedic संस्कृतमधलें, अतएव " वेदकालीन " रूप म्हणून जेव्हा वक्त्यांनी–एकदाच नव्हे, तर अनेकदा–सांगितलें, तेव्हा " म्हणून " चें खरें " वेदकालीन " रूप वक्त्यांना मुळीं दिसलेंच नाही, व म्हणून " Classical संस्कृत" मधलेंच "भाणित्वा" हें रूप " Vedic संस्कृत" मधीलहि होय, असा भ्रम त्यांस झाला असल्याचें चाणाक्ष श्रोत्यांना सहज समजलें.

" Classical संस्कृत " मधील काय अगर " Vedic संस्कृत " मधील काय, " भणित्वा " ह्या रूपांतील " इत्वा " हा अंश " म्हणवून " ह्या तदनंतरच्या मधल्या रूपांतील " वून " ह्या अंशाशीं ध्वनिदृष्टया संबद्ध नाही. "इत्वा" मध्ये मूळ प्रत्यय "त्वा" हा आहे; तद्वतच " वून " मध्ये मूळ प्रत्यय " ऊन " हा आहे. " म्हणून " " बोलून " " चालून " ह्यांत हा मूळ " ऊन " प्रत्यय आढळतो. " त्वा " व " ऊन " ह्यांत ध्वनिसाम्य कितीसें आहे ? मग " ऊन "चें " Classical संस्कृत " मधील मूळ " त्वा " हें आहे हें प्रा. कुलकर्ण्यांचें विधान कितीसें बरोबर आहे ? " त्वा " हा " भणित्वा "तील अंश " ऊन " ह्या " म्हणून " मधील अंशाचें ह्या " Classical संस्कृत " मधील रूप होय असें त्यांनी कांही तरीच अशास्त्रीय सांगितलें ! वर दर्शविल्याप्रमाणे, ह्या "त्वा"चा ह्या " ऊन " शीं ध्वनिसंबंध कसा आहे तें, म्हणजेच ध्वनिदृष्टया " ऊन " हें " त्वा "शीं कसें संबद्ध आहे तें, म्हणजेच पुनः " ऊन " हें " त्वा "चें ध्वनिदृष्टया कसें रूपांतर आहे तें त्यांनी अर्थातच दर्शविलें नाही ! आणि तें त्यांना दर्शवितांहि येणार नाही. कारण "म्हणून" मधील हें " ऊन " " भणित्वा " ह्या " Classical संस्कृत " मधील " त्वा "चें ध्वनिदृष्टया मुळी रूपान्तर नाहीच. " भणित्वा " हें " Classical संस्कृत " मधील ल्यबन्त रूप " म्हणून " –" बोलून " शीं केवळ अर्थदृष्टया संबद्ध आहे. ध्वनिदृष्टया अर्थात् नाही. प्रा. कुलकर्ण्यांची " म्हणून "ची ही " भणित्वा " रूप व्युत्पत्ति येथे अशी " ध्वनि " निरपेक्ष " अर्थैक " निष्ठ आहे. म्हणून ती अशास्त्रीय आहे. कारण, शास्त्रीय व्युत्पत्ति " अर्थैक " किंवा " ध्वन्येक " निष्ठ अशी कोणतीच " एक " निष्ठ नसावी लागते. तर " ध्वन्यर्थ " निष्ठ म्हणजेच " ध्वन्यर्थोभय " निष्ठ अशी " उभय " निष्ठ असावी लागते, हें वर दर्शविलें आहे. " Classical संस्कृत " मधील " भणित्वा " हें " म्हणून " चें अशास्त्रीय असें मधलें रूप असें एकदा दिल्यावर " Vedic संस्कृत " मधील " भाणित्वा " हें ह्याचें मूळ रूप म्हणून प्रा. कुलकर्ण्यांनी साहाजिकच नंतर दिलें, व " वेदकाला " पर्यंतची " म्हणून"ची तथाकथित " ऐतिहासिक " व्युत्पत्ति—शृंखला त्यांनी अशी पुरी केली! पण त्यांची ही अशी व्युत्पत्ति अशास्त्रीय अर्थात् चुकीची आहे.

———————

अनुक्रमणिका

इंग्रजी वाङ्मयाचे इतिहास :

कुसुमावती देशपांडे

कोणत्याहि राष्ट्राच्या वाङ्मयेतिहासांत समीक्षेचा उदय त्या वाङ्मयाचा कांही विकास झाल्यानंतरच होतो, आणि त्या समीक्षेच्या विभागांत वाङ्मयेतिहासलेखन हा प्रकार त्यांतल्या-त्यांत उशीरा निर्माण होतो. इंग्रजी समीक्षेचा प्रारंभ इलिझाबेथ राणीच्या युगांत म्हणजे चॉसर या आद्य कवीच्या नंतर दीडदोनशे वर्षांनी झाला. तरीहि नांव घेण्याजोगा इंग्रजी वाङ्मयेतिहास--तोहि एकाच वाङ्मयप्रकाराचा इतिहास--लिहिला जाण्यापूर्वी आणखी दोनशे वर्षे उलटलीं. टॉमस वॉर्टन नामक लेखकाने इंग्रजी काव्याचा इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न केला. टॉमस व त्याचा थोरला भाऊ जोसेफ हे दोघेहि रोमॅन्टिक रिव्हायव्हलच्या पूर्वतयारीच्या काळीं ज्यांनी वाङ्मयीन विचारांत क्रांति घडवून आणली त्यांच्यामध्ये अग्रगण्य होत. जोसेफच्या 'पोपवरील निबंधां'त एका नवीन दृष्टिकोणाचें प्रतिपादन केलें गेलें. जें जुन्या क्लासिकल आदर्शानुरूप लिहिलें जातें तेंच केवळ उत्तम वाङ्मय, या दोनशे वर्षे अव्याहतपणें मानल्या गेलेल्या तत्त्वाचें त्याने खंडन केलें. टॉमस याने आपल्या स्पेन्सरवरील निबंधांत या दृष्टिकोणाची विधायक बाजू मांडून नवीन आदर्श पुढे केला. वाङ्मयनिर्मितींत केवळ साहित्यगत नियमांपेक्षा कल्पकतेचें, नवोन्मेषशालिनी प्रतिभेचें महत्त्व अधिक आहे, असें त्याने प्रतिपादिलें; एवढेंच नव्हे तर अशा नवोन्मेषशालिनी प्रतिभेच्या उदाहरणासाठी इंग्रजी वाङ्मयाला, ग्रीस व रोमच्या वाङ्मयाऐवजी स्वतःच्याच पूर्वसूरींकडे वळतां येईल हेंहि त्याने दाखवून दिलें. या त्याच्या भूमिकेवरूनच त्याने नंतर 'इंग्रजी काव्याचा इतिहास' (१७७४–१७८१) लिहिला. त्याच्या इतिहासलेखनाच्या पद्धतींत अनेक दोष दाखविण्यांत येतात. त्याची माहिती अपुरी होती. त्याच्या समीक्षणांत प्रमाणबद्धता विशेष आढळत नाही. परंतु त्याने जें फार मोठें कार्य केलें तें हें की इंग्रजी काव्याच्या चारशे वर्षांच्या परंपरेचें विहंगमावलोकन त्याने प्रथम घडवून दिलें. एव्हांनाच त्यांतील कित्येक टप्प्यांचा विसर पडला होता. चॉसरचें काव्य लोकांना समजेनासें झालें होतें; मधल्या कित्येक पिढ्या अंधारांत गडप झाल्या होत्या. त्या सर्वांना विस्मरणाच्या गर्तेतून काढून टॉमस वॉर्टनने थोड्याबहुत तरी प्रमाणशीरपणें एका साखळींत बसवलें व इंग्रजी काव्याच्या सातत्याचें व पृथगात्मतेचें व दर्शन घडविलें.

वाङ्मयेतिहासाच्या या प्रारंभींच्या काळांत हें कार्य एकेकट्या लेखकाने केलेलें आढळतें व तें बहुशः एकेका वाङ्मयप्रकारापुरतें मर्यादित राहिलें. वॉर्टननंतर पांच सहा वर्षांनीच प्रख्यात साहित्यशौंड डॉ. जॉन्सन याच्या कविचरित्रांच्या मालेला प्रारंभ झाला. जॉन्सन हा जुन्या क्लासिकल वाङ्मयप्रणालीचा अखेरचा पुरस्कर्ता. त्यामुळे १७७४ ते १७८० च्या सुमारास इंग्लंडच्या वाङ्मयीन नभःप्रांगणांत एकीकडे जुन्या साहित्यदृष्टीचा हिरण्मय चंद्रास्त व दुसरीकडे नव्या युगाची अरुणप्रभा एकत्र दिसली. एकेका व्यक्तीने लिहिलेल्या कांही विशिष्ट कालखंडाच्या किंवा एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या इतिहासासारख्या ग्रंथांची परंपरा तेव्हापासून सुरू आहे व विकसित होत आहे. या परंपरेला इंग्रजेतर लेखकांनीहि हातभार लावला आहे. त्यांपैकी टेन हा सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक वाङ्मयाच्या विश्लेषणात्मक विवेचनाचा प्रणेता समजला जातो. कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास समजावून घ्यावयाचा असल्यास त्या राष्ट्राच्या वाङ्मयेतिहासाचा

अभ्यास किती आवश्यक आहे हें प्रथम टेननेच आपल्या इंग्रजी वाङ्मयेतिहासाच्या द्वारें स्पष्ट केलें. टेनला गुरुस्थानीं मानून जसरांद नांवाच्या आणखी एका फ्रेंच समीक्षकानें तीन भागांतला ट्यूडर काळापर्यंतचा आपला 'इंग्रज लोकांचा वाङ्मयीन इतिहास' लिहिला. त्यानें आपल्या प्रस्तावनेंत मोठ्या विनयानें लिहिलें कीं, "टेननंतर याप्रकारचें कार्य पुन्हा कोणी कशाला हातीं घ्यावें ? परंतु मला कांही कारणांनी वेगवेगळ्या वेळीं इंग्लंडमध्ये वास्तव्य करण्याचा योग आला. तेव्हा विचार असा आला की इंग्रजी मनाचा विकास कसकसा होत गेला ह्याचें त्यांच्या वाङ्मयाच्या द्वारें दर्शन घडवावें." या हेतूमुळे सामाजिक परिस्थितीचें रेखाटन, परिस्थिति व वाङ्मयीन व्यक्तित्व यांच्या परस्परसंबंधाचें चित्रण यांच्याकडे त्याचें विशेष लक्ष राहिलें. जसरांद हा मोठा रसिक लेखक. त्याची शैली लालित्यपूर्ण व ऐसपैस. त्याचीं कांही व्यक्तिचित्रें एखाद्या प्रथम दर्जाच्या कादंबरींतील व्यक्तिचित्रांइतकीं आकर्षक आहेत. आठव्या हेन्रीचें किंवा इलिझाबेथ राणीचें व्यक्तिचित्र याचें उदाहरण होय. याबरोबरच जसरांदच्या युरोपीय संस्कारांमुळे रिनेसान्स व रेफर्मेशन या महान् क्रांतिकारक विचारप्रवाहांचें त्यानें केलेलें विवेचन मोठें व्यापक व तुलनात्मक झालें. सतराव्या व अठराव्या शतकांत कांही जर्मन इतिहास लेखकांनीहि इंग्रजी वाङ्मयाचे इतिहास लिहिले. त्यांच्यापैकी कांहींनी तुलनात्मक पद्धतीचा अवलंब करून इंग्रजी, फ्रेंच व जर्मन वाङ्मयांचें विवेचन केलें. एकीकडे ही तुलनात्मक पद्धति व दुसरीकडे समाजजीवन व वाङ्मयविकास यांच्या अन्योन्यसंबंधाचा विचार या दोन्ही प्रणालींचा या काळीं चांगला विकास झाला. त्याबरोबरच ग्रांथिक संशोधन, हस्तलिखितांचें व जुन्या आवृत्तींचें संकलन व संशोधन यांचेंहि कार्य वाढत राहिलें; इतिहासांतील दुवे अधिकाधिक जुळत गेले; पुनर्मूल्यनें होत राहिलीं; भाषाविषयक संशोधन व कोश-वाङ्मय यांची वाढ झाली. इंग्रजी वाङ्मयाविषयी अशी भरपूर साधनसंपत्ति निर्माण झाली. इतिहासविषयक दृष्टिकोण बरेच विकसित झाले. तेव्हा १९०० च्या सुमारास केंब्रिज विद्यापीठातर्फे चौदा खंडांच्या, अनेक लेखकांच्या सहकार्यावर आधारलेल्या एका प्रचंड वाङ्मयेतिहासाची योजना आखली गेली. महाराष्ट्र साहित्य परिषदेने सध्या हातीं घेतलेल्या मराठी वाङ्मयेतिहास योजनेच्या दृष्टीने वरील केंब्रिज वाङ्मयेतिहासाची थोडी बारकाईने पाहणी करणें उपयुक्त होईल.

या चतुर्दशखंड योजनेचे मुख्य संपादक केवळ दोनच होते. प्रत्येक खंडांतील प्रकरणें मात्र अनेक लेखकांनी लिहिलेलीं आहेत. तो तो विषय, वाङ्मयप्रकार वा कालखंड यांचा विशेष व्यासंग असलेल्या तज्ञांकडून तीं लिहून घेतलीं आहेत. चौदा खंडांतील एकूण २२९ प्रकरणें ११७ लेखकांनी लिहिलेलीं आहेत. हे लेखक कोणत्याहि एका विद्यापीठाचे नव्हते, एकाच प्रांतांतील नव्हते, एवढेंच नव्हे तर एका देशांतीलहि नव्हते. ऑक्सफर्ड, केंब्रिजपासून वेल्श, स्कॉटिश व अमेरिकन युनिव्हर्सिट्यांतील मंडळी तसेच कांही दुय्यम शाळांतील लेखक व लेखिका यांचाहि त्यांत समावेश झालेला आढळेल. यांपैकी कांहींनी केवळ एकेक प्रकरण लिहिलेलें आहे. खंडांची तपशीलवर योजना, प्रकरणांची वाटणी, त्यांची जुळणी इत्यादि सर्व संपादकीय जबाबदारी डॉ. ए. डब्ल्यु. वार्ड व प्रो. वॉलर या दोघांनी उचलली. पहिला खंड १९०८ मध्ये प्रसिद्ध झाला; अखेरचा १९१६ मध्ये व सूचीखंड १९२७ मध्ये. सूचीखंडाच्या प्रकाशनापर्यंत आद्य संपादकांपैकी एकालाहि आयुष्य लाभलें नाही; परंतु तें कार्य त्यांच्या नमुन्याप्रमाणे पूर्ण करण्यांत आलें.

आज महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या योजनेविषयी चर्चा चालते तेव्हा एकेका खंडाच्या उपसंपादकांच्या यादीची लांबी पाहून पुष्कळांच्या मनांत असा प्रश्न उभा राहतो की या सर्वांचें

लेखन एकसूत्री व एका पातळीचें कसें होईल ? मराठी समीक्षणांचा दर्जा व समीक्षणपद्धति किंवा शैली यांच्याविषयीं विचारांचा गोंधळ लक्षांत घेतल्यास कदाचित् ही भीति साधार असेल. परंतु शंभराच्यावर लेखक एकत्र येऊनहि त्या कार्यांत एकसूत्रीपणा राहूं शकतो हें केंब्रिज वाङ्मयेतिहासाच्या उदाहरणावरून लक्षांत येण्यासारखें आहे. सर्वांनी योजनेसाठी निश्चित झालेली दृष्टि व योजना यशस्वी करण्याची आकांक्षा यांचें स्मरण मात्र ठेवलें पाहिजे.

केंब्रिज वाङ्मयेतिहासाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत संपादकद्वयाने आपल्या स्वतःच्या व सर्व लेखकांच्या समोर ठेवलेल्या वाङ्मयेतिहासविषयक उद्देशांचें व दृष्टिकोणाचें निवेदन केलें आहे, व नंतरहि कांही खंडांच्या प्रारंभीं प्रसंगाप्रमाणे त्या निवेदनांत त्यांनी भर टाकली आहे. या सर्व प्रस्तावना लक्षांत घेतल्या तर संपादकीय दृष्टिकोण व गृहीततत्त्वें यांची स्पष्ट कल्पना येते. अनेक शतकांच्या वाङ्मयप्रवाहांचा सातत्यपूर्ण वृत्तान्त लिहिणें हें त्यांचें आद्य उद्दिष्ट. त्यासाठी ठळक व प्रतिभावान् लेखकांबरोबर दुय्यम लेखकांकडेहि लक्ष दिलें पाहिजे; एवढेंच नव्हे तर या दुय्यम लेखकांकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे, असें त्यांनी प्रतिपादिलें. प्रथम श्रेणीच्या व्यक्तींना जरी अवश्य व न्याय्य तें स्थान दिलें पाहिजे तरी त्यांचीं चरित्रें व समीक्षणें विस्तृतपणें देण्यापेक्षा त्यांच्या वाङमयाच्या अभ्यासास लागणाऱ्या ग्रंथांच्या याद्या व तद्विषयक भरपूर सूचना अभ्यासकांस देणें अधिक उचित. वाङ्मयाचे उद्देश, प्रेरणा व प्रयोजनें यांचा सातत्यपूर्ण इतिहास लिहितांना प्रथम श्रेणीच्या कवि-लेखकांचीं चरित्रें व समीक्षणें यांच्यावरच भर देण्यापेक्षा तोंवर डावलल्या गेलेल्या दुय्यम प्रतीच्या लेखकांच्या कार्याचें व त्यांतून उघड होणाऱ्या तत्कालीन प्रवृत्तींचें विवेचन अधिक कसोशीने केलें पाहिजे; कारण प्रथम श्रेणीचा लेखकहि एखाद्या चमत्काराप्रमाणे एकटाच निर्माण होत नाही; त्याच्या पूर्वसूरींच्या संस्कारांनी तो बनवला जातो, हें तत्त्व त्यांनी कटाक्षाने स्वीकारलें. या तत्त्वाच्या जाणिवेच्या अभावीं कित्येक इतिहासांत कांही ठळक व भडक प्रकरणें व बाकीचीं चैतन्यशून्य जंत्री अशी अवस्था होते. ही दुरवस्था केंब्रिज वाङ्मयेतिहासांत आढळत नाही. त्यांतील निवेदन संथ, संयमित व तितकेंच समजदार झालें आहे. या तत्त्वाच्या स्वीकारामुळेच त्यांच्या कोणत्याहि खंडाला एकाद्या कवीचें वा लेखकाचें नांव दिलें गेलें नाही.

हें जसें लेखनविषयाविषयीं झालें त्याप्रमाणेच या इतिहासाच्या वाचकवर्गाविषयींहि स्पष्ट कल्पना मांडल्या गेल्या आहेत. संपादकांनी कटाक्षाने लिहिलें कीं विद्यापीठाच्या प्रत्येक प्रकाशनाने विद्वान् मंडळींच्या उच्चतम अपेक्षा पुऱ्या केल्या पाहिजेत हें तर खरेंच, परंतु त्या बरोबरच जें ज्ञान निवडक मंडळींनी मिळवलें आहे त्याचा इतर सर्वांना उपयोग होईल इकडेहि अशा प्रकाशनसंस्थांनी लक्ष दिलें पाहिजे. म्हणून केवळ तंत्रनिष्ठ किंवा संशोधनात्मक प्रश्न शक्य तितके दूर सारले आहेत. मूळ मजकुरांत संशोधनाचा निष्कर्ष तेवढा देऊन अभ्यासासाठी शक्य तितक्या भरपूर टीपा देऊन विशेष जिज्ञासु वाचकांचें मार्गदर्शन करण्याचें धोरण ठेवलें.

या इतिहासाच्या संपादकांनी हेंहि नमूद केलें कीं कोणत्याहि राष्ट्राचा वाङ्मयेतिहास त्याच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक इतिहासापासून वेगळा काढतां येत नाही. त्या सर्व क्षेत्रांतील महत्त्वाचे विचारप्रवाह व घटना यांच्याबरोबरच त्या त्या काळांतील प्रमुख, तशाच दबलेल्या भावप्रवृत्ति, आचारधर्म, व्यवहारपद्धति, रूढि यांचादेखील विचार करणें आवश्यक असतें. म्हणून या इतिहासांत, विज्ञान, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, पार्लमेंटांतील वक्तृत्व, शाळा, विद्यापीठें व वाचनालयें यांचें कार्य, राजकीय व धार्मिक वादांच्या निमित्ताने निघालेलीं पत्रकें, नियतकालिकें, प्रवासवर्णनें इत्यादि सर्व वाङ्मयीन शाखांकडे लक्ष पुरवलें आहे.

कालविभागणी, वाङ्मयप्रकारांची विभागणी यांच्या दृष्टीनेहि या इतिहासाचे कांही विशेष लक्षांत घेण्याजोगे आहेत. मुख्य विशेष हा की, खंडयोजनेविषयी कांहीहि काटेकोर व कडक नियम केले गेले नाहीत. प्रत्येक खंड एकाच नमुन्याबरहुकूम झाला पाहिजे असा आग्रह धरण्यांत आला नाही. खंडांच्या कालमर्यादेविषयीहि एकच तत्त्व ठेवण्यांत आलें नाही. वाङ्मयीन, शैक्षणिक वा शास्त्रीय विचारप्रवाहांना एखाद्या कालमर्यादेच्या समान चौकटींच्या नमुन्यांत बसवणें व त्या प्रवृत्तींना बाह्य घटनांच्या पावलांबरोबर पावलें टाकायला लावणें हें नेहमीच शक्य किंवा इष्टहि नसतें, असा संपादकांनी स्पष्ट इशारा दिला व म्हणून एका खंडांत कालदृष्टीने अपेक्षितां येतील अशा प्रवाहांची चर्चादेखील, कांही ठिकाणीं, तदनुषंगिक अशा इतर अनुसंधानासाठीं निःशंकपणें पुढील खंडावर सोपविण्यांत आली. उदाहरणार्थ, इंग्रजी नाट्यवाङ्मयाच्या प्रारंभाचें विवेचन कालदृष्ट्या वस्तुतः पहिल्या किंवा दुसऱ्या खंडांत येणें अवश्य होतें. परंतु नाट्याच्या विकासाच्या सर्वांगीण विवेचनासाठी ती चर्चा चवथ्या व पांचव्या खंडावर सोपविण्यांत आली व हे दोन खंड मुख्यतः याच विषयाला वाहिले गेले. या उलट इंग्रजी भाषेचा विकास हा साधारणपणें स्वतंत्र खंडाचा विषय होण्यास योग्य वाटावा; परंतु त्याची चर्चा वेगवेगळ्या खंडांत समाविष्ट झालेल्या काळाप्रमाणे त्या त्या ठिकाणीं व वेगवेगळ्या लेखकांनी केलेली आढळते.

केंब्रिज वाङ्मयेतिहासाची योजना अशी लवचिक पण सुसंघटित आहे. आज ३०–३५ वर्षांच्या कालावधींत इंग्रजी समीक्षा अर्थातच खूप पुढे गेली आहे व त्यामुळे तो इतिहास आज अनेक दृष्टींनी अपुरा व जुना वाटूं लागला आहे. संशोधनांतील प्रगतीमुळे वाङ्मयीन सामुग्रींत भर पडली, असेंच नाही; इतिहासविषयक दृष्टिकोण, वाङ्मयीन प्रवृत्तींची जुळणी, सामाजिक पार्श्वभूमीचें विवेचन, वाङ्मयीन व सामाजिक प्रवृत्तींचें संश्लेषित दर्शन इत्यादि अनेक लेखनांगांमध्ये आज किती तरी उत्क्रांति झाली आहे. केंब्रिजच्या संपादकांनी वाङ्मयप्रवाहाच्या सातत्याकडे लक्ष पुरवण्याचा हेतु प्रमुख मानला तरी अनेक खंडांमध्ये, विशेषतः अठरावें शतक व त्यापुढील काळ यांच्या विवेचनामध्ये–प्रवाहापेक्षा व्यक्तींच्या कार्यावरच भर दिला गेला व तेथून पुढील इतिहास म्हणजे वेगवेगळ्या व्यक्तींच्या कार्याच्या संक्षिप्त विवेचनाच्या तुकड्यांनी बनवला गेला. संपादकांनी आपल्यापुढे ठेवलेल्या, दुय्यम प्रतीच्या लेखकांच्या प्रमाणांतच प्रथम श्रेणीच्या लेखकांच्या विवेचनाला स्थान देण्याच्या दुसऱ्या तत्त्वामुळेहि अनेक दोषच उद्भवले. त्यांतील कित्येक प्रकरणें अपुरीं व असमाधानकारक ठरलीं. या सर्व दोषांमुळे आज अनेक वर्षांपासून केंब्रिज वाङ्मयेतिहास हा इंग्रज वाचकाच्या व भारतीय विद्यापीठाच्या दृष्टीनेहि साधारण वाचक व पदवीपूर्व विद्यार्थी यांच्याच उपयोगाचा राहिला आहे. एम्. ए. वा तत्सम विद्यार्थ्यांना त्याचा विशेष उपयोग राहिला नाही. प्रथम श्रेणीच्या कविलेखकांशीं वा महान् व्यक्तींशीं तद्रूप होऊन, त्याबरोबरच कांही वाङ्मयीन व सामाजिक क्रांतिकारक घटनांच्या अंतर्यामीं शिरून रसाळपणें लिहिलेल्या जसरांदचा इतिहास आजहि डावलतां येत नाही. तो अजूनहि वाचनीय व उपयुक्त वाटतो. परंतु केंब्रिजचा इतिहास आज कांही ठळक आकडे वा दुवे पहाण्यासाठींच वापरला जातो.

उच्च कक्षांच्या बहुतेक विद्यार्थ्यांच्या वापरांत आज असलेला इंग्रजी वाङ्मयेतिहास म्हणजे लेग्वी आणि कॅझॉमियां या दोन फ्रेंच लेखकांनी लिहिलेला होय. या इतिहासांत प्राचीन (इ. स. ६५०–१६६०) व अर्वाचीन (इ. स. १६६० ते १९३५) या दोन वाङ्मय-विभागांच्या इतिहासलेखनांत दोन वेगवेगळ्या दृष्टींचा व पद्धतींचा अवलंब केला आहे. केवळ

दोन लेखकांनी हे दोन भाग लिहिले म्हणून असें झालें असें नाही. त्या त्या काळांतील वाङ्मयाचें स्वरूप व त्या वाङ्मयाच्याभोंवती जमलेल्या सामुग्रीचें स्वरूप यांमुळेच असें करणें लेखकांना अपरिहार्य वाटलें. प्राचीन वाङ्मयाविषयी संशोधन, संकलन, समीक्षा-त्यांतील चरित्रविषयक व सामाजिक पार्श्वभूमीविषयक माहिती यांपैकी कशांत भर घालण्यापेक्षा त्याच्या कलात्मक विकासाकडे लक्ष पुरवणें प्रा. लेग्वी यांना अगत्याचें वाटलें. पहिल्या सर्व प्रकारांची दखल घेणारे इतिहास होऊन गेल्यामुळे त्यांच्या फलिताचा फायदा घेऊन त्यांच्याकडून त्या मानाने दुर्लक्षिल्या गेलेल्या वाङ्मयीन प्रकारांच्या कलात्मक विकासाकडे लक्ष देण्याचें त्यांनी ठरविलें. दुसऱ्या भागांतील वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखक श्री. कॅझॉमियां यांनी वेगळा मार्ग धरला. मानवी जीवनाविषयी एका विशिष्ट, खोल, तात्त्विक विचारावर त्यांनी मुख्यतः दृष्टि ठेवली. आधुनिक जीवनांत मानवी अनुभवाचीं सर्व क्षेत्रें एकमेकांशीं जवळजवळ अविभाज्यपणें निगडित झालेलीं असतात; तीं परस्परसंस्कारांनी एकमेकांशीं बांधलीं गेलेलीं असतात; कधी कधी सर्वच एका महान् प्रवृत्तीने वा विचारप्रवाहाने प्रेरित झालेलीं असतात. एखाद्या राष्ट्राच्या अस्मितेचा व तिच्या विकासाचा विचार करूं लागल्यास वरील प्रकारचे कांही विशिष्ट प्रेरक विचारप्रवाह वा मानसिक प्रवृत्ति यांचें पुनरावर्तन झालेलें आढळून येतें. हें तत्त्व मानवी संस्कृतीच्या इतिहासांत आता ग्राह्य ठरलें आहे, सिद्ध झालें आहे, असें कॅझॉमियां यांचें म्हणणें. या तत्त्वाप्रमाणे त्यांनी इंग्रजी वाङ्मयाची पाहणी केली व त्यांना आढळून आलें की ज्यांना क्लॅसिसिझम् व रोमँटिसिझम् म्हणतात त्या दोन ध्रुवांच्या पुनरावर्तनांनी इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास झंकारित झाला आहे. कांही थोड्या वेगवेगळ्या स्वरूपांत, वेगवेगळ्या प्रमाणांत यांतील एकेका प्रवृत्तीने एकेक युग मुख्यतः प्रेरित झालेलें आढळून येतें. त्या प्रवृत्तीचा संस्कार केवळ तत्कालीन वाङ्मयावरच नव्हे तर इंग्रजी जीवनाच्या सर्व अंगोपांगावर, इंग्रजी राष्ट्राच्या अस्मितेवरच झालेला आढळतो. कॅझॉमियां यांच्या या निष्कर्षाला इंग्रज पंडित व टीकाकार ग्रीअर्सन यांच्यासारख्यांच्या लेखनाने पुष्टी मिळते. कॅझॉमियां यांनी आपल्या वाङ्मयविवेचनांत कालखंडांचा, वाङ्मयप्रकारांचा, त्यांच्या कलात्मक विशेषांचा, लेखकांच्या वैयक्तिक कार्याचा विचार केला नाही असें नाही. परंतु या सर्वांना त्यांनी एका मुख्य विचाराला आनुषंगिक मानलें, व तो विचार वर निर्दिष्ट केलेल्या युगप्रवृत्तीचा. त्यांच्या इतिहासविभागांतील प्रकरणांना लेखकांच्या व वाङ्मयप्रकारांच्या नांवापेक्षा कांही बौद्धिक प्रवृत्तींचीं नांवें अधिक सापडतील. या व्यापक विचारामुळे व तत्त्वचिंतनाच्या वृत्तीमुळे त्यांचीं युगप्रवृत्तींविषयीचीं प्रास्ताविकें विशेष उठावदार झालीं आहेत. मात्र या तत्त्वविचारांवर त्यांनी कोठेहि अवास्तव भर दिला नाही. टेन यांच्या इतिहासांत ज्याप्रमाणे एका तत्त्वाच्या दिग्दर्शनासाठी इतिहासाला एका साच्यांत बसवण्याचा प्रयत्न केल्यासारखा वाटतो तसें होऊं न देण्याची खबरदारी कॅझॉमियां यांनी घेतली आहे.

अखेर, अगदी अलीकडील दोन प्रकाशनांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. इंग्लिश युनिव्हर्सिटीज् प्रेसने 'स्वयंशिक्षण माले' मध्ये इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास सहा लहान भागांमध्ये काढला आहे. पुस्तकांचा आकार लहान 'होम युनिव्हर्सिटी' मालेसारखा आहे. हा इतिहास वाचनीय व अद्ययावत् असला तरी केवळ नवशिक्यांसाठीच उपयोगी व्हावा. त्यांतील वृत्तान्त त्रोटक व समीक्षणें ठराविक ठशाचीं आहेत. परंतु ऑक्सफर्ड विद्यापीठाकडून सध्या खंडशः प्रकाशित होत असलेला द्वादश खंडांचा वाङ्मयेतिहास मात्र केंब्रिजच्या प्रयत्नांतील सर्व उणिवा भरून काढील, असें दिसतें. या इतिहासाचे तीनच खंड आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. तेव्हा संपूर्ण योजनेविषयी तपशीलवार कांही सांगणें शक्य नाही. परंतु त्या तीन खंडांवरून व सर्व

खंडांच्या नामावलीवरून कांही गोष्टी स्पष्ट होतात. यांतील खंडयोजना केंब्रिज वाङ्मयेतिहासा-पेक्षाहि अधिक लवचिक वाटते. येथे देखील, एकट्या चॉसरचा अपवाद सोडल्यास, कोणत्याहि युगाला वा कालखंडाला एखाद्या कविलेखकाचें नांव दिलेलें नाही. याहि इतिहासाचे मुख्य संपादक दोनच आहेत; पण यांतील एकेक खंड एकेकाच लेखकाकडून लिहिला जाणार असावा असें दिसतें. सध्या प्रकाशित झालेले खंड तरी एकेकानें लिहिलेले आहेत व ते लेखक आपाप-ल्या क्षेत्रांत अग्रगण्य असल्यामुळे ते खंड अत्यंत व्यापक, सर्व संशोधनाचें सार काढून त्याचें शास्त्रशुद्ध समीक्षण करणारे, पूर्णपणें अधिकृत असे झाले आहेत. मुख्य संपादकांना असलेल्या अधिकाराची व खंडलेखकांच्या कामामध्ये ते किती बारकाईने लक्ष घालतात याची साक्ष खंडांच्या प्रस्तावनांतहि आढळण्यासारखी आहे. हे खंड प्राचीन वाङ्मयाविषयी आहेत. पुढे, वाङ्मय-क्षेत्राच्या विलक्षण विकासामुळे अर्वाचीन वाङ्मयावरील खंडांमध्ये लेखनकार्याची विभागणी करणें प्राप्त होईल, असें वाटतें. कसेंहि असलें तरी, ऑक्सफर्ड वाङ्मयेतिहास हा आजपर्यंतच्या सर्व इंग्रजी वाङ्मयेतिहासामध्ये वरचढ ठरेल व इतिहासलेखनाचा एक नवा आदर्श निर्माण करील, हें स्पष्ट आहे.

या ग्रंथांतील मजकुराचें संयोजन कसें केलें आहे हें अनेक दृष्टींनी मननपूर्वक पहाण्याजोगें आहे. उदाहरणार्थ, दुसऱ्या खंडाचा पहिला भाग, ' चॉसर व पंधरावें शतक ' असा आहे. त्यांतील पहिलें प्रकरण ' चॉसर आणि त्याचें युग ' या पार्श्वभूमीवजा मजकुराचें आहे; तर दुसरें धार्मिक परिस्थितीविषयी आहे. तिसरें प्रकरण खुद्द चॉसरवर आहे. तें केवळ ६७ पानांचें आहे. परंतु त्यांत चॉसरच्या चरित्रांतील आश्चर्यपूर्ण भाग आहे. त्याच्या बहुतेक सर्व ग्रंथांचें, सर्व संशोधन व वाङ्मयीन वाद लक्षांत घेऊन केलेलें अद्ययावत् समीक्षण आहे; त्याच्या काव्याचें तंत्रदृष्ट्या मूल्यमापन आहे; त्यानें इंग्रजी शब्द-भांडारांत जी भर घातली तिचें स्वरूप व मापन आहे; त्याच्या जीवनदृष्टीचें विवेचन आहे. हें सर्व वाचीत असतांना जाणत्या वाचकाला आज-पर्यंतच्या समीक्षणांतील सर्व वादांचें स्मरण दिलें जातें; नवख्या वाचकाला तितकें सर्व आकळून त्याच्या मनांत त्या ग्रंथांचे पडसाद उठले नाहीत तरी त्याला कांहीहि दुर्बोध न वाटतां वाद-स्तंभांची ओळख होते. एवढेंच नव्हे तर अनेक ठिकाणीं चॉसरच्या एकेका ओळीवर जीं रणें माजलीं त्यांची सूचकपणें आठवण दिली जाऊन त्यांवर एखाद्या वाक्यांतच पण निश्चितपणें व आजच्या दृष्टीने अचूकपणें निर्णय दिलेला आढळतो. अशी नेमकी संशोधनदृष्टि व मोजकी शैली हें मानवी बुद्धीचें खरोखर एक भूषण होय. चवथें प्रकरण पंधराव्या शतकांतील लेख-कांच्या वाङ्मयीन परिस्थितीविषयी आहे व त्यादृष्टीने नाविन्यपूर्ण आहे; समीक्षेंतील सामाजिक-तेची एक नवी कक्षा दर्शविणारें आहे. पुढील दोन प्रकरणें पंधराव्या शतकांतील गद्य व पद्य यांना वाहिलेलीं आहेत. विशेष लक्षांत घेण्याजोगें हें कीं, २१९ पानांच्या मजकुरानंतर बारीक ठशांतील ११ पानें एका अतिशय उपयुक्त सनावलीला दिलीं आहेत; चार स्तंभामध्ये त्या त्या सालांतील (१) सर्व महत्त्वाच्या सार्वजनिक घटना, (२) वाङ्मयीन व सांस्कृतिक घटना, (३) काव्य-प्रकाशनें, व (४) गद्य-प्रकाशनें यांच्या याद्या दिल्या आहेत. शिवाय, या-नंतर जवळ जवळ ७० पानें तत्कालीन व आजपर्यंतच्या अशा या काळाशीं संबंधित असलेल्या अनेक ग्रंथांच्या याद्या दिल्या आहेत.

ऑक्सफर्ड विद्यापीठाने निर्माण केलेला वाङ्मयेतिहासलेखनाचा हा नवा आदर्श या प्रकारचा आहे. आपणा सर्वांना तऱ्हेतऱ्हेच्या तुलना करण्याची सवय जडली आहे. त्या दृष्टीने हा नवीन आदर्श जितका स्फूर्तिदायक तितकाच त्रासदायकहि होणार आहे. महाराष्ट्र साहित्य

परिषदेला आपल्या वाङ्मयेतिहासाच्या कार्यात केवढी मोठी चढण चढावी लागणार आहे ! या दृष्टीने इंग्रजी वाङ्मयेतिहासाच्या या कांही नमुन्यांच्या पाहणीवरून हातीं लागणारे कांही निष्कर्ष ध्यानांत घेण्याजोगे आहेत. फ्रेंच लेखक टेन याच्याप्रमाणे वाङ्मयांत राष्ट्राच्या अस्मितेचा सर्वांगीण आविष्कार पाहणें अवश्य आहे; परंतु, त्या दृष्टीवर अवास्तव भर देऊन वाङ्मय-प्रवाहांना तत्त्वाच्या जोखडांत बसवणें योग्य होणार नाही. जसरांदची तन्मयता व रसाळता हवी; पण महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या योजनेंत अनेक लेखकांच्या लेखनाचा समन्वय घालावयाचा असल्यामुळे त्या व्यक्तिगत तन्मयतेला जरा आळाच घालावा लागेल. म्हणून केंब्रिज योजने-प्रमाणे संपादकीय संयोजनाला पूर्ण वाव द्यावा लागेल. तसें केल्यास इतक्या अनेकविध लेख-कांच्या कार्यांतहि एकसूत्रता येऊं शकते. परंतु केंब्रिज योजनेप्रमाणे, विद्वानांना संमत होईल व त्याबरोबरच साधारणांनाहि आकलन होईल असा इतिहास लिहवून घेतांना सर्वच नीरस वा अपुरें होणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. इंग्रजी वाङ्मयेतिहासाच्या वरील नमुन्यांत हें अनपवादपणें दिसून येतें की, वाङ्मयीन युगांना व्यक्तींची—वाङ्मयीन वा राजकीय-नांवें देण्याची पद्धत पार मागे पडली आहे. तशी ती विशेष प्रचलित नव्हतीच. 'पीरियड्स ऑफ लिटरेचर' नांवाची एक माला आहे. तींत हा प्रकार स्वीकारला आहे. परंतु ती माला केव्हाच कामांतून गेली आहे. कालखंडांची विभागणी व नामकरण मुख्य वैचारिक वा वाङ्मयीन प्रवृत्तीप्रमाणेच झालेलें वा केलेलें आढळतें, आणि त्या मुख्य प्रवृत्तीच्या स्रोतामध्ये सर्व पाहणी व विवरण केलेलें दिसतें. परंतु, येथेहि जागरूकता बाळगणें अवश्य होईल. संकुचित वृत्ति, अर्धवट माहिती, उथळ विश्लेषण इत्यादि कोणत्याहि दोषांमुळे या प्रवृत्तींचें अचूक आकलन न झाल्यास सर्वच इतिहासलेखन विपरीत होईल. हे सर्व दोष कसे टाळावे, समतोल व प्रगाढ इतिहासलेखन कसें असावें याचा आदर्श ऑक्सफर्ड वाङ्मयेतिहासाने निर्माण केला आहे. इंग्रजी वाङ्मयेतिहासामध्ये ज्यांना रस नाही अशाहि आमच्या इतिहासलेखकांनी तो थोडा काळजीपूर्वक पाहिल्यास उपयुक्त ठरेल, असें वाटतें.

मानव—

क्षुद्र जंतूंची उत्क्रांति
आली मानवाच्या वंशा
'जीवो जीवस्य जीवनम्'
तत्त्व शिकवितो मासा
अश्रु नक्राचे मिळाले,
मिळे खास श्वानवृत्ति
लाभे मर्कटलीलांची
दिव्य पूर्वज संस्कृति !
दान गर्दभराजाने
दिली कायम दुगाणी

भाषाप्रभुत्वा कारण
पोपट हा गुरुस्थानीं
अस्वलानें गुद्‌गुल्या,
बगळ्याने ध्यानयोगा,
काकें दृष्टि, सर्पे दात,
दिल्या अमूल्य देणग्या !
पशुसृष्टींतून गोळा
होतां उपमाद्रव्यें तीं
भर बुद्धीची पडून
घडे मानव प्रकृति !

—गो. म. कुलकर्णी.

‘मराठी छंद’, ‘छंदोमंजरी’ आणि ‘छंदोरचना’ : ना. ग. जोशी

(१) ‘ छंदोरचने ’च्या मोठ्या आवृत्तींत कै. माधवराव पटवर्धन यांनी ‘ छंदःशास्त्राचा इतिहास ’ दिला आहे. त्यांत कै. राजवाडेकृत ‘ मराठी छंद ’ या निबंधांतील ‘चूर्णिका’ व ‘ सवाई ’ यांविषयींच्या उल्लेखांबद्दल आक्षेप घेणारा पुढील मजकूर आलेला आहे.

“ कामांत निष्काळजीपणाहि झाला आहे. दुसऱ्या परिच्छेदांत ‘ चूर्णिके ’चें जें लक्षण प्राकृतपिङ्गलांतील म्हणून देण्यांत आलें आहे तें वस्तुतः गङ्गादासाच्या ‘ छन्दोमंजरीच्या ’ सातव्या स्तबकांतील आहे. ‘ सवाई ’ हा शब्द फार्सी असून त्याचा अर्थ ‘ सारखा ’ असा आहे हें त्यांचें विधान खरें नाही. सवाई हा शब्द प्राकृत पैङ्गलांत आल्याचें ते लिहितात, पण प्राकृत पैङ्गलांत हा शब्द नाही असें प्राकृत शब्दसूचीवरून दिसतें.... ”

(२) कै. माधवरावांजवळ ‘ प्राकृत पैङ्गला ’ची कोणती आवृत्ति होती तें समजण्याला ‘ छन्दोरचनें ’त तरी आधार नाही. पण ती प्रत ‘ काव्यमाले ’मधील ‘ प्राकृतपिङ्गलसूत्रम् ’च्या प्रतीहून निराळी असावी. ‘छन्दोरचनें ’तील २ । १२१ हा उपजातीचा उल्लेख ‘ काव्यमाले ’च्या आवृत्तींतहि जरी तसाच सापडतो, तरी २ । १७५ हा ‘ ब्रह्मरूपका ’ची मोडणी देणारा ‘ छन्दोरचनें ’तील उल्लेख ‘ काव्यमालें ’तील प्रतींत गवसत नाही. परंतु गंमत अशी की ‘ काव्यमालें ’तील ‘ प्राकृतपिङ्गलसूत्रां ’त ‘ चूर्णिका ’ ‘ उत्कलिका ’ आणि ‘ वृत्तगन्धि ’ हे गद्याचे प्रकार दिलेले आहेत, व ते २।३४१, ३४३, व ३४६ या सूत्रांत आहेत. द्वितीय परिच्छेद ‘ छन्दोरचना ’ कर्त्यांना उपलब्ध होता हें वर दिलेल्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. मग ‘ चूर्णिका ’ व तिचें लक्षण ‘ प्राकृतपिङ्गलां ’तील नसून तें गंगादासकृत ‘ छन्दोमंजरीं ’तील आहे असें विधान कै. माधवरावांनी कसें केलें ? की त्यांच्या प्रतींत द्वितीय परिच्छेदांतील शेवटचा गद्यप्रकारांची सूत्रें देणारा भाग नव्हता ? ‘ प्राकृतपिङ्गलसूत्रां ’त पुढील सूत्रें आहेत :

अकठोराक्षरं स्वल्पसमासं चूर्णकं विदुः ।
तद्धि वैदर्भरीतिस्थं गद्यं हृद्यतरं भवेत् ॥ २ । ३४१
भवत्युत्कलिकाप्रायं समासस्थं दृढाक्षरम् ॥ २ । ३४३
वृत्तैकदेशसंबद्धं वृत्तगन्धि पुनः स्मृतम् २ ॥ ३४६

श्रीगंगादासविरचित ‘ छन्दोमंजरी ’च्या ३ ऱ्या आवृत्तींत हीं सूत्रें असून त्यांत फक्त २-३४१ मधील ‘ तद्धि ’ बद्दल ‘ तत्तु ’ आणि २।३४६ मधील ‘ वृत्तैकदेशसंबद्धं ’ बद्दल ‘ वृत्तैकदेशसंबंधात् ’ असा पाठ आहे. या आवृत्तीचे संपादक अध्यापक श्रीमद् गुरुनाथविद्यानिधि भट्टाचार्य यांनी हें स्पष्ट केलें आहे की, ‘ तस्य छन्दोग्रन्थस्य पिङ्गलादिभेदेन बाहुल्येऽपि छन्दोमंजरीमेव विद्यार्थिनां परमोपयोगित्वेन अङ्गीकुर्वन्ति विपश्चितः......’ परंपरेप्रमाणे संस्कृत वृत्तांचीं पिंगलोक्त सूत्रें व प्राकृतपिङ्गलसूत्रें एकाच पिंगलाचीं मानलेलीं आहेत. ‘प्राकृतपिङ्गलसूत्रां’चा कर्ता संस्कृतपिंगलकाराच्या मानाने फार अर्वाचीन आहे व कदाचित् एकाहून अधिक लेखकांचा हात त्याला लागला असण्याचा संभवहि अनेक अभ्यासक व्यक्त करतात. परंतु एवढें खरें की गंगादासाने या दोन्ही संस्कृत–प्राकृत पिंगलसूत्रांचा प्रस्तार कमी करून आपल्या ‘छन्दोमंजरी ’

त मुख्य मुख्य संस्कृत-प्राकृत वृत्तें दिलेलीं आहेत. ' चूर्णक '-' उत्कलिका ' ' वृत्तगन्धि ' या गद्यप्रकारांचीं जीं उदाहरणें ' छन्दोमंजरी 'त आहेत तींच प्राकृत ' पिंगलसूत्रां 'त आहेत. मग असें म्हणावयाचें काय की गंगादासाच्या ' छन्दोमंजरी ' मधील मजकूर ' प्राकृत पिंगलसूत्रां' त (निदान ' काव्यमाले 'च्या प्रतींत तरी) मागाहून वाढविला गेला ? पण अडचण अशी आहे की गंगादासांचा काल फार प्राचीन म्हणजे ' प्राकृत पिङ्गलसूत्रां ' एवढा प्राचीन आहे असें सिद्ध झालेलें नाहीं; आणि पं. लक्ष्मीनाथभट्ट या ' प्राकृत पिंगला 'च्या टीकाकारांना उपलब्ध असलेल्या प्रतींत हीं २।३४१, ३४३, ३४६ सूत्रें होतीं हें त्यांच्या तद्विषयक टीकेवरून दिसून येतें. म्हणजे यावरून निष्पन्न हें होतें की, राजवाडे यांनी ' चूर्णका 'चें लक्षण देतांना केलेला ' प्राकृत पिंगला 'चा उल्लेख बरोबरच आहे. बहुधा कै. माधवरावांना उपलब्ध झालेल्या प्रतींत तो भाग नसावा. (' छन्दोमंजरी 'च्या या आवृत्तींत ' चूर्णक वगैरें-चा उल्लेख सहाव्या स्तबकांत आहे, सातव्या स्तबकांत नव्हे, हें ' छन्दोरचनें 'तच ' छन्दोमंजरी ' प्रकरणीं नमूद केलेलें आहे.)

(३) ' सवाई ' हा शब्द ' छन्दोरचना ' कर्त्यांना प्राकृतपैंगलांत नसावा असें वाटतें. याचें कारण ' प्राकृतशब्दसूचीं 'त तो दिलेला नाही ! पण ' प्राकृतपिंगलसूत्रा 'च्या २ ऱ्या परिच्छेदांतच ' ' सवैआ ' नांवाने (२।२९१) हा छंद आलेला आहे. पुढे सूत्र २।२९२ मध्ये जी वृत्तांची यादी दिली आहे त्यांतहि १०५ वें वृत्त ' सवैआ ' आहे. टीकाकार लक्ष्मीनाथ ' सवैआ ' असेंहि रूप लिहितो व तें रूप आजहि गुजराती भाषेंत रूढ आहे. हा ' सवैआ ' म्हणजेच ' सवाई ' असून प्राकृतपिङ्गलांत याचें लक्षण ' मात्रा एकत्रिंशत्पादे पादे ' असें स्पष्ट दिलें आहे. मराठींत ' सवाई 'चें रूप भिन्नभिन्न रूढ झालें आहे व कित्येक कवि त्यांत एकोणतीस, तीस व बत्तीस मात्रांचे पादहि वापरतात. गुजरातींतहि २६, २८, ३०, व ३२ अशा विविध मात्रांचा ' सवैआ ' छंद आहे. (आता हा 'सवैआ' शब्द म्हणजेच ' सवाई ' आहे की नाहीं व ' सवाई ' शब्द फारशी आहे की नाही याविषयी मतभेद असणें शक्य आहे. पण मला तरी ' सवैआ-सवैया ' वरूनच ' सवाई ' निष्पन्न झाला हें सयुक्तिक वाटतें.) तेव्हा या बाबतींतहि वरीलप्रमाणेच प्रतींची भिन्नता हें या मतभेदाचें कारण मानावयाचें काय ?

(४) ' छंदोरचना ' कर्त्यांना अन्याय न व्हावा या दृष्टीने आपण असें मानावें की, राजवाडे व ते यांना ' प्राकृतपिङ्गलसूत्रां 'च्या भिन्न प्रती उपलब्ध होत्या (व कै. माधवराव ' प्राकृतपैंगल ' हें नांव वापरतात, ' प्राकृतपिंगलसूत्र ' नव्हे हें लक्षांत घेतां तें शक्यहि दिसतें.) व म्हणून राजवाड्यांच्या वरील दोन्ही उल्लेखासंबंधीं ' छन्दोरचना ' कर्त्यांना संदेह वाटला. परंतु असें असलें तरी ' कामांत निष्काळजीपणाहि झाला आहे, ' असें शेरेवजा विधान करून मग त्याला लागूनच उदाहरणार्थ वरील आक्षेप त्यांनी घेतले ते तसें न घेतां नुसता मतभेद दर्शविला असता तर तें संशोधकाच्या वृत्तीला अधिक योग्य झालें असतें. कारण आता वरील चर्चेवरून राजवाड्यांचे उल्लेख बरोबर आहेत हें कळल्यावर, वाचकांना ' छन्दोरचनेमध्येहि कामांत निष्काळजीपणा झाला आहे ' असें वाटल्यास क्षम्य नव्हे काय ?

(५) प्रस्तावनेंत संपादक श्री. भट्टाचार्य यांनी जो अभिप्राय व्यक्त केला तोच प्रत्यक्ष 'छंदोमंजरी' च्या पहिल्या स्तबकांतील २ऱ्या श्लोकांत ध्वनित केलेला आहे, व त्यावर संपादकांनी संस्कृत टीकेंत विस्तार केलेला आहे, तोहि स्पष्ट आहे.

अनुक्रमणिका

सन्ति यद्यपि भूयांसश्छंदोग्रन्था मनीषिणाम् ।
तथापि सारमाकृष्य नवकार्थो ममोद्यमः ।। २ ।। (प्रथम स्तबक)

यावरील टीका अशी आहे :

" यद्यपि मनीषिणां पिङ्गलादीनां पूर्वपंडितानां भूयांसः बहुतराःछंदोग्रंथाः ... वर्तन्ते, तथापि तेषु सत्स्वपि सारं सारांशं पिङ्गलादीनां ग्रंथेभ्यः इत्यर्थः आकृष्य नवकाः अनुकम्पार्हा ये बालकाः तेषां व्युत्पत्तये मम उद्यमः । " यांतील ' पिंगलादीनां ग्रंथेभ्यः ' या शब्दांवरूनच मीं येथे नमूद केलेल्या मुद्याला मूलाधार सापडतो. राजवाडे व माधवराव पटवर्धन यांना उपलब्ध असलेल्या ' प्राकृतपिंगला ' च्या प्रतीबद्दल पुढील खुलासा महत्त्वाचा आहे. राजवाड्यांपुढे ' काव्यमालेंतील प्रत किंवा तिचें एखादें हस्तलिखित असावें आणि माधवरावांपुढे कलकत्याच्या Biblioteca Indica मधील आवृत्ति असावी. कलकत्ता आवृत्ति ' आठ हस्तलिखितां ' वरुन तयार करण्यांत आलेली असून तीमध्ये ' सवैया ' व 'चूर्णिका,' यांचा उल्लेख नाही. सुप्रसिद्ध मराठी संशोधक श्री. अ. का. प्रियोळकर यांना माधवरावांप्रमाणेच राजवाड्यांनी केलेल्या उल्लेखाबद्दल शंका आली. पण त्यांनी त्याबाबत ज्या रितीने लिहिलें ती खरोखर स्पृहणीय आहे. ते लिहितात : "प्राकृत पिंगलाची राजवाड्यापुढे असलेली प्रत कोणाची हें माहीत नाही. " (' दमयंती-स्वयंवर,' पृ. ९७). त्यांनी याव्यतिरिक्त कांहीं आक्षेपवजा उद्गार काढलेले नाहीत. कारण 'काव्यमालें' तील प्रतींत हे उल्लेख आहेत हें कळून आल्यावर आक्षेपवजा उद्गार कसे अप्रस्तुत व अनाठायीं ठरतात तें मीं वर दाखविलें आहेच.

तों कुणी कोकिळा....

हां वृक्ष येथला चिंचेचा ध्यानस्थ
ढाळीत उसासे अशुभाचे करुणार्त;
ये अवचित कुठुनी कसलें गंधित गीत
की पर्णोपर्णी घुमलें सायंसूक्त ?
या संध्याछाया घोषति गरुडपुराण
अन् आभाळाचा कलंकला अभिमान;
हेमंत गोवितो निज अश्रूंची वीण
क्षाळण्या मनीचें कोळपलेलें स्वप्न
हें अशा अकाळीं असेंकसें शुष्कलें
दिनरात मानसीं व्यथापुष्प जें जपलें ?
जीवनीं उमळला ग्रीष्मताप आसुरी
तों कुणी कोकिळा कुहुकुहुली अंतरीं !

—राम शेवाळकर

इथे केधवा ?

धुरकटलेला डोंगरमाथा
रखरखलेली दुपार पिवळी
थरथरणारें मृगजळ भंवती
नांगरलेली जमीन काळी
तीव्र उन्हाचा मार खाउनी
पेंगुळलेला घामट वारा
भिरभिरणारा इकडे तिकडे
हरिणाचा तो कळप बिचारा !
उमटायाचें इथे केधवा ?
जलबिंदूंचें सुस्वर गाणें
वाट पाहती तहानलेलें
बियांत अंकुर केविलवाणे !

— तुळशीराम काजे.

विष्णुदासनाम्याचें ‘द्रौपदी–स्वयंवर’ :

हरि नारायण नेने

१. कै भावे यांनी आपल्या ‘महाराष्ट्र-सारस्वता’ मध्ये एकनाथपंचकाच्या प्रारंभीच्या पांचसहा पानांत या कवीचा परिचय करून दिला आहे. प्रस्तुत लेखामुळे वाचकांना या मराठी महाभारतकाराची अधिक ओळख होईल अशी आशा आहे.

२. ज्ञानेश्वरापासून एकनाथापर्यंत श्रीगीता व श्रीभागवत यांवर मराठींत ग्रंथरचना उभारली गेली; पण त्या सर्व रचनेचा ओढा तत्त्वज्ञान समजून देण्याकडे विशेष होता. सामान्य लोकांना तत्त्वज्ञानाचें जडान्न, ज्ञानेश्वरासारख्यांच्या अमृतमयवाणींत जरी घोळलेलें असलें तरी तें पचायला कठीणच. रुक्मिणी-स्वयंवराची कथा, वेदान्तावर भर न देतां प्राकृतजनांना जितकी रसाळ व गोड वाटेल, तितकी ती अध्यात्मदृष्टीने उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला असतां आकर्षक वाटणार नाही. त्या कथेंतील अध्यात्मदृष्टि लेखकाविषयी पूज्यता व आदर उत्पन्न करील, पण ती साधीसुधी कथाच लोकांना जितकी तन्मय करून सोडील, तितकी अध्यात्माच्या बैठकीवर उभारलेली रचना मोहविणार नाही. मुलांना किंवा बालमतीला गोष्ट आवडते; तात्पर्य किंवा सार त्यांचें त्यांनी काढावयाचें असतें, तरच ती गोडी घेत घेत ते गोष्टींत रमतात. पण सारांश सांगण्याचा प्रयत्न चालू होतांच, बालमतीला तें झेपत नाही.

३. ज्ञानेश्वरीपेक्षा, रुक्मिणी-स्वयंवर व एकनाथी भागवत यांच्या वाचनाकडे सामान्य जनाची ओढ कां, याची मीमांसा केल्यास, गोष्टीवेल्हाळ सामान्य जनतेला भागवतांतील अनेक सुंदर सुंदर गोष्टी व त्यांतील मनोहर प्रसंग यांचें आवडतें खाद्य भरपूर मिळत होतें हेंच होय. ज्ञानेश्वरीदेखील सामान्य जनतेला झुलविते, ती तिच्यांतील उपमा-दृष्टान्तांच्या अपूर्वतेमुळे; पण दृष्ट व व्यक्त गोष्टींवरून अदृष्टाकडे व अव्यक्ताकडे विद्वानांचीं पावलें वळूं लागलीं म्हणजे सामान्य माणसें आपला पाय हळूहळू काढता घेतात. भिन्न रुचींच्या सामान्य जनतेला त्रिगुणात्मक संसारांतील जीवनप्रसंग जितके आकर्षक व जिव्हाळ्याचे वाटतात तितकी वेदान्ताची उत्कृष्ट चर्चा वाटत नाही हें वाङ्मयांतील लोकप्रियतेचें महत्त्वाचें तत्त्व आहे. जनताजनार्दनाची सेवा मराठीच्याद्वारें कशी करावयाची हें आरंभींच्या महानुभाव ग्रंथकारांनी जितकें जाणलें तितकें इतरांनी नाही, असें म्हणणें भाग पडतें. संस्कृत पंडितांनी आमच्या मराठी ग्रंथांना मान तुकवली पाहिजे हें पटविण्याकडे महानुभावेतर मराठी लेखकांचा जितका ओढा आरंभींच्या १००–२०० वर्षांत होता, त्यापेक्षा जनतेच्या मनाची नाडी ओळखून त्यांची आवडनिवड व क्षमता लक्षांत घेऊन, लोकांच्या अपरिपक्व मनाला झेपेल अशा तऱ्हेची वाङ्मयनिर्मिति करण्याकडे आरंभींच्या महानुभावी लेखकांनी अधिक लक्ष दिलें होतें हें लक्षांत घेणें अवश्य आहे. त्यामुळे महाभारतावर आधारलेली ग्रंथरचना करण्यास महानुभाव ग्रंथकार प्रथम प्रवृत्त झाले तर त्यांत आश्चर्य कोणतें ? मुक्तेश्वराच्या अगोदर मराठी जनतेला ‘ भारती कथेची ’ गोडी लावणारा कवि म्हणजे ‘ विष्णुदासनामा ’ होय. त्याने ‘ भारतीय कथा ’ अगदी सुटसुटितपणाने मराठींत आणून, मराठी वाचकांना कांही दिवस गुंग करून टाकलें होतें यांत संशय नाही. मुक्तेश्वराइतका तो रसाळ नसेल, मुक्तेश्वरी भारताइतकें पांडित्याने व अलंकारांनी ‘ विष्णुदासनामा ’ याचें भारत पदोपदीं चमकत नसेल, तथापि भारती वीरांचे परस्परांतील स्वभावानुरूप आकर्षक संवाद, मल्लयुद्धाचीं वर्णनें, आडकथा व

मनोहर गोष्टी यांचा भरदारपणा इत्यादि बाबतींत 'विष्णुदासनामा' याने वाचकांना मराठी भाषेची उच्च तऱ्हेची मेजवानी दिली नसली तरी, चमचमीत जेवणें व्यवस्थित पुरविलीं यांत संशय नाही. माझ्या या म्हणण्याला निश्चित आधार कोणता तो आज आपणांस पाहावयाचा आहे.

४. 'विष्णुदासनामा' हा शालिवाहन शकाच्या पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला असावा असें दिसतें. तो एकनाथपूर्व, फारतर समकालीन असावा. या कवीनें महाभारताच्या पर्वांच्या शिवाय आणखीहि निरनिराळ्या प्रसंगावर व प्रकरणांवर रचना केलेली आढळते. मला पाहावयास मिळालेलें 'द्रौपदी-स्वयंवर' हें ओवीबद्ध काव्य त्यांपैकीच एक आहे. हें काव्य साध्या सरळ बाळबोध लिपींत असून त्यांत सात प्रसंग म्हणजे अध्याय आहेत. एकंदर ओवी-संख्या ५५५ आहे. या काव्याचा शेवट पुढीलप्रमाणे आहे :

'पांडव प्रवेशले नगरीं । जन भेटों आले झडकरी ।
शृंगारीली वरणावती नगरी । मनोहर देखा ॥
घरोघरीं गुढीया तोरण तुर । ध्वजे पताकाचा फूत्कार
रंगमाळा घातल्या विचीत्र । मंडपद्वारीं ॥
नगरवासिया लोका । मोहोच्छाव जाला देखा ।
घरोघरीं मानिती हरषा । पांडव आले म्हणोनी ॥
ऐसा मोहोच्छाव नगरीं ! अरत्या करीति नगरनारी ।
उपायनें परोपरीं । आनीति सकळ ॥
संजयो म्हणे व्यासमुनी । तु आमुचा होधि चिंतामनी
आम्हा केली धर्मधावणी । श्रीकृष्णनामाची ॥
श्रीकृष्णनाममंत्रमाळ । सदास्मरणीं जो सकळ
तयासी पावैल गोपाळ । द्वारकेचा ॥ '

इति श्री महाभारथेः सतसहस्रसंहीतायांः द्रुपदी सैवरः सप्तमो प्रसंग हा ॥७॥ '

यानंतर पुढे ग्रंथलेखनाचा शककाल वगैरे कांही दिलें नसून एक कृष्णवर्णनपर श्लोक आहे. 'वामन पंडितांच्या' श्लोकाची त्यावरून आठवण होईल. हा श्लोक कोणाचा आहे हें कळावयास मार्ग नाही. केवळ यानंतर प्रकरण संपलें म्हणून तो या कवीचाहि असूं शकेल.

" माथा पिच्छजटी, श्रू-रत्न मुगटी, माळा गळा गोमटी ।
पावा वोष्ट-पुटी, हिरे मनगटी, मुर्त्त स्वयं धाकुटी ।
कासे पीतपटी, धनुस्य दपटी, गाई करें यापटी ।
भक्तार्ते प्रगटी, स्वभक्तनीकटी, ऊभा यमूने तटी ॥ "

मुक्तेश्वरी विराटपर्वाच्या एकूण ओव्या ९९० आहेत, त्या मानाने ५६५ ओव्यांचें 'द्रौपदीसैवर' हें एक प्रकरण ठीक आहे यांत संशय नाही.

५. मुक्तेश्वराने द्रौपदीस्वयंवरांतील 'पणा' च्या संबंधाने केलेला उल्लेख लक्षांत घेऊन येथे काय सापडतें तें पाहूं :

'द्रौपदी स्वयंवर' करतांना श्रीकृष्णाने द्रुपदाला सुचविलेला उपाय पुढीलप्रमाणे होता.

" कढे ठेउनी आग्नीवरी । तेल घालावं भीतरी
लक्ष मांडविलं वरी । तेथ रूप पाहुनि भेदावें ॥ १९ ॥

तेथ बाणाची संख्या । भेदावया तया लक्षा
न भेदवे तरी सिक्षा । कढे मध्यें घालावं ॥ २० ॥
ऐसी तेथचि विधी । राजे देशोदेशींचे प्रसीद्धी ।
ऐसी वार्त्ता जनपदी । यकचार्क्रि प्रगटली ॥ २१ ॥

ब्राह्मणांनी युधिष्ठिराला एकचक्रनगरांत जी वार्ता सांगितली ती अशी :—

' यावरी बोले ब्राह्मण । सैंवरी केला असे पन
कढइ माजी तेल घालुंण । वरील लक्ष मांडिलंसे ॥
वेळुवि बांधलासे मासा । तयाचा वेग फिरे कैसा ।
द्दष्टिसी न दीसे सहसा । आवघड आसे ॥ २९ ॥
तेल कढइमध्यें तावित । बिंब पाहीजे हो तेथ ।
लक्ष भेदावं त्वरीत । तिहीच बाणीं ॥ ३० ॥
तिन बाण हो सरती । आनि लक्ष न भेदिती
तरी उचलोनि टाकिती । कढे मध्ये देखा ॥ ३१ ॥
ऐसं जो लक्ष भेदी । तया माळ घालिल द्रपदी
ऐसी केली आसे ह विधी । तया सैंवरासी ॥ ३२ ॥
यावरी म्हणे योधीष्टीरु । पन आघटित आहे थोरु
ऐसा कोन आहे धनोर्धरु । तया लक्ष भेदी ॥ ३३ ॥
पुनरपि ब्राह्मण होय सांगता । म्हणे आइकीली जे पुर्ववार्त्ता
जे द्रपदी यावि पार्था । हें मनोगत द्रपदाचं ॥ ३४ ॥
परी पांडव जोहरी निमाले । द्रपदं कृष्णासि पुसीलें
तेण ' रारा ' यंत्र मांडविलें । ते न भेदवे आनिकासि ॥ ३५ ॥
ऐसं मनोगत श्रीकृष्णाचें । जरी अर्ज्जुन जोहरी वांचे ।
राजे मिळति त्रिभवनीचे । तर तोही तेथं यईल ॥ ३६ ॥

६. द्रुपदाच्या नगराला येतांना, पांडवांना वाटेंत चित्ररथगंधर्वाशीं भागीरथाच्या काठीं थोडा झगडा करावा लागला, त्यांत शेवटीं पांडवांचा जय झाला व चित्ररथगंधर्वाने अर्जुनाला ' चक्षुर्श्री ' विद्या दिली. व तिचा उपयोग द्रौपदीस्वयंवरांतील पण सिद्धीस नेण्यास कसा होईल याचें वर्णन कवीने पुढीलप्रमाणे केलें आहे :

' तेल कढइ माजी उतत । तें केलं पाहीजे शांत ।
तर ते मी आसे विद्या देतं । ते तुम्ही अंगीकारा ॥८९॥
तरी ही वीद्या असे चाक्षुकी । [3]तेणेणि जिति[4] तीही लोकी ।
आणिक सर्वही शस्त्रं [5]नीकीं । [6]य विद्ये[6] पासोनियां ॥९०॥

---

१ घालुण, पन, ब्राह्मण यांतील यमक लक्षांत घेतल्यास, घालोनि, घालौनु, घालोनि, घालोनु इत्यादि रूपांतील इ व उ नाहीसे होऊं लागले होते हें लक्षांत येईल. २ ' मांडिलें असें ' या जागीं 'लें' वरील मात्रा जाऊन, केवळ उच्चारांतील अनुस्वार बाकी राहिला, असें दिसतें. ३ त्याने ४ जय. ५ खरोखर (निकी). ६ या विद्येपासून; यईल (येईल); यथ (येथ); य विद्ये (ये विद्येपासूनि) इत्यादि रूपांत ' य ' वरील मात्रा गेली हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

यर्णेचि मंत्रें करुणी । दर्भसीखा अभीमंत्रोनी ।
सिखा कढई माजि घालोनी । मग तें तेल सीतळ होय ।।९२।।
ऐसं हें विद्येचें सामर्थ्येफळ । जें कल्पिल तें पावे सकळ ।
हे विद्या देखा प्रबळ । आम्ही तुम्हासी समर्पिली ।।९३।।

७ मुक्तेश्वराच्या भारतांत वरील ' पणा ' विषयीची माहिती थोडक्यांत पाहून त्यासंबंधी विचार करूं :

' तें अवक्र नळिकाचक्र । भेदोनि पाडिलें मकरयंत्र
देखोनि सहस्रनेत्राचे नेत्र आनंदाश्रु सांडती ।। ७१ ।।
प्राकृत कवींचा वाग्जल्प । तैल कढईत पाहूनि रूप ।
फिरतां मत्स्य सकंप । वामनेत्रीं विंधिला ।।७२।।
परि तें मूळभारतीं नाहीं । म्हणोनि असो न बोलों कांहीं, ।
नळिकाछिद्रांतूनि पाहीं । यंत्र भेदोनि पाडिलें ।।७३।।
गंधर्वदत्त–विद्यावरें । यंत्र भेदितां धनुर्धरें ।
सात्त्विकभाव भिन्नाकारें । सकळां देहीं उदेले ।।७४।। (आदिपर्व, अ. ४१).

मुक्तेश्वराचें म्हणणें की मूळभारतांत ' नळिकाछिद्रांतूनि पाहीं । यंत्र भेदोनि पाडलें ' अशी कथा असून, ' कढईत तेल उकळत होतें त्यांत पाहून ' हें म्हणणें व्यासोक्तीला धरून नाही.

८ ' द्रौपदी-स्वयंवरा 'ला प्रारंभ करतांना, कवि व्यासाचा गौरवपूर्वक उल्लेख करीत आहे. ' जन्मोजया प्रष्ण करी । वैशंपायन अवधारी । तुमचेनि दर्शनें दोष गेले दुरी । ब्रह्महत्या नासलीया ।। १ ।। धन्य तें व्यासाचें कथन । मृत्युलोकीं अमृतपान । करावया पातक क्षाळन । हीतकारक जगा ।। २ ।। ' ' विष्णुदासनामा ' मोठ्या गंभीरपणानें कथा सांगत आहे हें पुढील ओवीवरून दिसतें : ' तेथोनि शैवराचा मोहाब्छावो । जो कां आदिशक्तीचा विव्हावो । सांगे विष्णुदासनामा नवलावो । श्रोतयाप्रती ।। ' (प्रसंग २, ओ. ११०.) तिसऱ्या प्रसंगाचे शेवटीं, ' आपण हरिवंशाचा इतिहास धरून सांगत आहोंत ' असें विष्णुदासनामा म्हणत आहे : ' जे संसारसिंधुची तारणी । ते मोक्षपददायिनी । व्यास म्हणे मुकुटमणी । तें आईक जन्मोजया ।। वेदपुराणाचे संवितीं । हरिवंशाचा इतिहास म्हणती । तो सांगे विष्णुदासनामा प्रती । कथाकौतुक आइका म्हणे ।। ' अशा प्रकारें ' हरिवंशाचा ' आधार घेऊन एक आडकथा किंवा आख्यायिका विष्णुदासनाम्यानें सांगितली आहे. पांचाळनगराला पांडव आले असें कळतांच, श्रीकृष्ण पांडवांना भेटला व परत जाते वेळीं एक मोठ्या किंमतीची मुद्रिका धर्माजवळ श्रीकृष्णांनी दिली.

' बोले त्रैलोक्य स्वामी । आता मंडपासी यावे तुम्ही ।
रारायंत्र भेदुनि पराक्रमी । अर्ज्जुन द्रुपदी आनिल ।।
हें जानावें जी निश्चयो । ऐसं बोलिलें यादवरावो ।।
प्रसन्न होउणीयां स्नेहो । मुद्रीका दीधली धर्म्मापासी ।।
तीयेसीं मोल पृथ्वीखंड नव । ऐसा बोलिला व्यास देव ।
आतां असो हें ठेवाठेव । आइका पुढील कथा ।।

या मुद्रिकेला उद्देशून कवि चौथ्या प्रसंगांतील एका विनोदकथेची सुरवात करीत आहे. ' हे व्यासाचिया श्लोका । रहस्य बोलीजे उन्मेखा । धर्म्माहातीं देउनि मुद्रिका । उठोनि गेला मंडपासि ।। भीम म्हणे युधीष्टीरा । क्षुधेण पीडीले शरीरा । चांचरी जातसे अवधारा ।

डोळे गरगरा भवंडती ॥ तवं बोलीला धर्मसखा । बा रे कृष्णे दीधली मुद्रीका । हे यत्नादीया देई आईका । जेवीं पोटभरी ॥ पोट न भरे त्रिशुद्धी । आपुली मागावी मुदी । ऐसी तुम्ही करावी बुद्धी । आज्ञा ऐसी दीधली ॥ ' मुद्रिका दाखवून पोटभर जेवण मिळविण्याचा प्रयत्न भीमाने भिक्षेकऱ्याच्या रूपाने कसा केला, पांचाल नगरांत जेथे अनेक राजेरजवाड्यांसाठी अन्न सामुग्री तयार होती त्या स्वयंपाकघरांत देखील भीमाच्या भुकेला पुरेसें अन्न कसें मिळालें नाही, मुद्रिका परत मागतांना भीमाचें भांडण प्रधानपुरुषाशीं कसें झालें, शेवटीं श्रीकृष्णाने तें कसें कुशलतेने मिटविलें इत्यादि गमतीदार कथा कवीने सांगितली आहे. ही कथा कवीला खरोखरच ' हरिवंश ' किंवा ' व्यासभारत ' यांच्या एकाद्या आवृत्तींत सापडली, अथवा कवीने दुसरीकडून कोठून मिळवली, की कल्पनेने जुळवली, हें कळत नाही; पण हा प्रसंग संपावितांना कवि म्हणतो,

ऐसीं सांगीतलीं रहस्यें । विनोदें बहुत आनि हास्यें । बोलिलों
सहस्कृताचेनि श्लेशें । सांगे नामा विष्णुदास ॥ प्रसंग ५ ॥

कोणत्या व्यासोक्तीच्या आधाराने अथवा संस्कृतग्रंथाच्या लेशमात्र वचनावर अवलंबून, अथवा पुराणोक्तीचा 'श्लेश' काढून कवीने ही 'आडकथा' रंगवली तें मात्र कळत नाही. विष्णुदास-नामा याच्या महाभारतांत अशा कांही चमत्कारिक कथा येतात यांत प्रश्न नाही तेव्हा ' रारा ' यंत्र म्हणजे काय, मासाचा शिरच्छेद करण्याचा पण म्हणजे काय, यासंबंधी कवीने आपली कल्पना स्वतांच बांधली, किंवा कशाचा तरी आधार त्याला सापडला, हें मात्र अजून कळलें नाही. शालिवाहनाच्या १४–१५ व्या शतकांत विंध्याद्रीचे दक्षिणेस महाभारताचा कोणता पाठ, मराठी जनतेच्या विद्वज्जनांच्या वाचनांत असे, अथवा महाभारतकथा ज्यांनी आपल्या पंथासाठी उपयोगांत आणण्याचें ठरवून त्यांत बदल केला असे बौद्ध, जैन, लिंगायत यांनीं महाभारतांतील कथा निराळ्याच प्रकाराने सांगणारा एकादा ग्रंथ निर्माण झाला होता, हें कळल्याशिवाय ' विष्णुदासनामा ' याला बोल लावतां येत नाही. तो महाभारताची उपरोधपणाने थट्टा करीत होता असें म्हणण्यास कोठेहि आधार नाही. उलटपक्षीं भारतीय वीरांविषयी प्रसंग-विशेषीं त्याने गौरवोद्गारच काढलेले आहेत. कथाप्रसंग वर्णन करतांना तो तत्त्वज्ञानांत मुळीच शिरत नाही. कृष्णकथेच्या प्रेमाशिवाय महानुभाव तत्त्वज्ञानाचा अंशमात्रहि त्याच्या महा-भारतांत सापडणार नाही. व्यासांनी जशा भूमिका रंगविल्या तशाच तो वर्णन करतो. तेव्हा व्यासकथेतील तपशीलाचे कांही निर्देश ' विष्णुदासनामा ' याला कोठे मिळाले, हा एक मोठा प्रश्न आहे. गंधर्वांची ' चाक्षुकी ' विद्या कोणत्या रीतीने उपयोगी पडली हें ' विष्णुदासनामा ' याच्या उपपत्तीवरून जितकें स्पष्ट वाटतें तितकें मुक्तेश्वरी भारतावरून कळत नाही. ' क्षेमेंद्राच्या ' भारतमंजरी 'त पुढील श्लोक येतो :

' अधृष्यं कार्मुकं यत्र राधायन्त्रं च पार्षत: ।
तनयावरणे चक्रे शौर्यशुल्कपरं पणम् ॥ (भारतमंजरी १०३० श्लो.)

यामध्ये ' राधायंत्र ' या जागीं ' रारायंत्र '' असा पाठभेद असेल काय ? ' राधायंत्र ' असाच मूळ पाठ असेल तर त्या यंत्राचें वर्णन कोठें आलें असावें हें पाहणें अवश्य आहे. तसेंच ' चाक्षुकी ' विद्येचें स्पष्टीकरण कोठे असल्यास, त्याचाहि विचार करणें जरूर आहे. संस्कृत पंडितांनी या गोष्टींचा उलगडा करण्यास मदत करणें अवश्य आहे.

९. ' विष्णुदासनामा ' याची वर्णनशैली कशी आहे तें आता पाहूं या : एकचक्र-नगराहून पांडव पांचाळनगरीला येतांना वाटेंत गंगानदी लागते. तिचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे :

' व्यास वचन आईकौणी । शीघ्र निगाले तेथौणी । आले भागीरथी टाकौणी[1] । जे मुक्तिदायक प्रानियासि ॥ जे विश्वजनतारक । भक्तमुक्तदायक । सगरास्तेव मृत्यलोक । पावलि प्राणियास ॥ ना ते विष्णुचरणांवुज । ईश्वरजटाजुटी केवळ विज । श्रोते कवि चरणांवुज । विणवित असे ॥ असो हे बहुत सांगतां । तर विस्तारा जाइल कथा । पांडव आले या तथा ग्रंथा । आईका श्रुते हो ॥ पांडवि देखिली भागिरथी । आन्नेगीं स्तोत्री केली स्तुती । घाली साष्टांग दंडवता प्रती । जय जय कल्पवृक्षे ॥ जय जय ब्रह्मकुळदायक । जय जय विष्णुपादोदक । जय जय रुद्रकन्यैक । सगर-उद्धरीणी ॥ मग करुणी आघमर्शण । संध्या. स्थान टीळेतर्पण । देवा नैवेद्ये दाउणी । भोजन सारिलें तेहीं ॥ "

प्रस्तुत वर्णन वाचतांना शब्दांची निवड इतकी साधी व सरळ आहे की सामान्य-जनांना कवीचा भाव सहज ग्रहण करतां यावा. पांडव पांचाळनगरांत ब्राह्मण वेषाने शिरत आहेत त्यावेळचें पांचाळनगरीचें वर्णन कवि करीत आहे :

' वेश ब्राह्मणाचे धरिले । द्वादश टीळे लाविले । ऐसा विचारासि विनटले । जैसे गंगेचिया धारा ॥ हातीं दर्भासनें पवित्रें । भिरवति धोत्रें केळोत्रें । मज पातां पंचवर्त्रें । वेश धरिला ॥ तेहीं देखीलें पांचाळनगर । दिप प्रकाशले तेथ थोर । जेथं प्रवर्त्तला मनोहर । तें नगर कैसें वर्णावें । ते जयाची कुमरी । आदीमाया कुळेश्वरी । काय वर्णु तिय नगरी । जे तियेचेनि शोभिवंत ॥ सकळ सपत्तीसी सैवरा । यर्न जैालं सारंगधरा । वर्णितां तिर्थ नगरा । गती आपुर्णता जाली ॥ शतकोटि सिद्धीसि ज्या । आलया उपकारा जयाचिया काजा । तेथ मत्तिप्रकाश माझा । केवि घडैल ॥ कुत्रीर अळकावतीचा । जो भांडारी द्रव्याचा । मुख्यनायक सभेचा । होउनि बैसला असे ॥ जो यमपुरीचा स्वामि आवघडा । तो पुण्यपापाचा करी निवाडा । जो राजा यमधर्मा गाढा । सभामंडपा आला ॥ तेथ मेळ्यावरि बैसोणी । आग्नि आला सैंवरागुनी । नागकुळ पाताळाहुनि । आनंत वासुगी तक्षकें ॥ तेथ गौरीहराचीया नंदना ।यर्न जैालं गजवदना ते नगरिंची वर्णना कैसी करावी ॥ आतां असो हे रसवृत्ती । पांडव नगरामाजि प्रवेशती । कुल्लाळ साळेसि जाती । कोंतीये समवेत ॥ ' या वर्णनांत सिद्ध-साधक, कुबेर-यमराज सारखे लोकपाल, नागसुरगपन्नग, अग्नि, गणपति यांसारख्या देवता, स्वयंवरार्थ आपआपल्या सिद्धीसह कशा येत होत्या यांचें वर्णन 'रसवृत्ती'ने कवीने केलें आहे.

क्षत्रियसभेंत राजांपैकी कोणी उठत नाहीत असें पाहून, द्रुपद ब्राह्मणसभेंत आला त्यावेळची ब्राह्मणांची स्थिति विनोदाने वर्णिली आहे.

' ते म्हणति हो राजया । देह वेदाक्षरीं राया । पाटीं बैसोनि वरीया । धर्मक्रीडा करुणी । यक म्हणति चरणक्षाळण । आहा वोपी कन्यादान । मंत्रयुक्त करुणी पाणिग्रहण । ग्रहस्थाश्रम करुनि द्यावा ॥ यक म्हणति आम्ही भिक्षुक । नीत्य करु वेद-घोक । राज्यांतीं कितियेक दुःख । परत्रि नरक असती ॥ ऐसा रळीया करी ब्राह्मण । तें आइकुनि वीर आर्ज्जुन । धर्मासि म्हणे आज्ञा' देन । लक्ष भेदीन ततक्षणीं ॥ '

अर्जुन ब्राह्मणसभेंत जेव्हा उभा राहिला, तेव्हा अशीच टीका सुरू झाली. ' तेथ समस्त विप्रकुळी । तयात्री आरंभिली रळी'[12] । म्हणाति सांवरी सांवरी झोळी । कडासन भूमीसि पडलें ॥

१ प्राप्त व.रून घेऊन. २ सगरामुळे. ३ ' केळवस्त्र निरी ' ज्या धोतराच्या नेसण्यांत दिसते. ४ महादेव; कारण द्रौपदी उमेचा जणु अवतार. ५ येणें झालें. ६ त्या नगराला. ७ येणें झालें. ८ कुंतीसह. ९ पहा : 'रसवृत्ती म्हणिपेल कथा ' (ज्ञानेश्वरी अ. १०-४०.) १० ' आम्हो धर्मक्रीडा करुणी' वेद म्हणून आम्ही दाखवितां. ११ आज्ञा द्यावी. १२ थट्टा.

यक म्हणति परियेसा । यासि आम्रखांम्राची आशा । आपणाचि पडावें सहसा । यका निमित्त करूनि ॥ यक म्हणति हा श्लाघु । दीपका द्यावया भोगु । न विचारितां पडे पतंगु । प्राणत्याग होय त्याचा ॥ ना तरि गिळिता आविसों[1] । मिण पडे तात्काळ फांसा । तैसा न विचारितां आपुला धीवेंसा[2] । द्रुपदी आशौ[3] प्राण तेजी[4] ॥ यक म्हणति अनंगाचें करण । ते हारपे बुद्धी पासौन । आपकीर्ति तोखवण । ऐसें मनीं विचारि ॥ ...... दुर्योधनासारखा राजा । तो दाटला लोकलाजा । तेथ किती याची पैजा । प्राणासि धरणें घेतलें ॥ ...... यक म्हणति अर्ज्जुन गमे अह्मां । लक्ष भेदोनि नेईल रमा । पाहा जनकाघरीं राजोत्तमा । रामें जानकी प्रणिली ॥ '

अर्जुनाने पण जिंकल्यावर, कौरव व पांडव यांचें जें लहानसें भांडण झालें त्यांत शैल व भीम यांचें मल्लयुद्ध थोडक्यांत पुढीलप्रमाणे वर्णिलें आहे. 'तो अंगोसें भीडे । दोघे वीर बळी-याडे । मालयुद्ध जालें गाढें । भीडतां दोवांसि ॥ मग धरिला बाहिवटी । जैसी कां मगराची मिठी । सोडविता जाला जगजेठी । पर ते मीठी सुटेना ॥ तेव्हळीं तेणें पंडुसुतें । युधीं पराभाविलें शैल्यातें । मग भीरकाविलें त्यातें । जेथ होता दुर्योधन ॥ तो आदळला थोरू। तयासी पुसे गांधारू । हा होईल यथार्थ वृकोदरू । ऐसें वाटे मजसि ॥ '

वरील वर्णनांवरून विष्णुदासनामा हा कवि सामान्यजनांच्या दृष्टीने गोष्टीवेल्हाळ असल्याने व लोकांच्या आवडीच्या गोष्टी कोणत्या ढंगाने सांगाव्या हें त्याला नीट ठाऊक असल्याने, आपल्या साध्याभोळ्या पण सरस शैलीने जनतेला तो आवडला असला तर त्यांत आश्चर्य नाही. भारतीकथेची अभिरुचि जनतेंत उत्पन्न करणारा पहिला मराठी कवि हा त्याचा मान त्याला देणें इष्ट आहे हें या लहानग्या 'द्रौपदीस्वयंवरा' वरून देखील वाचकांना कळेल.

१० ज्या जुन्या पोथीवरून उतारे घेतले ती पोथी बाळबोध लिपींत आहे; सांकेतिक लिपींत नाही, हा या पोथीचा विशेष. पोथीचा लेखन शक म्हणजे 'सकें १६७३ ॥ प्रमोदो संवत्सरी। वैशाखमासाभीतरी ॥ अदीतवार दीसा अवधारी ॥ पुस्तक संपूर्ण जालें ॥ पुणें ग्रामांत । ग्रंथ संपूर्ण जाला तेथ । येक द्वितीया तीथ म्हणत । शुद्धपक्ष ॥ जांम्रोद संज्ञा जयास । माता मयंकनाम भास । तया सुत दत्त सुरस । हस्तआक्षरे जाना ॥ '. सारांश या पोथीला दोन शतकें लिहून झालीं.

१ आमिष. २ हिंमत. ३ द्रौपदी मिळण्याच्या आशेने. ४ टाकी.

परीक्षणें

'अश्रु'–[लेखक : वि. स. खांडेकर, प्रका. देशमुख आणि कंपनी, मूल्य ६ रु.; पुणें २.]

भाऊसाहेब खांडेकर यांच्या 'क्रौंचवध' या सुप्रसिद्ध कादंबरीनंतर जवळ जवळ एका तपाने त्यांची 'अश्रु' ही कादंबरी बाहेर पडत आहे. अकरा वर्षांत त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहिण्याचे संकल्प केले – कांही कादंबऱ्या अर्धवट लिहिल्या गेल्या व त्या अपूर्ण राहिल्या – "खांडेकरांचें कादंबरीलेखन आता संपलें; त्यांची प्रतिभा आता मंदावली" असेंहि कांही टीकाकार त्यांच्याविषयी बोलूं लागले. अशा वेळीं अचानक "अश्रु" ही कादंबरी घेऊन त्यांनी पुन्हा कादंबरीच्या क्षेत्रांत प्रवेश केला आणि रसिकांना व टीकाकारांना आनंदाचा व आश्चर्याचा धक्का दिला. कादंबरीच्या क्षेत्रांत आपली प्रतिभा अद्याप अविरतपणें संचार करीत असल्याची साक्ष तर त्यांच्या "अश्रु" या कादंबरीने दिलीच – पण त्यांच्या प्रतिभेला नवे पैलू पडले असल्याची जाणीवहि या कादंबरीने करून दिली.

खांडेकरांच्या आतापर्यंतच्या कादंबऱ्यांपेक्षा "अश्रु" या कादंबरीचें स्वरूप अगदी निराळें आहे. आतापर्यंत खांडेकरांची कादंबरी कोणत्या ना कोणत्या तरी प्रतीकांतून निर्माण झालेली असे. त्यांतील कल्पनारम्य धूसर ध्येयवादाचें चित्र रंगवितांना त्या कादंबरींतील व्यक्तिरेखांवरहि प्रतीकांचीं पुटें चढविलीं जात – आणि तीं पात्रें त्या विशिष्ट प्रतीकाचीं बाहुलीं बनत. त्यामुळे त्यांच्या आतापर्यंतच्या कादंबऱ्यांतून व्यक्तिरेखनांत प्रत्ययकारकता आढळत नसे. त्यांच्या या नव्या कादंबरींतील विश्व मात्र त्यांच्या अनुभूतींतून निर्माण झालें आहे. गेल्या दहा वर्षांत जगांत व राष्ट्रांत ज्या ज्या घटना घडल्या, जे जे बदल घडून आले व सामाजिक राजकीय व आर्थिक जीवनांत जी उलथापालथ झाली त्यांचे मध्यमवर्गीय जीवनावर होणारे परिणाम खांडेकर अगदी जवळून पाहत होते--त्यांचा अनुभव घेत होते-- किंबहुना ज्या श्रद्धा व जीं मूल्यें आतापर्यंत प्रमाण म्हणून समजलीं जात होतीं तीं डोळ्यांदेखत धडाधड ढासळतांना पाहूनच गेलीं दहा वर्षे त्यांची लेखणी मुकी झाली होती. या क्रांतींत विशेषतः मध्यमवर्ग होरपळून निघाला होता. पूर्वीच्या ध्येयांना आज फारसा अर्थ उरला नव्हता; नव्या जीवनमूल्यांचें स्वरूप स्पष्ट होत नव्हतें. अशा या संधिकालांत दोरी तुटलेल्या पतंगासारखी मध्यम वर्गाची स्थिति झाली होती. त्याचेंच विदारक दर्शन खांडेकरांनी "अश्रु" या कादंबरींत घडविलेलें आहे.

"अश्रु" या कादंबरींतील नायक शंकर हा या कनिष्ठ मध्यम वर्गाचा प्रातिनिधि आहे. ध्येयाच्या आणि त्यागाच्या वातावरणांत वाढलेला व निःस्वार्थी वृत्तीने समाजसेवा करण्याचीं स्वप्नें उराशीं बाळगणारा शंकर जगाच्या दृष्टीने शेवटीं नालायक ठरतो. त्याच्या भोवतालचें सर्व विश्वच बदललें होतें. शिक्षणाला बाजारी स्वरूप आलेलें त्याला दिसत होतें. आत्यंतिक महागाईमुळे शिक्षकाला शिकवणीचे रतीब लावावे लागत असलेले तो पाहत होता. इतकेंच काय पण शिकवणीच्या मुलांना परीक्षेचे प्रश्न अगोदर सांगणें -- पालकाकडून पैसे घेऊन नालायक मुलांना वर चढविणें अशा शिक्षणाच्या पवित्र धंद्याला काळिमा आणणाऱ्या गोष्टीहि त्याच शिक्षणक्षेत्रांत घडत असल्याचें त्याला माहीत होतें. अशा स्थितींत त्याच्या ध्येयनिष्ठेची व

अनुक्रमणिका

त्यागशीलतेची इतर शिक्षकांकडून चेष्टा व्हावी यांत काय नवल ? शाळेची आर्थिक तूट भरून काढण्यासाठी टिळक गुरुजींच्या पवित्र कुटीचा लिलाव ज्यावेळीं शिक्षकांनी मांडला त्याचवेळीं शिक्षणाच्या क्षेत्रांत ध्येय–श्रद्धा–निष्ठा यांचा कसा चक्काचूर झाला हें शंकरला स्पष्ट दिसून आलें. आपल्या नालायक मुलीला – ती नापास झाली असतांना – वर चढवावी असा प्रयत्न करणाऱ्या पापासाहेबांचा–शंकरचा कट्टर विरोध असतांनाहि–विजय होतो; इतकेंच नव्हे तर पापासाहेब नगराध्यक्ष झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावयास शिक्षक तयार होतात – यांतच शंकरच्या ध्येयशीलतेचा व निष्ठेचा पराजय आहे.

पण केवळ ध्येयशील जीवनांतच नव्हे तर लौकिक जीवनांतहि शंकरला असाच पराजय पत्करावा लागला आहे. दारिद्र्य आणि महागाई या दोन राक्षसांशीं तोंड देतां देतां शंकरचीं सर्व लौकिक स्वप्नें विरून गेलेलीं दिसलीं तर त्यांत नवल नाही. मिळवता माणूस एक व खाणारीं तोंडें दहा ही आजच्या मध्यमवर्गीयाची आजची स्थिति. शंकरहि त्याला अपवाद नव्हता. त्यांतून कठोर ध्येयशीलतेचा जाणूनबुजून अंगीकार केलेला. त्यामुळे शंकरच्या बाबतींत जीवनकलह किती तीव्र झाला असेल याची कल्पनाच करावयास नको. स्वतःच्या पत्नीच्या हौशी त्याला पुऱ्या करतां येत नाहीत. आपल्या एकुलत्या एक मुलाचा सायकलीचा हट्ट त्याला पुरवितां येत नाही. इतकेंच नव्हे तर आपल्या बहिणीच्या प्रेमविवाहाला पैशाच्या अभावीं सुरुंग लागलेला त्याला पाहावा लागतो. स्वतःची दृष्टि क्षीण होत असतांना त्यावर वैद्यकीय उपचार करून घेण्याचें तर मग दूरच. एका दृष्टीने शंकरचें हें लौकिक जीवन म्हणजे शोकान्तिकाच नव्हे काय ?

पण शंकरचें हें जीवन म्हणजे आजच्या कनिष्ठ वर्गाची प्रातिनिधिक कहाणी आहे. आणि म्हणूनच ती प्रत्ययकारी व परिणामकारक वाटते. त्याच्या ठिकाणीं असणारा ध्येयवाद आज अनेक तरुणांच्या अन्तःकरणांत आढळेल. पण आज त्याला मोल नाही. बाजारी जगांत शंकरप्रमाणेच ते नालायक ठरलेले आहेत. लौकिक व ध्येयनिष्ठ अशा दोन्ही जगाचीं त्यांचीं स्वप्नें विरून गेलेलीं स्पष्टपणें आढळतात. धड ध्येयपूर्तीचा आनंद नाही–धड लौकिक जीवनांतील सौख्य नाही अशा अधांतरांत त्रिशंकूप्रमाणे मध्येच लोंबकळत असणाऱ्या तरुणांचा शंकर हा खराखुऱ्या अर्थाने प्रतिनिधि आहे आणि म्हणूनच त्याच्या व्यक्तिचित्राबद्दल अत्यंत आपलेपणा व जिव्हाळा वाटतो.

पण शंकरचें जीवन म्हणजे खरोखरच शोकान्तिका आहे काय ! खांडेकरांना तसें वाटत नाही. उमेसारखी सुशील, समजूतदार व प्रेमळ पत्नी, चंदूसारखा गोड मुलगा, दिगंबरासारखा व्यसनी पण दिलदार दोस्त, सुमित्रेसारखी समजूतदार बहीण,–अशा प्रभावळींत शंकर आहे. तो दुबळा असेल, व्यावहारिक जगाशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नसेल–पण अनेक शतकांच्या संस्कृतीचा सुगंध त्याने हृदयांत जपून ठेवला आहे. भोवतालीं जीवनाला बाजाराची कळा आलेली दिसत असूनहि तो आपलें दुकान त्यांत मांडूं इच्छित नाही. स्वतःच्या चिमुकल्या ध्येयवादाने त्याचे हात होरपळतात; पण त्या दुःखाने डोळ्यांतून ठिबकणारे अश्रु हेंच तो आपले वैभव मानतो. शेवटीं तो उमेला म्हणतो, 'न रडण्यापेक्षा रडण्यांत अधिक माणुसकी आहे. माणसानं फार तर स्वतःसाठी रडूं नये; पण दुसऱ्यासाठी त्यानं रडायलाच हवं. जगांत प्रीति, भक्ति, सेवा, त्याग, जें जें कांही चांगलं पिकतं तें कशामुळं ? कुणा ना कुणाच्या डोळ्यांतून हा पाऊस पडत राहतो म्हणूनच ना ? ' अश्रूंचें त्याने केलेलें हें मोल वाचलें म्हणजे खऱ्या अर्थाने शंकरचा पराजय झाला असें वाटत नाही. त्याच्या वांट्याला

येणारीं हीं दुःखें त्याची श्रद्धा किंवा त्याची ध्येयसृष्टि ढासळवूं शकत नाहीत. दुःखाचं हालाहल पचवून तो स्वतःची ध्येयसृष्टि शाबूत ठेवतो. भावनेचा दीप अखंड तेवत ठेवतो. हाच त्याचा खरा नैतिक विजय नाही काय ?

"अश्रु" या कादंबरीने खांडेकरांनी आतापर्यंतच्या आभासमय जीवनांतून वास्तव जीवनांत प्रवेश केला आहे असें जें म्हणावेसें वाटतें तें याचमुळे. शंकर आणि उमा यांचें जीवन हें आजच्या कनिष्ठ मध्यमवर्गीयाचें जीवन आहे. असे शंकर व अशा उमा आपणांला समाजांत असंख्य सापडतील. त्यांच्याच जीवनाचें दर्शन कादंबरींत घडत असल्याचा प्रत्यय आपणांला येईल. तें जीवन जितकें वास्तव आहे तितकेंच उदात्त आहे. त्यांतूनच आजच्या कनिष्ठ मध्यमवर्गीय जीवनाची जी मीमांसा खांडेकरांनी केली आहे ती अत्यंत मूलगामी आहे. या कादंबरीपासून खांडेकरांच्या प्रतिभेला एक निराळें वळण लागलें आहे. समीक्षेच्या भाषेंत सांगावयाचें झालें तर खांडेकरांच्या साहित्याचा नवा कालखंड या कादंबरीपासून सुरू झाला आहे असें म्हणतां येतें, आणि म्हणूनच या कादंबरीचें अत्यंत आनंदाने स्वागत केलें पाहिजे.

(मुंबई नभोवाणीच्या सौजन्याने)

—म. ना. अदवंत

शितू— [लेखक– श्री. गो. नी. दांडेकर, मौज प्रकाशन, मुंबई, किं. ४ रु.]

पांढरपेशा जीवनांतील ठराविक वातावरणांत रंगणाऱ्या प्रेमकथा वाचून आळसावलेल्या वाचकास श्री. गो. नी. दांडेकर यांनी "शितू" देऊन एक नवें जग दाखविलें आहे. ज्या ठिकाणची सकाळ असंख्य पाखरांच्या किलबिलाटाच्या नादनृत्याच्या पार्श्वसंगीतानं सुरू होत असते त्या ठिकाणच्या खेडवळ वातावरणांत वावरणारी भोळीभाबडी शितू लहानाची मोठी कशी होत गेली याची हृदयंगम कहाणी श्री. दांडेकरांनी इथे दिली आहे. लेखकाने स्वतःच सांगितल्याप्रमाणे "शितू" हें एक प्रेमकाव्य आहे. मुग्धतेचा बुरखा तोंडावर कायम ठेवून विसूवर अमर्याद प्रेम करणारी 'शितू' वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवीतच पुढे पुढे सरकते. आपल्या जीवनाच्या दर्शनाने तिने निर्माण केलेली ही दिव्य प्रेमाची गाथा वाचतांना त्यामुळेच वाचक गहिवरून गेल्याखेरीज रहात नाही.

कोकणी जीवनाची पार्श्वभूमि घेऊन 'शितू' वाचकांसमोर आली असली तरी ज्या भावनेने तिने विसूची मनोमनीं उत्कटतेने पूजा केली ती भावना सार्वदेशिक आहे. त्यामुळेच कोंकणी जीवनाला अनोळखी असलेला वाचक देखील आळशी मनाने ही कथा वाचून काढल्या-शिवाय राहत नाही. एवढेंच नव्हे तर अखेरीअखेरीस दिव्य प्रेमाचें गीत अखंड गाणाऱ्या आणि सावलीप्रमाणे भल्याबुऱ्या श्रमाला साथ देणाऱ्या 'शितू' विषयी "रामरक्षेतले मंत्र म्हणून लग्नाचे सोहोळे उरकणारे भटजी तुम्ही ! लग्न कशीं लागतात, हें तुम्हांला काय माहिती ? जा ! व्हा चालते !... " असा धन्योद्गार काढणाऱ्या विसूबद्दलदेखील काळजांत विलक्षण कालवाकालव होऊन वाचणाराचें मन अस्वस्थ होऊन जातें.

अप्पा, विसू आणि शितू हीं या कादंबरींतील विविध पात्रें मोठीं देखणीं उतरलीं असून सुटसुटीत व छोट्या वाक्यांनी नटलेली त्यांची दुनियाहि मोठी चित्तवेधक आहे.

बंगाली जीवनांतील उदात्त प्रेमकाव्याची ही नक्कल आहे म्हणून कोणी जर असें म्हणेल की, 'छे ! आमच्याकडे हें अशक्य आहे !' तर या शितूवर मोठा अन्याय होईल. लेख-

काच्या मनावर बंगालच्या उदात्त प्रेमकाव्यांचा पगडा बसलेला असला तरी शितू वेगळी आहे. कोंकणी जीवनांतील ती अस्सल भावनांची तिजोरी आहे.

ज्या भावनेने शितू सुरवातीपासून काळजाची विलक्षण पकड घेते तीच भावना घाई-गर्दीची अखेर न करतां शेवटपर्यंत पराकोटीला पोंचती तर 'शितूचें' दर्शन याहूनहि अधिक परिणामकारी झालें असतें. तथापि आहे या स्वरूपांतहि ती आकर्षक आहे यांत शंका नाही. कारण तिने आपल्या या खेडवळ पण उदात्त दर्शनाने लेखकाबद्दल फार मोठी अपेक्षा निर्माण करून ठेविली आहे.

— सरोजिनी वाबर

सोवत :— [लेखक — प्रा. ना. सी. फडके; प्रकाशक : अंजलि प्रकाशन लिमिटेड. मुंबई १; मूल्य दोन रुपये; पृष्ठसंख्या १६२]

'सोबत' या प्रा. फडके यांच्या कथासंग्रहांत एकूण अकरा कथा असून मनुष्यस्वभा-वाच्या वेगवेगळ्या स्वरूपांवर त्या आधारलेल्या आहेत. सरळ वागणारा पण विवाहासाठी आसुसलेला पैलवान नथू हलवाई, बेकारीच्या भयाण गर्तेत पिचणारा काशीनाथ आणि अति-रिक्त लोकप्रियतेच्या ऐन शिखरावर नाचणारा विहारी यांचें विरोधात्मक चित्र, एकाएकी उत्पन्न झालेल्या मातृत्वाच्या हव्यासाने वागणारी मालती, नवऱ्याच्या उपेक्षेने कळंजून गेलेली पण शुचित्वाच्या व्रताने मनाला आवरण्यासाठी मोहापासून आणि आपल्या घरापासूनहि दूर पळ-णारी यमूकाकू, यापेवाजीच्या आपल्या अनावर ओढीने घर अंगावर घेणारा जयंत, रूक्ष खेड्यांत काम करणाऱ्या एका ब्रह्मचाऱ्याचें एका तरुणीच्या सहवासाने झालेलें मानसिक स्थित्यं-तर, पूर्वायुष्यांतल्या निखळ प्रेमाला जबाब देणारी सिनेमानटी बाबली, सरलहृदयी चंद्रोजीमुळे सत्प्रवृत्तीची ज्योत अंतरांत लागलेला मारेकरी संभू, परिस्थिति आणि गैरसमज यांच्या सामु-दायिक कारणांनी प्रथम बिथरलेला पण मागाहून उलगडा झाल्यावर प्रेमाला शरण गेलेला प्रेमिक, अशा वेगवेगळ्या व्यक्तींचीं चित्रें यांत आहेत; आणि एकदोन विनोदी गोष्टींचेहि फवारे आहेत.

प्रा. फडके हे एक सराईत कथाकार आहेत. आणि सराईतपणामुळे त्यांना अनेक गोष्टी आता साध्य झाल्या आहेत. अवलोकनाची मार्मिकता, संवादाचें चातुर्य, भाषेचा नितळपणा कोटिक्रमाचा सहजपणा इत्यादि गुण त्यांच्या लेखनांत कोणाहि वाचकाला ठिकठिकाणीं आढ-ळून येतात. तंत्रावर त्यांचा फार भर असतो, हेंहि प्रसिद्ध आहे, आणि मर्यादित कक्षेपर्यंत हा भर वाजवी आहे, असेंहि म्हणावें लागेल. परंतु इतरांना कष्टसाध्य (किंवा असाध्यहि) अस-लेल्या वरील गुणांचा प्रा. फडके यांच्या 'सोबत' या कथासंग्रहांत ऐनजिनसी असा मिलाफ झालेला आढळत नाही. ललित वाङ्मयांत व्यक्तिदर्शनाचें महत्त्व त्यांना फार वाटतें,—आणि तें चुकीचें नाही. पण त्यांना वाटणाऱ्या व्यक्तिदर्शनाच्या महत्त्वाचा साक्षात्कार या कथासंग्रहांत फारसा होत नाही· कारण त्यांतल्या बहुतेक व्यक्ति एकटाकी आहेत. गोष्टी आकर्षक कर-ण्याच्या ओढीने त्यांनी तेंच तेंच सारण घातलें आहे. असें वाटतें की, या व्यक्तींचे 'बोलविते धणी' प्रा. फडकेच आहेत. त्यांच्या मुखाने प्रा. फडकेच कोट्या करितात; व त्यांच्या द्वारा-प्रा. फडकेच घटना घडवून आणितात. कथासौंदर्यात याने उणीव येतेच, पण ती ती कथा

त्यामुळे वास्तवहि वठत नाही. वाचकांच्या मनांत जों जों ही जाणीव बळकट होत जाते, तों तों ती ती कथा त्याला पोकळ वाटूं लागते. दैनंदिन जीवितांत स्त्रियांच्या अंगीं कितीसा कोटिबाजपणा असतो, कितीसा निर्भीडपणा असतो, तें सामान्यतः आपल्या परिचयाचें आहे. पण या कथांमधल्या प्रा. फडके यांच्या बहुतेक सर्व नायिका सुंदर–सुंदर कोट्या करतात; छान–छान नेसतात; आणि गोड–गोड बोलतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वांत फारसें पृथक्त्व प्रत्ययाला येत नाही. 'हा तिच्याच पावलांचा आवाज' या गोष्टींतील सुलभेहून पुढच्याच गोष्टींतली मालती कांहीं फारशी वेगळी नाही, किंवा या दोघींहून 'अजून कशाचाच पत्ता नव्हता पण—'यांतली उषाहि निराळी वाटत नाही. स्त्रियांच्या पाठीशीं धावणारे आणि त्यांच्या भोवती-मोवती नाचणारे नायक तर यांमधल्या अकरांतल्या आठ गोष्टींत आपल्याला भेटतात. या सर्वांचा स्थायिभाव जवळजवळ एकच आहे. फरक इतकाच की, कधी या तर कधी त्या घटनेला, किंवा गुणाला किंवा वैगुण्याला महत्त्व दिलेलें दिसेल. सर्व नायिकांत 'प्रकाश हवा ! पण आग नको ! ' या गोष्टीमधील यमूकाकूलाच काय तें अलग, स्वतंत्र व्यक्तित्व आहे. मौज अशी की, आपल्या घरांत ती बंदिस्त आहे, विटून गेलेली आहे, अबोल आहे; पण त्यानेच तिच्या स्वतंत्र व्यक्तित्वाला व शुचित्वाला उठाव मिळाला आहे. आणि शुद्ध राहण्यासाठी शेवटीं घरांतून ती पळून जाते, तें तिचें कृत्यहि मनांत भरतें. मथळ्यापासून अखेरपर्यंत ही गोष्ट यांत ठसठशीत आहे. पहिलीच 'सोबत' हीहि नथू हलवायाची गोष्ट अशीच अपवादात्मक असून कांहीशी लक्ष्यांत राहण्यासारखी आहे.

कांही गोष्टी तींत योजिलेल्या उघडउघडच्या क्लृप्त्यांमुळे बिघडल्या आहेत. ' भार ! भार ! ' या कथेंत काशीनाथ या बेकाराचा विहारी या क्रिकेटपटूशीं विरोध दाखविला आहे. काशीनाथ हा बेकारीमुळे कळंजून गेलेला, तर विहारी हा खेळांतल्या अतिरिक्त लोकप्रियतेमुळे भारावून गेलेला ! दोघांनाहि आपल्या जीविताचा भार झालेला आहे. या विरोधाची दुक्कल सूचित करण्यासाठी की काय, गोष्टीला मथळाहि ' भार ! भार ! ' असा द्विरुक्त दिला आहे. दोघांचीहि जीविताविषयीचीं उत्तरें एक आहेत, पण त्यांच्या अवस्था मात्र भिन्न-भिन्न आहेत. कल्पना ठीक आहे, पण ती वठवितांना केलेली तंत्राची ठेवण चटचटीत वाटते. कंपासने काढलेलें कमळ हें हाताने रेखाटलेल्या कमळापेक्षा अधिक रेखीव असेल, पण म्हणूनच ज्याप्रमाणे तें अवास्तव आणि सौंदर्यहीन असतें, त्याप्रमाणे या गोष्टीचेंहि झालें आहे. ' सालरजंग चिकी ' आणि ' दोन वहिणी, एक पाहुणी ' या गोष्टी तर निव्वळ शिळोप्याच्या करमणुकीच्या आहेत. मंडळींतल्या एखाद्या बोलघेवड्या माणसाने गोष्टी सांगाव्या, तसें त्यांचें स्वरूप आहे. ' संभू ! माझ्याकडे ये ! ' ही गोष्ट गुळगुळीत उपदेशाचा ओळंबा लावल्यामुळे जड आणि कलाहीन उतरली आहे. इरसाल मारेकऱ्याचें सत्प्रवृत्त माणसांत रूपांतर हें सुरवंटाच्या फुलपाखरांत होणाऱ्या रूपांतराइतकें कांही स्वाभाविक नाही, पण तें तसें येथे दाखविलें मात्र आहे ! 'सकाळीं आणि संध्याकाळीं' ही कथा उत्तानपणाने डागळून तर गेलेली आहेच, पण या उत्तानपणाची मातृत्वाच्या कल्पनेशीं सांगड घातल्यामुळे वाचकाला अधिकच अवघडल्यासारखें होतें. वाचकांच्या अंतरंगाच्या तारा ज्यांनी झंकारतील अशा ' शान्ता ', 'लोला' यांसारख्यागोष्टी वाचल्यानंतर अशा गोष्टींची प्रा. फडके यांच्या कडून कोण अपेक्षा करणार !

—अरविंद मंगरूळकर

अनुक्रमणिका

माणुसकीचा धर्म : [लघुकथा-संग्रह. ले० : प्रा. म. ना. अद्वंत. प्रका. दयार्णव कोपर्डेकर, पुणें २.]

प्रा. अद्वंत यांच्या 'माणुसकीचा धर्म' या लघुकथा-संग्रहाला एक विशेष स्थान मिळावें असें वाटतें. या संग्रहांत सात कथा आहेत. पण त्या भिन्न कथांत विषय एकच आहे. अत्यंत सामान्य माणसांच्या जीवनाचीं हीं चित्रें आहेत. आणि अशा सामान्य माणसांच्या जीवनांतहि कोठेतरी, अगदी अंधुकपणें कां होईना, अगदी अल्प प्रमाणांत कां होईना, ध्येयवादाचा अंश दडून राहिलेला असतो हा त्यांच्या बहुतेक सर्व कथांचा विषय आहे. आणि विशेष हें की अनेक कथांत एकच विषय हाताळूनहि त्यांनी पुनरुक्ति कोठेहि होऊं दिलेली नाही. सातांपैकी पांच कथा शाळामास्तरांच्या जीवनावरच आहेत. तरी त्यांतील घटना, व्यक्ति, संघर्ष यांत इतकी विविधता व वैचित्र्य आहे की ही कंटाळवाणी पुनरुक्ति आहे असें न वाटतां शिक्षकांच्या जीवनाचें हें बहुअंगी दर्शनच लेखक आपणांस घडवीत आहे अशी सारखी प्रतीति येत असते.

काकडे मास्तर, आपटे मास्तर, देशपांडे मास्तर, श्रीधरपंत मास्तर, हे समाजांतले लहान लोक आहेत. पण माणुसकीच्या धर्मावर त्यांच्या मनांत जी निष्ठा आहे ती आपण पाहिली की त्यांचा लहानपणा आपण विसरतों. जातिधर्म, लोकांचा रोष याची परवा न करतां आपला प्रिय विद्यार्थी गफूर व त्याची आजारी आई हमिदा यांची सेवा-शुश्रूषा काकडे मास्तरांनी केली. इन्स्पेक्टरांचा अधिकार, त्यांची दरडावणी, नोकरी जाण्याची भीति यांपैकी कशाचाहि विचार न करतां संस्कृत भाषा व तिच्या अध्यापनाची पद्धति याविषयींचीं आपलीं अनुभवसिद्ध मतें सोडावयाचीं नाहीत, त्यापेक्षा राजीनामा देऊन मोकळें व्हावयाचें, असा आपटे मास्तरांनी निश्चय केला. विद्यार्थी श्रीमंत असो, गरीब असो त्याला सारख्याच मायेने किंवा कठोरतेने वागवावयाचें हा श्रीधरपंतांचा बाणा होता. आणि कोणत्याहि परिस्थितींत त्यांनी तो सोडला नाही. ध्येयवाद, माणुसकीचा धर्म तो हाच. हें या शिक्षकांचें विशाल अंतःकरण पाहिलें म्हणजे ही गोष्ट चटकन् ध्यानांत येते की थोरपणाचीं, त्यागी जीवनाचीं बीजें प्रत्येक माणसाच्या अंतः-करणांत असतात. परिस्थिति, प्रयत्न इत्यादि कारणांनी कोठे त्यांचा विकास होतो, कोठे होत नाही. आणि हाच सिद्धान्त प्रत्येक कथेंत प्रतीत होत असल्यामुळे प्रा. अद्वंतांच्या या कथांना एक वेगळें रूप प्राप्त झालें आहे.

आपल्या कथांसाठी अद्वंतांनी विषय जसा मनोरम व आकर्षक निवडला आहे तशीच त्याची सजावट मनोरम व आकर्षक करण्याकडेहि त्यांनी लक्ष पुरविलें आहे. माणुसकीचा धर्म ध्येयवादावरची निष्ठा या विषयीच्या गद्य विचारांचें साहित्य करून टाकण्यांत त्यांना चांगलें यश आलें आहे. प्रत्येक कथेंतील समरप्रसंग त्यांनी कलात्मक रीतीने फुलवीत नेऊन वाचकांची उत्सुकता शेवटपर्यंत टिकवून धरण्यांत चांगलें यश मिळविलें आहे. शालेय जीवनांत समरप्रसंग ते काय असणार, असें आपणांस वाटतें. पण त्या जीवनाच्या अंतरगांत आपण प्रा. अद्वंतांच्या बरोबर शिरलों की तेथेहि सर्व राजकारण, वैयक्तिक अहंकार, हेवेदावे, मत्सर, द्वैत, वैर, स्वार्थ, भीति आणि त्याग, निष्ठा, उदात्तता, यांचे संघर्ष अखिलभारतीय राजकारणाच्या क्षेत्रांतल्या इतक्याच तीव्रतेने चालू असतात हें आपल्या ध्यानांत येतें. बोर्डांतल्या प्रतिष्ठित नागरिकांचे अहंकार, गावांतल्या श्रीमंत नागरिकांचे शाळेंत गुंतलेले हितसंबंध, त्यांच्या तंत्राने चालणाऱ्या हेडमास्तरांची लाचारी, शिक्षकांच्या क्षुद्र भावना, विद्यार्थी व शिक्षक यांच्यांतील अत्यंत उदात्त

नातें, आणि तें पाहून इतरांच्या चित्तांत निर्माण झालेला मत्सर हे समरप्रसंगाचे सर्व घटक एकत्र आणून त्यांची मोठ्या कुशलतेने रचना करून अदवंतांनी त्यांतून या कथा निर्माण केल्या आहेत.

अदवंत स्वतः शिक्षक आहेत. आज ते कॉलेजमध्ये आहेत. पण प्रथम कांही वर्षें ते शाळेंतहि होते. त्यामुळे या कथांना एक स्वानुभवाचें पाणी चढलेलें आहे. प्रत्येक कथा त्यांनी त्या जीवनाशीं समरस होऊन लिहिलेली असल्यामुळे या कथांना आत्माविष्काराचें रूप आलें आहे. आणि त्यामुळे शिक्षणक्षेत्रांत काम करणाऱ्या वाचकांना त्या कथा पुनःप्रत्ययाचा आनंद निःसंशय प्राप्त करून देतील.

— पु. ग. सहस्रबुद्धे

ग्रंथव्यवहार : [लेखकः—अ. ह्. लिमये; प्रकाशक : व्हीनस बुकस्टॉल : पुणें २. पृ. १७० : किं. रु. ३–१२–०]

व्यापारांत मागे पडलेल्या पण पुढे येऊं पाहणाऱ्या महाराष्ट्रीय व्यावसायिकांसाठी लिहिलेला हा ' ग्रंथव्यवहार ' म्हणजे सप्तप्रकरणात्मक एक छोटें पुस्तक आहे. मात्र त्यांत ग्रंथपालासंबंधीं किंवा ग्रंथालयासंबंधी विवेचन नसून लेखक, मुद्रक व प्रकाशक अशा तिन्ही धंदेवाइकांना व्यावहारिक शिक्षण देण्याचा हा ' अपूर्व ' प्रयत्न आहे. विषय व्यापक, त्याचा अनुभव आमच्या व्यावसायिकांना नव्यानेच येऊ लागला, तेव्हा त्यासंबंधीं विवेचनहि नव्या-पद्धतीने व्हावें, हें ओघानेच आलें.

पहिल्या प्रकरणांत (अवघीं चार पानें) ग्रंथरचनेचा 'इतिहास' सांगावयाचा असल्याने पुष्कळ संक्षेप करावा लागला. कारण वैदिक काळापासून तों अव्वल इंग्रजीपर्यंतच्या " ग्रंथ-लेखना"चा समाचार त्यांत घ्यावयाचा होता. शिवाय लिपीचा इतिहास, छपाईचा इतिहास असे दोन पोट इतिहास सांगण्याचा आग्रह धरल्यामुळे हें दौडतें–धावतें वर्णन सदोष झालें आहे. आधार–भूत " ग्रंथ " देखील आधार घेण्यासारखे नसल्याने माहितींत त्रुटितें राहिलीं. अर्धवट कांही तरी विधानें छापून झालीं.

ग्रंथ–लेखन, ग्रंथ–लेखन म्हणून गाजलेल्या या विषयांत ' वर्तमानपत्री ' लेखनाचा प्रामुख्याने समावेश कां व्हावा, हें कळत नाही. दुसऱ्या प्रकरणांतली चर्चा अशा किरकोळ लेखकांसाठी आहे. " पुस्तकें " " ग्रंथ " लिहिणारांसाठी नव्हे, हें लगेंच समजतें.

प्रकाशकांशीं संबंध कसे असावे याची चर्चा— मुख्यतः प्रकाशकाच्या दृष्टीने— तिसऱ्या प्रकरणांत आहे. लेखक–मुद्रक–प्रकाशक अशा तिघांसाठी हें पुस्तक असल्याने केव्हा केव्हा लेखकाला, तर मधून मधून प्रकाशकाला आणि सवडीनुसार मुद्रकाला उद्देशून यांत व्यावहारिक सल्ला दिलेला आहे. कायदेशीर हक्कां (कॉपी राइट) संबंधीं ' उडत ' माहिती, छपाईविषयी चर्चा, किंमत ठरविणें, जाहिरात देणें, मोफत प्रती वाटणें, जमाखर्चाचा हिशेब ठेवणें अशा अनेक बाबींसंबंधीं ह्या प्रकरणांत माहिती आहे. लेखक–प्रकाशक यांमधील करारांचे मसुदे, " हिंदुस्थानांत व इतरत्र देशांत वापर होत नसलेल्या " (पृ. ४६) पद्धतीचे कां दिले आहेत बरें ? लोक पुस्तकें कां विकत घेतात याबद्दलच्या "जर्मनींत"ल्या एका प्रयोगाचें (कुणी ? कधी ?) विच्छेदन दिलें आहे. आणखी एक दोन पत्रकांचे मसुदे, खर्चाचे तपशील, पावत्यांचे नमुने इत्यादि माहिती या तिसऱ्या प्रकरणांत आहे.

छपाईविषयी सांगोपांग माहिती चवथ्या प्रकरणांत मिळते. मात्र ती नेमकी कुणासाठी आहे तें समजत नाही. प्रत्यक्ष छापखान्यांत वावरणाराला ती तुटपुंजी वाटेल तर छापखान्याशीं कामापुरता संबंध येणारांना ती विस्तृत व अनावश्यक वाटेल. छापखानेवाल्यांनी आपापले व्यवहार कोणत्या पद्धतीने ठेवावे, कामाच्या 'माला'च्या पावत्या कशा द्याव्या, काम कसें होत आहे यावर देखरेख कशी ठेवावी......वगैरेचे 'फर्मे' छापले आहेत. ही "दूध पाजण्याची" पद्धत, सर्व मजकूर तयार ठेवण्याची रीत, होतकरू व्यावसायिकांनाहि रुचणार नाही. 'पावती द्यावी' एवढें सांगितल्याने त्यांना कळत नाही असें गृहीत धरणें रास्त नव्हे. "या छापील फर्म्यांची पावती-पुस्तकें छापून घ्यावीं" असें सांगितल्याने नव्याने धंद्यांत पडणारांची सोय होते खरी. पण तीमुळे त्यांच्यांत 'पांगळेपणा' वळावण्याची भीति असते. असो—या व्यावसायिक विवेचनाबद्दल आणखीहि पुष्कळच लिहितां येण्यासारखें आहे.

पुस्तकविके हे ग्रंथांचे आश्रयदाते आहेत या समजुतीवर आधारलेलें पांचवें प्रकरण म्हणजे सर्वसाधारण दुकानदारांसंबंधीं सूचना आहेत. दुकान थाटावें कसें, गिऱ्हाईकाशीं वागावें कसें आणि "स्वतःचा देवावर विश्वास नसला तरी लक्ष्मी अथवा दत्त यांच्या तसबिरी दुकानांत" (पृ. १११) ठेवून त्यांची पूजाअर्चाहि चालू ठेवण्याची जरूरी किती आहे, इत्यादिसंबंधीं वैयक्तिक अनुभवाचे खडे बोल वाचनीय वाटतात. फिरता प्रचारक, उधारीचा व्यवहार, परगावच्या ग्राहकाशीं संबंध कसे ठेवावे, वगैरे विवेचनहि पुन्हां अनुभवावर आधारलेलें असलें तरी तोटकें वाटतें. म्हणजे हें व्यापाऱ्यासाठी असेल तर अपुरें— सर्वसाधारण वाचकांकरिता असेल तर पाल्हाळमय— अशी पुन्हा तक्रार नोंदवितां येते.

वाचक व वाचन हें सहावें प्रकरण म्हणजे आणखी एक खिचडी आहे. मराठी ग्रंथसंपत्तीचा इतिहास, फुकट फौजदारी, मराठी वाङ्मयाचें भवितव्य, इत्यादि विवेचन करतांना एक दोन 'साहेब' लोकांचीं मतें, 'मासिक दोन आण्याची पुस्तक खरेदी', अशासारखें आंकडेशास्त्राचें तर्कट, 'इंग्लिश भाषेमध्ये' प्रसिद्ध झालेले ग्रंथ...... मराठी भाषेतील ग्रंथ निर्मितीशीं तुलना, यावर आधारलेला भ्रामक युक्तिवाद...... अशा कितीतरी वादग्रस्त विचारांची मिसळ त्यांत आढळते. खरें पाहिलें तर या "ग्रंथव्यवहारांत"तलीं विधानें खोडून काढावयाचीं किंवा विचारसरणींतील चुका दाखवावयाच्या तर या पुस्तकाच्या— 'सवाई दिढी'चा व्याप होईल.

म्हणून पुस्तक वाचल्यानंतरहि प्रश्न पडतो की हें पुस्तक कुणासाठी ? कशासाठी ? याचाच अर्थ पुस्तक लिहिण्याचा उद्देश निश्चित नव्हता; आणि असलाच तरी तो साधला नाही.

याचें कारण आमच्या मतें असें की लेखकाला आलेला अनुभव कुणाला तरी सांगून टाकण्याची घाई झालेली दिसते. "जें जें आपणांसि ठावें" तें तें इतरांना शिकविण्याची ही वृत्ति प्रशंसनीय व 'समर्थनीय' असली तरी "अधिकार तैसा करूं उपदेश" हा विचार लक्षांत घ्यावयास हवा.

आपणांजवळ साठलेलें अनुभवाचें ज्ञान पूर्णपणें मुरलेलें नसतां तें पचनीं पडण्यापूर्वी व नीट उमगण्यापूर्वीच, इतरेजनांसाठी लेखणीवाटेंतून उतरूं लागलें म्हणजे असा घोटाळा उडतोच. कुठल्या तरी आकड्यांची कशी तरी तुलना करायची व कांहीं तरी अनुमान काढावयाचें हा अविचारी प्रकार योड्याशा सूक्ष्म निरीक्षणान्तीं सहज लक्षांत आला असावा. "इंग्लिश भाषेतल्या" पुस्तकांचीच गोष्ट पहा. इंग्लंड, अमेरिका (सं. संस्थानें) ऑस्ट्रेलिया,

न्यूझीलंड, (अर्धा) कॅनडा, (अर्धा-पाव) दक्षिण आफ्रिका...अशा अनेक देशांत इंग्रजी भाषा रूढ असतां—त्या त्या देशांत साक्षरतेचें प्रमाण अत्यधिक असतां, अशा जागतिक भाषेतील वाङ्मयाची तुलना मराठी सारख्या प्रांतिक भाषेतील वाङ्मयाशीं करावी हाच पहिला अविचार होय. त्यांतहि विषमता किती आहे पाहा. छपाई, पुस्तक प्रकाशन, आणि साधारण लेखनव्यवसाय ह्या " इंग्रजी " मुलखांत निदान आमच्यापेक्षा दीडशें दोनशें वर्षे अधिक रूढ आहे. पण हा सर्व विचार सुचण्याइतकी फुरसत " ग्रंथव्यवहाराच्या " लेखकांनी स्वतःस मिळूं दिली नाही. म्हणून अनेक ठिकाणीं हास्यास्पद विधानें या " ग्रंथां "त आलीं आहेत.

पण आम्हांस सर्वांत अधिक आश्चर्य वाटतें तें श्री० लिमये यांच्या धाडसाचें. लेखकांनी " हस्तलिखित " लिहितांना किती काळजी घ्यावी, हें सांगण्यास ते विसरले नाहीत. पण लोकां ब्रह्मज्ञान सांगणारे हे शिक्षक स्वतः अनेक वेळां—लेखनाच्या बाबतींत कोरडे राहिलेले दिसतात. निदान त्यांच्या " मुद्रितें–तपासका "च्या चुकांमुळे त्याजवर तो आरोप येतो. प्रकाशकाचा सल्लागार संपादक–वाचक असतो. त्याबद्दल या व्यवहारी पुस्तकांत उल्लेखहि नाही. " ले. आऊट एक्सपर्ट " प्रकाशकांनी पदरीं बाळगावा असें सांगणाऱ्यांना सल्लागार–वाचकाची शुद्धहि राहूं नये, हें जरासें विचित्र वाटतें. अथवा यांत विचित्र तें काय आहे ? ह्या संपादकीय कामगिरीचा संस्कार श्री० लिमये यांच्या हस्तलिखितावर झाला असता तर तें एक सुंदर, आटोपशीर आणि विशिष्ट व्यवसायापुरतें पुस्तक झालें असतें–फार तर तीन निरनिराळीं पुस्तकें करतां आलीं असतीं. पण तिघांची दावण एकत्र बांधल्यामुळें एकाहि वर्गाला समाधानकारक अशी माहिती यांत आली नाही.

या अपूर्व विषयावरचें पहिलें पुस्तक वाचण्यापूर्वीच्या आमच्या सर्व अपेक्षा पार फसल्या. वर्तमानपत्री लेखकाला दिलेल्या सूचना, छपाईचें काम नव्याने पत्करणारासाठी पुस्तकी छापाचा उपदेश, दुकानदारी चांगली चालावी म्हणून घ्यावयाची खबरदारी, प्रकाशकाने कोणत्या बातींची चौकशी करून व्यवसायांत पुढें पाऊल टाकावें याबद्दल माहिती... अशी सरमिसळ एका, पुस्तकांत आल्याने–" ग्रंथव्यवहार " हें भलतेंच नांव त्यास दिल्यानेहि–अखेरीस तीव्र निराशा पदरीं येते. मधून मधून आढळणारी ओबडधोबड वाक्यें, भरमसाट विधानें, व्यवहारासाठी अव्यवहारी सल्ला...यामुळे विनोद अनपेक्षितपणे साधतो. " ग्रंथ " शब्दाची साधी व्युत्पत्ति न देतां भलतीच देण्याचा प्रयत्न पाहा. (पृ. ३). " जगांतील कोणालाहि केवळ लेखनावर आपला चरितार्थ चालवितां आलेला नाही " (पृ. २५) या विधानाचा अर्थ खरा मानावयाचा तर मोठीच आपत्ति ओढवेल. ' कॉपीराइट ' कराराबाबत ' सन्मान्य ' प्रकाशकांचा ठराविक मसुदा पाहिला असता तरी त्यांच्या सचोटीबद्दल, त्यांच्या जागरूकतेबद्दल कल्पना आली असती. भलतेच नमुने विचारांत घेऊन परस्पर विश्वासाऐवजी अविश्वास वाढेल अशी माहिती देण्यांत हशील नव्हतें. " विनामूल्य ग्रंथसंग्रह करण्याची प्रवृत्ति आपल्याकडे बरीच आहे " (पृ. ७२) हें निरीक्षण खरें असेल तर पुस्तकांची आवड वाढत आहे; त्यांचा संग्रह करण्याची आवड लोकांत वाढत असेल तर समाधानाची बाब होय. " मुद्रणप्रत प्रकाशकाला दिली म्हणजे आपली जबाबदारी संपली असें प्रकाशकाने मानूं नये " (पृ. १०२) या वाक्याचा अर्थ काय समजावा ? " " मराठी भाषेची माहिती घेण्यासाठी पुराणवस्तुसंशोधन खात्याचा आश्रय घेण्याची पाळी येणार नाही ना ? " (पृ. १४८) ही अतिशयोक्ति वेडेपणाची कां विनोदी मानावी ? " मराठी ग्रंथांचा वार्षिक व्यवहार सुमारें पांच कोट रुपयांचा " (पृ. १४३) असा अंदाज असतां आणि इंग्लंडचा वार्षिक " राष्ट्रीय "

सर्व पुस्तकासाठी दोन कोटी (पृ. १४३) असतां, कुणाची परिस्थिति समाधानकारक म्हणावी ! विशेषतः पुस्तक-प्रकाशनाचे तौलनिक आंकडे सांगून मराठीची " अवहेलना " केल्यानंतर या आंकड्यांचें विशेष महत्त्व नव्हे का ? " ज्ञानाचें कोंबडें झाकून ठेवून ज्ञानसूर्याचा उदय लांबणीवर टाकणें " इष्ट नव्हे (पृ. १५४) असें लेखकांनी बजाविलें आहे त्याचा अर्थ काय ?

—श्री. रा. टिकेकर.

साहित्य-निर्मिति व समीक्षा [ले. दि. के. बेडेकर, पुणें, जानेवारी १९५४ पृ. १५६ + ८ किं. ३ रु.

श्री. दि. के. बेडेकर हे एक आधुनिक समाजवादी दृष्टीचे टीकाकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांच्या या नवीन लेखसंग्रहांतील पूर्वार्धांत साहित्यतत्त्वांची चर्चा असून उत्तरार्धांत साहित्यांची ' प्रत्यक्ष ' समीक्षणें आहेत. असें असतां त्यांनी पूर्वार्धाला ' चर्चा ' ऐवजीं ' निर्मिति ' असें भलतेंच नांव कां दिलें याचा बोध होत नाही. खुद्द साहित्यविषयक संज्ञांच्या बाबतींतहि लेखकाच्या मनांत बराच गोंधळ दिसतो.

" संस्कृत — आधुनिक — मिश्रित कंथा बनविण्याचे प्रयत्न करून आपण मराठीचें साहित्य-शास्त्र दुबळें मात्र केलें आहे " असें प्रस्तावनेंत विधान करतांना त्यांना नक्की काय म्हणावयाचें आहे तें त्यांचें तेच जाणोत ! ' जुन्या तत्त्वांचें विडंबन थांबवून संस्कृत साहित्य-शास्त्रीय तत्त्वांचा फेरविचार केला पाहिजे ' या त्यांच्या मतानुसार ' रससिद्धान्ता 'चें विवेचन तें स्वतंत्र पुस्तकरूपाने मांडतील तेव्हाच त्यांच्या या विधानाचा परामर्श घेतां येईल. प्रस्तुत मुद्दा एवढाच की संस्कृतांतील साहित्यतत्त्वांच्या संहितेला ते ' साहित्यशास्त्र ' म्हणतात. मग त्याला समांतर अशा आधुनिक मराठीच्या साहित्यशास्त्राला कांही वेगळें नांव हवें असें श्री. बेडेकर यांचें मत दिसतें. त्यांनी ' वाङ्मय-समीक्षेचें शास्त्र ' व ' साहित्यसमीक्षेचें शास्त्र ' अशीं दोन नांवें पहिल्याच पृष्ठावर दिलीं असून, त्यांमुळे वाङ्मय व साहित्य या शब्दांची गल्लत होते म्हणूनच की काय, त्यांनी पृ. ५ वर ' मराठी समीक्षाशास्त्र ' असें नामाभिधान केलें आहे. पृ. (३) वर त्यांनी ' समीक्षापूर्वक आलोडन ' असाहि एक विलक्षण प्रयोग केला आहे !

संज्ञाविषयक गोंधळाबरोबर श्री. बेडेकर यांचें (अ) शुद्धलेखनहि लक्ष्यांत घेतलें पाहिजे. ' एकान्तिक ' व ' मूर्तिकरणं ' व ' शक्तिमत्व ' या चुका त्यांनी शुद्धिपत्रांत सुधारून घेतल्या आहेत. परंतु ' साहित्य—निर्मिति व समीक्षा ' लिहिणारांच्या आगामी लेखनांत तरी निदान पुढील अशुद्धें आढळणार नाहीत, अशी आशा आहे — पौर्वात्य, पाश्चात्य, उहापोह, इर्षा, मधुरमीलन, विनंति, जाणिवेने, दिवसभरच्या, माडगुळकर, गाडगीळांचें, सहाय्य व प्रचीति. यापैकी म ड-गूळकर, गाडगिळांचें साहाय्य व प्रतीति ही शुद्ध रूपेंहि कोठेकोठे आढळत त. पण पौरस्त्य, पाश्चात्त्य, ऊहापोह, ईर्ष्या मिलन (भेट या अर्थी), विनंती, जाणिवेने अशीं शुद्ध रूपें कोठेहि आढळली नाहीत. पुढील आवृत्तींत या शुद्ध रूपांना उत्तेजन द्यावें. निराशा, विफलता या शब्दा-बद्दल नैराश्य, वैफल्य अशीं रूपें वापरल्याने कांही विशेष जोर येत नसेल तर शक्यतों वाङ्मय-समीक्षेत आनन्त्य, प्राचण्डय, कैवल्य, साकल्य, दौर्बल्य, मौर्ख्य यांप्रमाणेच नैराश्य व वैफल्यहि टाळावें.

अर्थरूप (फॉर्म), विकल्पन (पॅटर्न) अशी अर्थवाहक परिभाषा सुचविणाऱ्या बेडेकरांनी पुनः कलारूपें (Images) कलाव्यंजकें (Symbols) व कलात्मक रूपबंध (Imagery

अशी अनावश्यक दुरुस्ती करूं नये. कारण या तिन्ही इंग्रजी शब्दांसाठी प्रतिमा, प्रतीक व प्रतिमासृष्टि ही मराठी परिभाषा इतकी पक्की झाली आहे की आतां कांही, ती बदलण्याला खास कारण दाखविल्याशिवाय, वेगळी वापरूं नये.

प्रस्तुत पुस्तकांत संज्ञा, शब्द वा परिभाषा यांविषयी गोंधळ कांही प्रमाणांत दिसून आला तरी विवेचनांत वा समीक्षेतील रसग्रहणांत वैचारिक गोंधळ नाही. किंवा मराठी वाङ्मय समीक्षेत दुर्मीळ असलेली तात्त्विक व अनाग्रही भूमिका या पुस्तकांत आढळते. ती स्तुत्य आहे. विशेषतः या पुस्तकांतील एकूण अकरा स्फुट लेखांतील 'काव्यांतील अबोधवाद' हा निबंध श्री. बेडेकरांच्या समीक्षाकुशल विवेचन शैलीचा उत्कृष्ट नमुना असून बोधवाद व अबोधवाद यांच्या कलाविषयक विचारांतील अपूर्णता त्यांनी स्पष्ट केली आहे व या वादाचें उच्च पातळीवरून निरूपण केलें आहे. त्यांतहि 'अबोधवाद' हा शब्द 'अबोध' याचा (Sub-couscious) हा मराठींतील वा. म. जोशी-प्रणीत रूढ अर्थ लक्ष्यांत घेतां कांहीसा दुर्बोध ठरतो. पण विवेचन मात्र जितकें मार्मिक तितकेंच उद्बोधक आहे.

श्री. बेडेकरांचे नवकाव्यावरील गाजलेले लेख येथे संगृहीत केले आहेत. नवकाव्याचें आशावादी व वैफल्यवादी हें त्यांनीच करून ठेवलेलें वर्गीकरण आता त्यांना ढोबळपणाचें वाटतें हें प्रस्तावनेवरून दिसून येतें. नवकाव्य म्हणजे समाजवादी श्रद्धेचें काव्य व "श्री अनिलांच्या प्रेरणेमध्ये केशवसुतांच्या व्यक्तिवादी, स्वातंत्र्यवादी व आशावादी प्रबोधनाचा पडसाद आहेच. शिवाय त्या जुन्या श्रद्धेपेक्षा जास्त स्पष्ट व गंभीर असा समाजवादी श्रद्धेचा व मानवप्रेमाचा संदेश आहे" असें त्यांचें मत असल्यामुळे नवकाव्यांतील विफलतेवर टीका करण्याऐवजी सर्वस्वीं केशवसुतांच्या परंपरेंत मोडणाऱ्या अनिलांच्या नांवाचा मर्ढेकरी काव्याशीं वर्गसंबंध जोडून दुरुपयोग केला आहे; तो बेडेकरांच्या दृष्टीने सकारण असला तरी सर्वसामान्य रसिकांच्या गळीं उतरणें दुरापास्त आहे.

'नव कवि' म्हटल्याबरोबर जी एक विशिष्ट कल्पना मर्ढेकर, य. द. भावे प्रभृतींची कविता वाचून होते तिच्याशीं विचाऱ्या अनिलांचें कांहीहि साहचर्य नसल्यामुळे अनिलांच्या कवितेचें बेडेकरांचे गौरवपूर्ण रसग्रहण वाचून आनंद मानावा की त्यांची नव कवि म्हणून केशवसुतांपासून नाहक फारकत केल्याबद्दल विषाद मानावा हें कळत नाही ! श्री. बेडेकरांसारख्या संस्कृत व आधुनिक दोन्ही साहित्यतत्त्वें जाणणाऱ्या अनाग्रही समीक्षकानें अशी ठोकळेबाज वर्गीकरणें टाळल्यास मराठी वाङ्मयसमीक्षा अधिक भरदार होईल. आहे त्या परिस्थितींतहि प्रस्तुत टीकाग्रंथाने मराठी वाङ्मयसमीक्षेत एक मोलाची भर टाकली असून चिकित्सा व रसग्रहण ही समीक्षेचीं दोन्ही अंगें लेखकाने अतिशय साक्षेपाने सजविलीं आहेत. मराठींतील तत्त्वचर्चा व समीक्षा या दोन्ही बाबतींत, अभ्यासक व रसिक यांना हें पुस्तक वाचून तत्त्वबोध व आनंद यांची प्राप्ति होईल. एवढी या पुस्तकाची निश्चित योग्यता आहे.

साहित्यशास्त्रांतील समीक्षाविषयक तत्त्वांवरील लेखकाची पकड पक्की असून त्याच्याजवळ रसभावग्राही सहृदयता आहे याची साक्ष या ग्रंथाच्या पानापानांत आढळून येते. समाजवादी दृष्टिकोणाचा उपयोग करूनहि आधुनिक मराठी ललित-वाङ्मयाचें रसग्रहण किती मार्मिक रीतीनें करितां येतें याचें हें पुस्तक उत्कृष्ट उदाहरण असून उदयोन्मुख टीकाकारांना मार्गदर्शन करील असा वाङ्मयसमीक्षेतील एक महत्त्वाचा टप्पा त्याने गाठला आहे. हें अभिनंदनीय आहे.

माधव गोपाळ देशमुख

अनुक्रमणिका

संशोधनमुक्तावली — सर पहिला. —(लेखक— प्राचार्य वा. वि. मिराशी, एम्. ए. प्रकाशक — दे. गो. लांडगे, चिटणीस, मध्यप्रदेशसंशोधनमंडळ, नागपूर, मूल्य ४ रुपये)

मॉरिस कॉलेज्, नागपूर व विदर्भमहाविद्यालय, अमरावती या दोन संस्थांचे माजी प्राचार्य, व नागपूर विश्वविद्यालयांतील संस्कृत--पाली--प्राकृत विभागाचे माजी अध्यक्ष महामहोपाध्याय वा. वि. मिराशी हे एक आजच्या पिढींतील अग्रगण्य संशोधक आहेत. संस्कृतचे प्राध्यापक व महाविद्यालयाचे प्राचार्य या नात्यांनी आपला मुख्य व्यवसाय उत्तम तऱ्हेने सांभाळून त्यांनी गेल्या दोन सव्वादोन तपांत बजावलेली संशोधनविषयक भरीव कामगिरी आदर्शभूत व आदरणीय आहे. त्यांची बुद्धि कुशाग्र आणि चतुरस्र, व्यासंग विस्तृत आणि सखोल व वृत्ती समतोल आणि संयमित आहे. निव्वळ संशोधनास वाहिलेल्या दहाबारा प्रसिद्ध नियतकालिकांतून त्यांनी आजवर अजमासें दीडशें संशोधनपर निबंध इंग्रजींत प्रसिद्ध केले असून मराठींत प्रसिद्ध झाले-ल्यांची संख्या सत्तरापर्यंत आहे. शिवाय 'कालिदास' हा त्यांचा १९३४ मध्ये प्रसिद्ध झालेला ग्रंथ मराठी वाङ्मयांत मान्यता पावला आहे. आणि 'कलचुरि संवत्' विषयक एक इंग्रजी ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहे. मराठी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या सोळा संशो-धनपर लेखांचा समावेश सदर 'संशोधन मुक्तावली'त झाला असून, या मुक्तावलीच्या प्रथम सराचें प्रकाशन मध्यप्रदेश 'संशोधनमण्डळ ग्रंथमाले'च्या विद्यमानें डॉ. सर भवानीशंकर नियोगी यांच्या मार्मिक पुरस्काराने व राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांच्या सक्रिय प्रोत्सा-हनानें झालें आहे. हा योग पाहून महामहोपाध्यायांचें संशोधनरत्न कांचनाच्या कोंदणांत बसलें असें कोणाहि संशोधनरसिकाला खासच वाटेल.

मुक्तावलींतील सोळा लेखांत संस्कृत वाङ्मयविषयक सात, प्राकृत वाङ्मयविषयक चार व प्राचीन--भारतीय--इतिहासविषयक पांच लेख आहेत. यांत वाङ्मयविषयक संशोधनपर लेखच बहुसंख्य असल्यानें सर्व सामान्य संस्कृत-प्राकृत-वाङ्मयाभ्यसकांना या ग्रंथांत विशेष गोडी वाटेल. याचें गमक म्हणून पुढील कांही जिज्ञास्य विषयावरील प्रा. मिराशी यांचे नुसते निर्णयच नमूद करतां येतील :— 'मेघदूतां'मधील 'रामगिरि' म्हणजे नागपूरजवळचें रामटेक, भवभूतीच्या नाटकांत उल्लेखिलेलें काळप्रियनाथाचें देवालय हें सूर्याचें असून तें यमुनेचे कांठीं काल्पीस होतें, अश्वघोष व कालिदास यापैकीं कालिदास हाच नंतरचा असण्याचा संभव जास्त, भंडारा जिल्ह्यांतील आमगांवाजवळचें पदमपूर हें भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर होय, 'बृह-त्कथे'चा कर्ता गुणाढ्य यांचें जन्मस्थान पैठण नसून हिंगणघाट तहसिलींत पोथूरा गांवच्या जवळपास असावें, राजशेखराच्या 'विद्धशालभञ्जिका' या नाटकावरून कलचुरि व राष्ट्रकूट या दोन राजघराण्यांच्या प्राचीन इतिहासांतील एका घटनेवर महत्वाचा प्रकाश पडतो; इत्यादि इत्यादि. वरील सारखे निर्णय काढतांना प्रा. मिराशी यांनीं वापरलेली अनुमानपद्धतिच त्यांच्या निर्णयापेक्षा अधिक महत्त्वाची आहे ही गोष्ट त्यांचे निर्णय मान्य नसणाऱ्या विद्वानांन सुद्धा मान्य करावी लागेल.

प्राचीन भारताच्या इतिहासाची जुळवाजुळव ही अत्यंत अल्प, संदिग्ध व अपुऱ्या पुराव्यावर आधारलेली एक अनुमानांची साखळीच बहुतांशीं असते. काल जितका जितका अधिक प्राचीन तितका तितका पुराव्याचा अपुरेपणा व अनुमानावरचा भर अधिक वाढत जातो. अशा स्थितींत खरा इतिहास उपलब्ध करून घ्यावयाचा असल्यास इतिहाससंशोधकाने

[यापुढील मजकूर पान ४८ पहा]

चलो दिल्ली

खामगाव येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून नाट्यविषयावर व्याख्यान देतांना महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे एक पूर्वाध्यक्ष श्री. मामासाहेब वरेरकर यांनी "चलो दिल्ली" ची घोषणा अत्यंत पोटतिडकेने केली. तिचा त्यांनी त्यानंतर अनेकदा पुनरुच्चारहि केला. मराठी साहित्याचें व कलांचें वैभव सर्वांच्या समोर मांडण्यासाठी दिल्लीसारखें दुसरें शहर नाही, यांत शंका नाहीं. दिल्ली ही स्वतंत्र भारताची राजधानी असल्यामुळे सर्व प्रांतांतील अनेक प्रमुख व प्रतिष्ठित व्यक्ति निरनिराळ्या कारणांनी तेथे नेहमी येत असतात. लोकसभेसाठी राजकीय पुढारी व वरिष्ठ सभेसाठी अनेक कलावंत तेथें एकत्रित होतात. त्यांच्या समोर विस्तारलेल्या भाषांचें वैभव पर्यायाने सर्व भारतांत पसरणार ! अर्थात् त्यासाठीं आपल्या साहित्यिकांनी व कलावंतांनी वारंवार दिल्लीस गेलें पाहिजे; म्हणजे त्यांच्या अंगचे गुण अखिल भारतीय प्रतिनिधींच्या समोर यावयास चांगला अवसर सापडेल, या म्हणण्यांत पुष्कळ तथ्य आहे व तें पटल्यामुळेच की काय मराठी साहित्य संमेलनाने आता आपले मोर्चे दिल्लीला लावलें आहेत. मामासाहेब वरेरकरांचें स्वप्न त्यामुळे साकार होऊं लागलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

'पंढरपूर की दिल्ली' या प्रश्नाला मध्यंतरीं पुन्हा वाचा फुटली होती. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या दृष्टीने हा 'प्रश्न' असा कधी नव्हताच. कारण पुढील संमेलन दिल्लीला भरविण्याचा त्याने पूर्वीच 'निर्णय' घेतलेला होता. परिषदेच्या साधारणसभेनें गेल्या जूनमध्ये त्यावर आपलें शिक्कामोर्तब केल्यामुळे आता हें अधिवेशन दिल्लीला येत्या ऑक्टोबर मध्ये भरणारें निश्चित झालें आहे. एका दृष्टीने महाराष्ट्राच्या कलाजीवनाचे सर्वांगीण स्वरूप या निमित्ताने त्याठिकाणीं आविष्कृत व्हावयाचें आहे. त्यामुळे संमेलन यशस्वी करण्याची जबाबदारी दिल्ली येथील महाराष्ट्रियांप्रमाणेच महाराष्ट्रांतील सर्व साहित्यिकांवर व कलावंतांवरहि आहे. ती पार पाडण्यास सर्वजण हिरीरीने पुढे येतील अशी आशा करण्यास हरकत नाही.

साहित्य अकादमी :

एका दृष्टीने पाहतां मराठी साहित्यकांचे दिल्लीवर मोर्चे लागण्यास यापूर्वींच सुरवात झाली आहे असें दिसून येईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय साहित्याचा व कलांचा विकास साधून त्यांच्या द्वारा सर्व भारतीय साहित्यकांना व कलावंतांना एकत्रित आणण्यासाठी 'नृत्यनाट्य-संगीत अकादमी' 'साहित्य अकादमी' या सारख्या संस्था केंद्रीय सरकारनें स्थापन केलेल्या आहेत. सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास या दोन्ही अकादमींची सूत्रे मराठी कलावंतांच्या हातीं आहेत हें दिसून येईल. 'नृत्यनाट्य अकादमीचें' सूत्रसंचालन श्री. लाड यांच्याकडे आहे; तर संगीत अकादमीचें संचालन माननीय श्री. केसकरांच्याकडे आहे. 'साहित्य अकादमीचे उपकार्यवाह म्हणून प्रा. प्रभाकर माचवे यांची नेमणूक झाल्याचें वृत्त नुकतेंच हातीं आलें आहे. अकादमीचे कार्यवाह म्हणून श्री. कृपलानी काम पाहणार असले तरी वस्तुतः सर्व सूत्रें प्रा. माचवे यांच्याच हातीं राहतील असें दिसतें. प्रा. माचवे यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल आम्ही

त्यांचें अभिनंदन करतों. हा मान एका मराठी भाषिकाला मिळाला हा योगायोग मोठा उद्बोधक आहे. वस्तुतः हा मान प्रा. माचवे यांच्या बहुभाषिकत्वाचा आहे हें विसरतां कामा नये. आंतरप्रांतीय क्षेत्रांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्यांनी संकुचित अभिमानाच्या भरीं भरून केवळ मराठीच्या ज्ञानावरच यापुढे संतुष्ट राहतां कामा नये. किंबहुना मराठी भाषेची व साहित्याची सेवा असे बहुभाषिक मराठी तज्ञ अधिक भरदारपणें करून तिची कीर्तिहि तेच वाढवूं शकतील. यासाठी आपण मराठीबरोबरच भारतांतील अन्य भाषाहि आत्मसात् करण्याचें ध्येय ठेवलें पाहिजे, हे ओघाने आलेंच.

भारत सरकारने स्थापन केलेल्या ह्या अकादमींच्या विषयी आपलें एकंदर धोरण सहानुभूतीचें असलें पाहिजे असें आम्हांला वाटतें. ' अकादमी ' या शब्दाबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून कित्येकांनी विरोधाची भूमिका स्वीकारली आहे, ती इष्ट नाही. शब्दासाठी एवढें रण माजवायला नको. कित्येकांनी या संस्थांत नियुक्त झालेल्या व्यक्तींच्या ' प्रातिनिधिक 'त्वासंबंधी खळखळ माजविली आहे. पण या बाबतींत नेहमीच मतभेदाला वाव राहणार, हें आपण विसरतां कामा नये. त्या ठिकाणीं गेलेल्या व्यक्तींच्या द्वाराच का होईना पण ' इष्ट ' कार्य कसें घडवून आणतां येईल इकडे दूरदृष्टीने लक्ष देणें अधिक उपयुक्त होईल. दिल्ली येथील ' साहित्य कारणा 'कडे अशा संयमशील दृष्टीने आपण पाहूं या. दुसरी गोष्ट अशी की, या सर्व 'अकादमी' नुकत्याच स्थापन झाल्या आहेत. त्यांचें स्वरूप अजून स्पष्ट व्हावयाचें आहे. अशा वेळीं कोणत्याहि लहानशा प्रश्नावर रण माजविण्यापेक्षा त्याकडे कांही काळपर्यंत सहानुभूतीने पाहणें अत्यंत आवश्यक आहे असें वाटतें.

मराठवाडा साहित्य संमेलन, लातूर :

मराठवाडा साहित्य परिषदेचें सहावें अधिवेशन लातूर येथे गेल्या मे महिन्यांत यशस्वी रीतीने पार पडलें. अध्यक्षस्थानीं, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लघुकथाकार श्री. दिवाकर कृष्ण केळकर यांची योजना झालेली होती. त्यांचें भाषण छोटेसें पण मार्मिक होतें. ' वाङ्मयकारण हें एक स्वतंत्र कारण आहे ' हें सूत्र त्यांनी थोडक्यांत मांडलें असलें तरी त्याला आवश्यक अशी पार्श्वभूमि निर्माण करण्यासाठी ' सामान्य श्रमजीवि जनाच्या रसिक अभिरुची 'ची वाढ करण्याच्या आवश्यकतेकडे त्यांनी दुर्लक्ष होऊं दिलें नाही ही आम्हांला विशेष अभिनंदनीय गोष्ट वाटते. आपल्या भाषणांत ते म्हणाले:—

" आपण स्वतंत्र झालों. लोकशाही अधिसत्ता आपल्या राज्यांतून स्थापन झाली. गतीने अंतराचा संक्षेप करून दूरच्या देशांना एकमेकांसन्मुख आणलें आहे. आणि त्यांत भारताला मध्यवर्ति स्थान येऊं लागलें आहे. आपलें साहित्य आणि संस्कृति हीं आता आपल्या पुरती राहिलीं नाहीत. उद्या तीं इतरांच्या अवलोकनाचा, चिकित्सेचा आणि प्रसंगीं स्वीकाराचा विषय होणार आहेत. साहित्य आणि संस्कृति यांच्या देशमर्यादा उडून जात आहेत. मराठी साहित्य आणि संस्कृति यांच्या संवर्धनाची एकदा प्रतिज्ञा करून राहिल्यानंतर या धकाधकींत समर्थपणें घुसण्यासाठी आपल्याला आपल्या सर्व शक्ति संघटित केल्या पाहिजेत. त्याची आपली कोणती तयारी आहे ? सामान्य श्रमजीवि जनाच्या रसिक अभिरुचींचें मोजमाप घेण्यासाठी जेव्हा परस्थ येतील तेव्हा मराठवाड्यांतील बहुजनसमाज इतरांच्या बरोबर तरी आहे असें दाखवितां आलें पाहिजे. शिक्षणाचा प्रसार आजचें जबाबदार सरकार जनतेच्या सह-

कार्याने करीलच. काळाचा तातडीचा तगादा तसें करणें भाग पाडील. उच्च शिक्षणासह सर्व शिक्षण, राज्यव्यवहारासह सर्व लोकव्यवहार यांत मराठी ही माध्यम म्हणून स्वीकारली जाईल यांत आता संदेह उरला नाही. आर्थिक किंवा इतर तांत्रिक अडचणींमुळे तें दिरंगाईवर टाकतां येणार नाही एवढी मात्र दक्षता बाळगिली पाहिजे. आणि दिरंगाईइतकी अक्षम्य गोष्ट आज दुसरी नाही हें सूज्ञ अधिकारी जाणतीलच; नाही तर जागृत जनता त्यांना निश्चित जाणवून देईल.

बहुजनसमाज नुसता शिक्षित होऊन भागणार नाही. शिक्षित नसलेला समाज ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, आदि पूर्वसूरींनी उघडलेल्या साहित्य-सोनियाच्या खाणींतील सोनें आपल्या शिदोरींत बांधून आजहि राहिला आहे. हें मोलाचें मानधन प्रत्येक जण जतन करून आहे. त्याचें मोल कालत्रयींहि कमी होणार नाही. हिरे-माणकांसारखें तें आहे; पण एवढेंच धन आजच्या गतिमान जगांत पुरेसें नाही. पोलाद, पेट्रोल, रेडियम, इरेनियम यांसारख्या आधुनिक धनाचा संग्रह, संशोधन आणि उत्पादन आपणांला करावेंच लागेल त्यासाठी त्याचें ज्ञान व्हावें लागेल; ज्ञानांतून प्रज्ञेचा नवोन्मेष होईल आणि त्यांतूनच नवें साहित्य असें निर्माण व्हावें की ज्याला तोड नाही आणि मोल नाही. पण त्यासाठी सर्वविध ज्ञानाचें अमाप बियाणें मराठवाड्याच्या नवजागृत लोकमनाच्या भूमीवर अक्षरशः उधळावें लागेल. तें आपण कितीसें साठविलें आहे ! ”

साहित्याचीं व सौंदर्याचीं मोजमापें ’

जून महिन्यांतच ठाणें जिल्हा साहित्य संमेलन यशस्वीरीत्या पार पडलें. महाराष्ट्राचे दुसरे एक अग्रगण्य लघुकथालेखक श्री. पु. भा. भावे यांनी संमेलनाचें अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. त्यांचें भाषण अत्यंत सुंदर व प्रभावी झालें. विशेषतः, ललित कृतींची समीक्षा करतांना कोणते निकष वापरण्यांत यावे यासंबंधीं त्यांनी केलेलें विवेचन आजच्या काळांत अनेकांना उद्बोधक वाटेल. “ ललितकृतीचा आस्वाद घेतांना व ती श्रेष्ठ कनिष्ठ ठरवतांना साहित्याचीं व सौंदर्याचीं मोजमापें वापरण्यांत यावींत; राजकारणाचीं, पक्षाचीं वा अन्य कोणतींहि साहित्यबाह्य मोजमापें याठिकाणीं वापरणें चुकीचें आहे. ” हें त्यांनी खणखणीत शब्दांत सांगितलें. याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

[पान ४५ वरून पुढें चालू]

आत्मनिष्ठा कमी करून वस्तुनिष्ठेवरच अधिक विसंबिलें पाहिजे. म्हणजे आपलें मनोगत, आपलें गृहीतकृत्य वा आपलें इष्ट पुराव्याला मारून मुटकून बोलावयास न लावतां त्याला आपल्या तोंडानें आपलें (म्हणजे त्याचेंच) मनोगत मोकळेपणाने बोलूं दिले पाहिजे. यालाच वस्तुनिष्ठ निःपक्षपाती व म्हणूनच विश्वसनीय संशोधन म्हणतां येईल. प्रा. मिराशी यांचे संशोधन या प्रकारांतील आहे. डॉ. भांडारकर व डॉ. का. बा. पाठक यांसारख्यांच्या संशोधनाचे आदर्शच त्यांना प्रेरक झालेले दिसतात. डॉ. केतकर किंवा पुरातत्त्वभूषण वि. का. राजवाडे यांच्या थोर कामगिरीबद्दल योग्य तो आदर ठेऊन असें म्हणतां येईल की डॉ. केतकरांचा कल आग्रही व क्षोभक निर्णयांकडे अधिक झुकलेला असे तर राजवाडे आपल्या अनिरुद्ध प्रतिभेच योगा

[पुढील मजकूर कव्हर पान ३ वर पाहा.]

साभार-स्वीकार

१. जीवन-वेणू (कविता):-मधुकर नाईक अभिनव प्रकाशन, नायगांव, मुंबई १४, मूल्य १॥ रु.

२. निसर्गावर चढाई:- बोरिस पोलेवोय, अनु. स. ह. मोडक, "साधना" माहीम, मुंबई १६, मूल्य १॥ रु.

३. भारतीय महिला रत्नमाला. पुष्प २ रें:-रा. गो. भिडे, साधना, माहिम, मुंबई १६, मूल्य १। रु.

४. होनाजी बाळा (नाटक):- चिं. य. मराठे, प्रका. शं. ना. अधृटकर, मराठी प्रकाशन १२, त्रिभुवन रोड, मुंबई ४, मूल्य २ रु.

५. नवें जग नवीं क्षितिजें (प्रवासवर्णन) प्रभाकर पाध्ये, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७, मूल्य ४ रु.

६. एका रात्रीची गोष्टः-माधव मनोहर, पॉप्युलर बुकडेपो, मुंबई ७, मूल्य ३ रु.

७. खरं सांगायचं म्हणजे (कथा):- गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर बुकडेपो, मुंबई ७, मूल्य ३ रु.

८. नागपूरचा सांस्कृतिक इतिहासः- दे. गो. लांडगे, मध्य प्रदेश संशोधक मंडळ, नागपूर, मूल्य २ रु.

९. संशोधन मुक्तावली (सर पहिला):- वा. वि. मिराशी, मध्य प्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, मूल्य ४ रु.

१०. जीवन-प्रवाह (चरित्र):-माधवराव बागल, राजारामपुरी, कोल्हापूर, मूल्य ५ रु.

११. तिसरा जावई (नाटक):- म. रं. शिरवाडकर, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणें २, मूल्य २ रु.

१२. उद्यांची संस्कृतिः-द. के. केळकर, मनोहर ग्रंथमाला, टिळक रोड, पुणें २, मूल्य ६ रु.

१३. प्राची (कविता):-गो. म. कुलकर्णी, स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर, मूल्य १॥ रु.

१४. शीळ (कविता):-ना. घ. देशपांडे, मौज प्रकाशन लि. गिरगांव, मुंबई ४, मूल्य ३ रु.

१५. लोकभ्रम कसे नाहीसे होतील?- विज्ञानानें:- वा. रं. सुंठणकर, किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी, मूल्य १। रु.

१६. भारतीय लोकसत्ताः-पु. ग. सहस्रबुद्धे, मे. जोशी-लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणें २, मूल्य ८ रु.

१७. महाराष्ट्रांतील संत व त्यांचे साक्षात्कारः-रा. स. भागवत, प्रका.-द. गो. काळे, आपटे रोड, पुणें ४, मूल्य १॥ रु.

१८. अश्रु (कादंबरी):-वि. स. खांडेकर, देशमुख आणि कं., २२ कसबा, पुणें २, मूल्य ६ रु.

१९. गंधरेखा (कविता):-पु. शि. रेगे, ललित साहित्य प्रकाशन, श्रीकृष्ण नगर, बोरिवली, मुंबई, मूल्य २ रु.

२०. आविष्कार (सोलापूर शहर कवि संमेलन) प्रकाशन १:-(कविता) स्वागताध्यक्ष सोलापूर शहर कवि संमेलन, १९५४, मूल्य १ रु.

२१ महाकवि "भूषण" (हिंदी):- भगीरथप्रसाद दीक्षित, साहित्य भवन लि. अलाहाबाद, मूल्य १॥ रु.

बालवाङ्मय— के. भि. ढवळे समर्थ सदन, गिरगांव-मुंबई प्रकाशनें—

१ नवा संसार- स. ना. सूर्यवंशी, मूल्य १२ आणे.

२ नवा माणूस-श्री. बा. रानडे, मूल्य १२ आणे.

परिषद् वार्ता

(चिटणीसांकडून)

कै. केतकर स्मृतिदिनः— ज्ञानकोशकार कै. श्री. व्यं. केतकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त १० एप्रिल रोजीं पुढील दोन कार्यक्रम झाले. १ सकाळीं कै. केतकर यांच्या समाधीला पुष्पांजलि अर्पण करण्यांत आली. याप्रसंगीं प्रा माटे, प्रा. गोखले, कवि यशवन्त, प्रा. अद्वंत, श्री. पां. र. अंबिके इत्यादि उपस्थित होते. २ सायंकाळीं ६॥ वाजतां विद्यानिधि श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचें व्याख्यान झालें. श्री. चित्राव यांनी व्याख्यानाचे आरंभीं कै. केतकर यांना उचित शब्दांत श्रद्धांजलि वाहिली व नंतर कोश वाङ्मयासंबंधी आपले विचार व्यक्त केले. व्याख्यानानंतर श्री. चित्राव यांचा परिषदेतर्फे सत्कार करण्यांत आला.

व्याख्यानः— श्री. आर्. जी. कुलकर्णी यांचे १८ एप्रिल रोजीं ' चार्वाक आणि चार्वाकमत ' या विषयावर व्याख्यान झालें.

भेटी-सत्कारः— गेल्या तिमाहींत पुढील सद्गृहस्थांनी परिषदेस भेटी दिल्या व परिषदेतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. १ श्री. न. ग. कमतनूरकर (दि. २३-४-५४) २ प्रा. वामनराव चोरघडे (दि. १९-५-५४) ३ दिल्ली नाट्य-संगीत अॅकडमीच्या कार्यवाह श्री. निर्मला जोशी (दि. २९-५-५४) परिषदेचे माजी कार्यवाह रा. बा. र. लु. जोशी (दि. २०-६-५४), श्री. जोशी यांनी आपल्या भेटींत कांही कविताहि म्हणून दाखविल्या.

कार्यालयीन सभाः— १३ जून १९५४ रोजीं कार्यकारी, नियामक या मंडळाच्या व वार्षिक साधारण सभा झाल्या व त्यांतून पुढील महत्त्वाचीं कामें झालीं. १ परिषदेच्या आगामी त्रैवार्षिक निवडणुकीसाठी चिटणीस प्रा. गोखले यांनी मांडलेलें वेळापत्रक का. का. मंडळाने संमत केलें. २ नि. व मं. वा सा. सभेने कार्यकारी मंडळाने सादर केलेलें १९५३-५४ चें इतिवृत्त, जमाखर्च, ताळेबंद व ५४-५५ चें अंदाजपत्रक संमत केलें. ३ वा. सा. सभेंत, श्री. दि. के. बेडेकर यांनी दिल्ली येथे मराठी साहित्य संमेलन न भरवितां पंढरपूर येथे भरवावें अशा अर्थाचा जो ठराव पाठविला होता त्यावर बरीच चर्चा झाली. अध्यक्षांनी ठराव मतास टाकल्यावर तो बहुमताने असंमत झाला व आगामी संमेलन दिल्ली येथेंच भरवावें असें ठरलें.

प्राज्ञ-विशारद वर्गः— दरवर्षीप्रमाणे प्राज्ञ व विशारद वर्ग १ जुलै पासून सुरू झाले. दोन्ही वर्ग मिळून ६५-७० विद्यार्थीसंख्या आहे.

संमेलनः— म. सा. प. चे ३७ वें मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे ' मराठी साहित्य मंडळा ' तर्फे येत्या आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत भरणार आहे. संमेलनाला जोडून एक सांस्कृतिक महोत्सवहि होणार आहे.

शाखा सभा वृत्तांत :— सोलापूर येथे भरलेल्या शहर कवि संमेलनानिमित्त कवि कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांनी सोलापूर शाखासभेस भेट दिली. त्यांचा व कवि मंगेश पदकी, सरिता पदकी, श्री. काकासाहेब सहस्त्रबुद्धे यांचाहि शाखासभेतर्फे सत्कार करण्यांत आला. सत्कारप्रसंगीं केलेल्या भाषणांत कवि कुसुमाग्रज यांनी शाखासभेच्या वाढत्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें.

अनुक्रमणिका

साभार स्वीकार

३ शिदवा धायगुड्या-दत्त आपटे, मूल्य ६ आणे.
४ शुभ मंगल सावधान-वि. वा. जोशी, मूल्य ६ आणे,
५ दाजिबाची कामगिरी-ग. म. वैद्य. मूल्य १० आणे.
६ शहाणे पशु-भा. म. गोरे, मूल्य ८ आणे.
७ चला परत खेड्यांत-व्यं. रा. खंडाळीकर, मूल्य ६ आणे.
८ ऐका मंडळी-वि. स. गवाणकर, मूल्य ८ आणे.
९ मौनी सेवकराम-गोपाळराव कुलकर्णी, मूल्य ८ आणे.
१० सुंदरवाडी-वि. वा. हडप, मूल्य १० आणे.
११ रामरहिम.. ...-वा. गो. नाईक, मूल्य ६ आणे.

नवीन सभासद

तहहयात

१ श्री. गं. रा. पाठक, पुणें २
२ श्री. दि. गो. सुलाखे, बार्शी (सोलापूर)
३ श्री. व. कृ नूलकर, पुणें २.
४ श्री. भी. कृ. वाघमारे, हैद्राबाद (द.)
५ श्री. ग. म. आपटे, पुणें २

साधारण

१ ज्योत्स्ना कोल्हटकर, पुणें ४.
२ श्री. श्री. वा. भागवत, पुणें २.
३ श्री. वा. रा. नातू, मुंबई १
४ श्री. श्री. गो देशपांडे, नगर.
५ श्री. न. ल. कोतमिरे, बनारस.
६ श्री. ना. रा. साठे, पुणें २.
७ श्री. नारायण आचार्य, सोलापूर.
८ श्री. प. रा. कुलकर्णी, पुणें २.
९ श्री. प्र. रा. शिराळकर, सांगली.
१० श्री. ने. न. दोशी, सांगली.
११ श्री. सरोज देशमुख, पुणें २.
१२ श्री. रा. रा. चाहुर, पुणें ४.
१३ श्री. प. रा. लांडगे, एरंडोल (पूर्व खानदेश)
१४ श्री. विद्युल्लता शहा, सोलापूर.
१५ श्री. सुशीला पदणी, सोलापूर.
१६ श्री. किशल्यादेवी गंगवाल, सोलापूर.
१७ श्री. ज. ग. जोशी, सोलापूर.
१८ श्री. पां. म. दिंडोरकर, सोलापूर.
१९ श्री. गो. म. दिंडोरकर, सोलापूर.

[पान ४८ वरून चालू]

अधिक संचार करूं देत. विद्यमान महाराष्ट्रीय संशोधकांपैकी पुणें येथील भाण्डारकर-संशोधनमंदिराचे श्री. पी. के. गोडे यांचें संशोधन वस्तुनिष्ठ व निबंधसंख्या या दृष्टीनीं प्रा. मिराशी यांच्या कोटींतच येणारें आहे. या व अशांसारख्या इतर अनेक गत व विद्यमान संशोधकांच्या प्रयत्नांनींच प्राचीन भारताचा व महाराष्ट्राचा विश्वसनीय इतिहास लिहिला जाणार आहे. त्यांत प्रा. मिराशी यांच्या संशोधनमुक्तावलीला मानाचें स्थान आहे. तिचे आणखी अधिक 'सर' यापुढं मराठींतच प्रसिद्ध व्हावे व त्यांनीं मराठी संशोधनाला मार्गदर्शन लाभावें अशी कोणाहि संशोधनप्रेमी वाचकाची उत्कट इच्छा साहजिकच असणार.

के. ना. वाटवे.
